M53 एम. ए. (लोकप्रशासन)

सेमिस्टर I

COURSE CODE : PAD102

BOOK CODE : PAD 1021

मुखपृष्ठ रचना : अविनाश उमाकांत भरणे / प्रं. नि. केंद्र / यचमवि विद्यापीठ / AF21-94

## PAD 102

## भारतीय संविधान व प्रशासन

## पुस्तक 1

# भारतीय संविधान : तत्त्वज्ञान आणि प्रणाली

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

**PAD 102**
**भारतीय संविधान आणि प्रशासन**
**Book Code : PAD1021**

**पुस्तक १**

# भारतीय संविधान तत्त्वज्ञान आणि प्रणाली

**लेखक : डॉ. नवनाथ आघाव, डॉ. तन्मय पैठणकर**


| | |
|---|---|
| घटक १ : संविधानाचे तत्त्वज्ञान व मुल्ये | १ |
| घटक २ : संविधानवाद | १० |
| घटक ३ : संविधान विषयक ऐतिहासिक न्यायालयीन निर्णय | १६ |
| घटक ४ : राजकीय संस्कृती, पक्ष, दबावगट आणि प्रसारमाध्यमे | २० |
| घटक ५ : संविधान आणि शिक्षण | ३५ |
| घटक ६ : निवडणूकप्रक्रिया | ४७ |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुलगुरू : प्रा. ई. वायुनंदन


### मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषद

**डॉ. प्रवीण घोडेस्वार**
प्र. संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**नागार्जुन वाडेकर**
सहयोगी प्राध्यापक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. हेमंत राजगुरू**
सहयोगी प्राध्यापक
शैक्षणिक सेवा विभाग
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. विजया पाटील**
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**माधव पळशीकर**
सहयोगी प्राध्यापक
संगणकशास्त्र विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. मोहन काशीकर**
प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर

**डॉ. सतीश बडवे**
प्राध्यापक
मराठी भाषा आणि साहित्य विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. लतिका अजबानी**
सहायक प्राध्यापक
वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ
नाशिक

**डॉ. सुरेश कानडे**
प्राध्यापक
हिंदी विभाग
एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय
नाशिक

**डॉ. मधुकर शेवाळे**
उप ग्रंथपाल
य.च.म. मुक्त विद्यापीठ
नाशिक

**डॉ. विनायक देशपांडे**
प्राध्यापक व माजी विभागप्रमुख
व्यवसाय व्यवस्थापन विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर

### अभ्यासक्रम समिती

**डॉ. श्याम शिरसाठ**
प्र. कुलगुरू
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. बालाजी कत्तूरवार**
प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड

**डॉ. वासंती रासम**
प्रमुख
राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. भारत गोरे**
सहयोगी प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
विवेकानंद महाविद्यालय
औरंगाबाद

**डॉ. जितेंद्र वासनिक**
सहयोगी प्राध्यापक
लोकप्रशासन व स्थानिक स्वराज शासन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ
नागपूर

**डॉ. प्रीती पोहेकर**
प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
राजर्षि शाहू महाविद्यालय
लातूर

**डॉ. अशोक नाईकवाडे**
प्राचार्य
पंडीत जवाहरलाल नेहरू महाविद्यालय
औरंगाबाद

**डॉ. अभिजित पिलखाने**
सहयोगी प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग
चेतना शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
कला वरिष्ठ महाविद्यालय, औरंगाबाद

Course Code : PAD102    Book Code : PAD1021 : भारतीय संविधान तत्त्वज्ञान आणि प्रणाली

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक


**कुलगुरू : प्रा. ई. वायुनंदन**

**प्र. संचालक : डॉ. प्रवीण घोडेस्वार, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**



### लेखक

**डॉ. नवनाथ आघाव**
प्राध्यापक
सरस्वती भुवन महाविद्यालय
औरंगाबाद

**डॉ. तन्मय पैठणकर**
सहयोगी प्राध्यापक
वीमेन नवखंडा महाविद्यालय
औरंगाबाद

### संपादक

**डॉ. अशोक नाईकवाडे**
प्राचार्य
पंडित नेहरू महाविद्यालय
औरंगाबाद

### अनुदेशन-तंत्र-संपादक

**राजेंद्र सोरमारे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

### भाषा संपादक

**डॉ. सुनील गावंडे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

### शिक्षणक्रम संयोजक

**डॉ. सुनील गावंडे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**डॉ. सुशील कांबळे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**राजेंद्र सोरमारे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२



### निर्मिती

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

*First Edition developed under DEC development grant.*

- ❑ **प्रथम आवृत्ती** : ऑगस्ट २०२१ ❑ **प्रकाशन क्रमांक** : २३०७
- ❑ **मुखपृष्ठ रेखाटन** : श्री. अविनाश भरणे
- ❑ **अक्षरजुळणी** : परफेक्ट कॉम्प्युटर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक - ८
- ❑ **मुद्रक तथा प्रकाशक** :डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**ISBN 978-93-91514-34-1**

**B18-19-116**

# कुलगुरूंचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम. ए. लोकप्रशासन या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमात प्रवेश घेतल्याबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो. या शिक्षणक्रमाची पुस्तके आपल्या हाती देतांना मला विशेष आनंद होत आहे.

गेल्या तीस वर्षात विद्यापीठाने समाजाच्या गरजेनुरूप कौशल्यधिष्ठित शिक्षणक्रम विकसनास प्राधान्य देऊन शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. केवळ पारंपरिक शिक्षणावर आणि पुस्तकी ज्ञानावर भर ने देता, ज्ञानाचे उपयोजन दैनंदिन जीवनात स्वत:च्या व समाजाच्या हितासाठी कसे करावे, याचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा विद्यापीठाने सतत प्रयत्न केलेला आहे. कोणत्याही कारणाने शिक्षणात खंड पडलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. काम करता करता शिक्षण घेता येईल असे शिक्षणक्रमाचे लवचिक स्वरूप, जसे शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी वाढीव कालावधी, अत्यल्पशिक्षणक्रम शुल्क आणि विद्यार्थीकेंद्री कार्यपद्धती, इत्यादी मुक्त शिक्षणप्रणालीची वैशिष्ट्ये आहेत. विद्यापीठाने शिक्षणाच्या संधीचे लोकशाहीकरण करताना, केवळ आर्थिक कुवत नाही म्हणून शिक्षण घेता आले नाही अशी स्थिती असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणले आहे.

शासन तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, विविध संस्था, संघटनांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार तसेच बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन विद्यापीठामार्फत नवनवीन शिक्षणक्रम विकसित करण्यात येतात. विविध शिक्षणक्रमाची त्या त्या विषयातील तज्ज्ञांद्वारे विकसित केलेली दर्जेदार पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून दिली जातात. मुक्त विद्यापीठाने विकसित केलेली ही पुस्तके विद्यापीठाची ओळख झाली आहेत, याचा मला अभिमान वाटतो. अशा प्रकारे मुक्त विद्यापीठाने ज्ञानगंगा घरोघरी पोहचवणारी शिक्षणप्रणाली निर्माण करून देत राज्याच्या विकासात आपले योगदान दिले आहे.

लोकप्रशासन हा विषय एक विद्याशाखा म्हणून फक्त शंभर ते सव्वाशे वर्षापूर्वी अमेरिकेत अस्तित्वात आल्याचे दिसते. आता जगभरातील जवळपास सगळ्या प्रमुख विद्यापीठांमध्ये लोकप्रशासन एक स्वतंत्र विषय म्हणून शिकविल्या जात आहे. लोकप्रशासन एक विद्याशाखा म्हणून भारतातूनही मान्यता पावलेली दिसून येते. मात्र महाराष्ट्रात लोकप्रशासन एक स्वतंत्र विषय म्हणून काही मोजक्याच विद्यापीठात शिकविण्यात येतो. मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून सदर विषय महाराष्ट्रभर अभ्यासला जात आहे याचा आनंद वाटतो.

राज्याच्या (स्टेट) बदलत्या स्वरूपानुसार आता राज्य केवळ कायदा व सुव्यवस्था पाहणारी व्यवस्था राहिली नसून लोकांचे सर्वंकष कल्याण करणारी व्यवस्था बनली आहे. मात्र आधुनिक कल्याणकारी राज्यात लोकांचे कल्याण साधण्याकरिता कायदेमंडळाने ठरविलेल्या धोरणांची यथोचित अंमलबजावणी करण्यासाठी राज्याएवढीच लोकप्रशासनाच्या कार्याचीही आवश्यकता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी राज्याच्या आणि प्रशासनाच्या बदलत्या भूमिका बारकाईने समजून घ्यायला हव्यात.

लोकप्रशासन हा विषय विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या अभ्यासापासून ते ग्रामपंचायतीच्या सदस्यांपर्यंत सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषट आहे. विशेषत: लोकप्रशासन हा वैकल्पिक विषय घेऊन विविध विद्याशाखेतील विद्यार्थी केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करीत आहेत. प्रशासकीय सेवेमध्ये निवड झाल्यानंतर कर्तव्य पाड पाडतांना लोकप्रशासनातील या तत्त्वांचा व सिद्धांतांचा त्यांना व्यवहारात उपयोग होताना दिसतो. त्या अनुषंगाने या शिक्षणक्रमात काही अभ्यासक्रमांचा विशेषत्वाने अंतर्भाव करण्यात आला आहे. जसे 'ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था', 'महाराष्ट्र प्रशासन', 'ग्रामीण विकास', 'भारतातील लोकशाही व विकास', इत्यादी महत्त्वाच्या अभ्यासक्रमाबरोबरच 'लोकप्रशासनातील नवप्रवाह', 'मानव व वित्तीय संसाधन व्यवस्थापन' व 'सामाजिक कल्याण प्रशासन', इत्यादी नविन घटकांचाही समावेश करण्यात आला आहे. आपल्या विषयात अद्ययावत राहण्यासाठी विद्यापीठाने तुम्हाला पुरविलेल्या स्वयं-अध्ययन साहित्याबरोबरच तुम्ही योजना, कुरुक्षेत्र, लोकराज्य अशा चालू घडामोडींवरील मासिकांचेदेखील नियमित अध्ययन करायला हवे.

पारंपारिक शिक्षणप्रणालित विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांमध्ये दररोज अभ्यासवर्ग असतात, तर दूरशिक्षण प्रणालीमध्ये सुट्टीच्या दिवशी संपर्कसत्र आयोजित केली जातात. स्वत:च्या व्यावसायिक तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण पूर्ण करणे असे या संकल्पनेमध्ये अपेक्षित असल्याने संपर्कसत्राला जातांना संबंधित अभ्यासक्रमाचा, त्यातील पुस्तकांचा म्हणजेच त्यातील घटकांचा अभ्यास करून उपस्थित राहणे आवश्यक आहे. म्हणजे तुमच्या शंका-अडचणी, प्राध्यापकांना त्यांचे

निराकरण करून घेता येईल. आदर्श संपर्कसत्राचे स्वरूप एकसुरी व्याख्यानाऐवजी चर्चात्मक व्हावे अशी विद्यापीठाची भूमिका आहे. विद्यापीठाने दृकश्राव्य माध्यमाचा प्रभावीपणे वापर करून विविध विषय तज्ज्ञांची व्याख्याने, मुलाखती विद्यापीठाच्या युट्युब वाहिनीवर (चॅनलवर) उपलब्ध करून दिल्या आहेत त्या आवर्जून पहाव्यात.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रशासनात अंकित (डिजिटल) तंत्रज्ञानाचा वापर करून कागदरहित (पेपरलेस) प्रशासनावर भर दिल्या जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाची पुस्तके डिजिटल स्वरूपात www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत, ती विद्यार्थी, शिक्षक तसेच जिज्ञासूंना उपयुक्त ठरतील अशी खात्री आहे. विद्यापीठाच्या पुस्तकांबद्दल आपल्या अभिप्रायाचे स्वागत आहे.

आपल्या भविष्यातील वाटचालीसाठी पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा !

**प्रा. ई. वायुनंदन**
**कुलगुरू**

ज्ञानगंगा घरोघरी

# एम.ए. (लोकप्रशासन) पदव्युत्तर शिक्षणक्रम (M53)

## अभ्यासक्रम

## भारतीय संविधान आणि प्रशासन (PAD102)

### पुस्तक १ : भारतीय संविधान तत्त्वज्ञान आणि प्रणाली

घटक १ : संविधानाचे तत्त्वज्ञान व मुल्ये
घटक २ : संविधानवाद
घटक ३ : संविधान विषयक ऐतिहासिक न्यायालयीन निर्णय
घटक ४ : राजकीय संस्कृती, पक्ष, दबावगट आणि प्रसारमाध्यमे
घटक ५ : संविधान आणि शिक्षण
घटक ६ : निवडणूकप्रक्रिया

### पुस्तक २ : भारतीय संविधानाची संरचना

घटक १ : भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया
घटक २ : संविधान परिचर्चा
घटक ३ : संविधानाची रूपरेखा
घटक ४ : संविधानातील महत्त्वाच्या संकल्पना
घटक ५ : संसदीय समित्या आणि आयुधे
घटक ६ : महत्वाच्या घटनादुरुस्त्या

### पुस्तक ३ : संवैधानिक आणि वैधानिक मंडळे

घटक १ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची पार्श्वभूमी
घटक २ : संवैधानिक मंडळे – भाग १
घटक ३ : संवैधानिक मंडळे – भाग २
घटक ४ : वैधानिक मंडळे – भाग १
घटक ५ : वैधानिक मंडळे – भाग २
घटक ६ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची उपयोगिता आणि मर्यादा

### पुस्तक ४ : भारतीय संविधान आणि लोकप्रशासन संबंध

घटक १ : भारतीय संविधानाची ठळक वैशिष्ट्ये
घटक २ : भारतीय प्रशासनाचे स्वरूप व संरचना
घटक ३ : भारतातील लोकसेवा
घटक ४ : घटनात्मक संस्था
घटक ५ : कल्याणकारी प्रशासन
घटक ६ : भारतातील न्यायव्यवस्था

# भारतीय संविधान आणि प्रशासन (PAD 102)

## प्रस्तावना

भारताने संसदीय लोकशाही शासनपद्धतीचा स्विकार केला आहे. लोकशाहीकेंद्री देशाचा राज्यकारभार संविधानाच्या नियम चौकटीत असावा लागतो. देशाचा कारभार ज्या आचारसंहितेच्या मुलभूत चौकटीला अधिन राहून केला जातो त्या आचारसंहितेलाच संविधान म्हणून संबोधले जाते. संविधान हे त्या देशाच्या इच्छा आकांक्षाच्या स्वप्नपूर्तीसाठी त्या देशाचा राष्ट्रस्वभाव घडवणारी पायाभूत रचना असते. भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना जे स्वातंत्र्य प्रदान केले आहे अशा नागरिक स्वातंत्र्याची पार्श्वभूमी समजावून घेऊन संविधानातील मुलभूत संकल्पनाच्या तपशिलाची माहिती करून घेणे हे या अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. देशातील नागरिकांचे नागरिकत्व, मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्य, राज्याचे धोरणविषयक तत्त्वे, राज्य व्यवस्थेचे उद्दिष्ट्ये, शासन व राज्यव्यवस्थेचे स्वरूप, कार्य करण्याची पद्धत तसेच नागरिक व शासनसंस्था यांचे संबंध यांचाही परिचय या अभ्यासक्रमातून आपल्याला करवून घ्यावयाचा आहे.

''भारतीय संविधान आणि प्रशासन'' या अभ्यासक्रमाची विभागणी चार पुस्तकात करण्यात आली आहे. यातील पहिल्या पुस्तकामध्ये संविधानाचा अर्थ सांगून त्यांचा कसा विकास होत गेला हे सांगितले आहे. तसेच संविधानाचे तत्त्वज्ञान व मुल्ये सांगून संविधानवादाची संकल्पना विशद केली आहे. संविधानविषयक ऐतिहासिक न्यायालयीन निर्णय त्यांचा झालेला परिणाम यांचा ऊहापोह केलेला आहे. शेवटी राजकिय संस्कृती, संविधान आणि शिक्षण तसेच निवडणूक प्रक्रिया यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

दुसऱ्या पुस्तकात भारतीय संविधानाची संरचनेविषयी परिचित करून देण्यात आले आहे. त्यामध्ये भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया घटना समितीमध्ये घडून आलेल्या चर्चा, त्यातून निर्माण झालेले संविधान यांचा उहापोह केलेला आहे. संविधान कितीही आदर्श असले तरी काळानुरूप त्यामध्ये बदल करणे, दुरूस्ती करणे ही काळाची गरज आहे. म्हणून या पुस्तकाच्या शेवटी संविधानात झालेल्या महत्त्वाच्या दुरूस्त्यांची चर्चा करण्यात आली आहे.

तिसऱ्या पुस्तकामध्ये संवैधानिक आणि वैधानिक मंडळे यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. संविधानातील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आणि शासनाची कार्य पार पाडण्यासाठी काही प्रशासकीय अभिकरणे कार्यान्वित आहेत. जसे आयोग, मंडळे, परिषद यांच्या कार्याचा उहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे.

चौथ्या पुस्तकात भारतीय संविधान आणि लोकप्रशासन संबंध, भारतीय संविधानाची ठळक वैशिष्ट्ये, भारतीय प्रशासनाची संरचना व स्वरूप, भारतातील लोकसेवा, भारतातील न्यायव्यवस्था यांच्या कार्याचा सविस्तर उहापोह करण्यात आला आहे.

शेवटी असे नमूद करावेसे वाटते की, हा अभ्यासक्रम भारतीय प्रशासकीय संरचनेचा आहे, तेव्हा विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अनेक ठिकाणी भारतीय प्रशासन व्यवस्थेची उदाहरणे दिली आहे. असे असले तरी सर्वसाधारण सर्वच प्रशासकीय संरचनाचे आकलन व्हावे हा त्यांचा उद्देश आहे.

दुरशिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांना त्या-त्या विषयाचा अभ्यास स्वत:च्या बळावर शिक्षकांची मदत न घेता करता यावा हा हेतू असून त्यासाठी विषयाची मांडणी सोप्या भाषेत सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय त्यातील काही संकल्पना अधिक तपशिलात जाऊन समजावून घेता याव्यात यासाठी अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकाची यादी प्रत्येक घटकाच्या शेवटी दिली आहे. तेव्हा हा अभ्यासक्रम आपणास आवडेल अशी आशा आहे.

# पुस्तक पहिले : भारतीय संविधान तत्त्वज्ञान आणि प्रणाली

## प्रास्ताविक

भारतीय संविधान आणि प्रशासन या अभ्यासक्रमाच्या पहिल्या पुस्तकात एकूण ६ घटक आहेत. या अभ्यासक्रमात भारतीय संविधान निर्मितीची पार्श्वभूमी, भारतीय संविधानावर इतर देशांचा पडलेला प्रभाव, त्यातून निर्माण झालेले भारतीय संविधान याची माहिती दिली आहे. ती घटकनिहाय खालीलप्रमाणे आहेत.

**घटक १ : संविधानाचे तत्त्वज्ञान व मूल्ये :** ह्या घटकातून आपण भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास, भारतीय संविधान निर्मितीच्या विविध स्त्रोतांचा, भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे तत्त्वज्ञान, न्यायालयीन निर्णय प्रक्रिया व घटनादुरूस्ती, भारतीय संविधानातील मुलभूत वैशिष्ट्ये, भारतीय संविधानाची मुल्ये व तत्त्वज्ञान या गोष्टी समजून घेणार आहोत.

**घटक २ : संविधानवाद :** ह्या घटकातून आपण संविधानवादाची संकल्पना, संविधानवादाची निर्मिती प्रक्रिया, भारतीय संविधानाचा संविधानवादाशी असलेला संबंध यांचा अभ्यास केला आहे.

**घटक ३ : संविधानविषयक ऐतिहासिक न्यायालयीन निर्णय :** ह्या घटकात आपण न्यायालयाने संविधानासंदर्भात दिलेल्या महत्त्वाचे खटले आणि निर्णय यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. तसेच स्वतंत्र न्यायमंडळाच्या भूमिकेच्या, संविधानाचे संरक्षण न्यायमंडळ कशाप्रकारे करते ह्या गोष्टींचा अभ्यास केला आहे.

**घटक ४ : राजकीय संस्कृती, पक्ष, दबावगट आणि प्रसारमाध्यमे :** ह्या घटकात राजकीय संस्कृती म्हणजे काय, तिची वैशिष्ट्ये व भारतीय राजकीय संस्कृती कशी आहे, भारतातील प्रमूख राजकीय पक्ष व त्यांची विचारसरणी, राजकीय व्यवस्थेमध्ये दबाव गटाचा प्रभाव व त्यांचे प्रकार, लोकशाही प्रक्रियेत प्रसारमाध्यमांची भुमिका आणि यासर्व घटकांचा राजकीय व्यवस्थेवर पडणारा प्रभाव व त्यामुळे त्यांचे बदलणारे स्वरूप यांचा अभ्यास केला आहे.

**घटक ५ : संविधान आणि शिक्षण :** ह्या घटकात संविधान आणि शिक्षण यासंदर्भाने चर्चा केली आहे. कारण शिक्षणाच्या विकासात संविधानाचे योगदान महत्त्वाचे आहे. मुलभूत अधिकार आणि शिक्षण, मार्गदर्शक तत्त्वे आणि शिक्षण शिक्षणाविषयी प्रमुख घटनादुरूस्त्या, शिक्षणविषयक महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय, इत्यादी मुद्द्यांचा या घटकात अभ्यास करण्यात आला आहे.

**घटक ६ : निवडणूक प्रक्रिया :** ह्या घटकातून निवडणुकीबाबत घटनात्मक तरतुदी, निवडणूक आयोगाची रचना, कार्ये, निवडणूकीची प्रक्रिया, निवडणूकांचे प्रकार, मतदारांचे राजकीय वर्तन आणि निवडणूक सुधारणा, इत्यादी मुद्द्यांवर प्रकाश टाकला आहे.

ज्ञानगंगा घरोघरी

# घटक १ : संविधानाचे तत्त्वज्ञान व मुल्ये

***अनुक्रमणिका***


१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन
   १.२.१ भारतीय संविधानाचे स्रोत
   १.२.२ भारतीय संविधानातील मुलभूत वैशिष्ट्ये
   १.२.३ भारतीय संविधानाची मुल्ये व तत्त्वज्ञान
१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.५ सारांश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला-

- भारतीय संविधानाची प्रक्रिया समजुन घेता येईल.
- भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे तत्त्वज्ञान समजुन घेणे सोपे होईल.
- उद्देश पत्रिकेमध्ये घटनादुरूस्तीनंतर झालेले बदल माहीत होतील.
- भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास समजुन घेता येईल.
- भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेतील विविध स्त्रोतांचा अभ्यास होईल.

## १.१ प्रास्ताविक

१३ डिसेंबर १९४६ रोजी जवाहरलाल नेहरू यांनी घटना समितीत एक प्रस्ताव मांडला होता. ज्याचा स्वीकार घटना समितीने २२ जानेवारी १९४७ रोजी केला. या प्रस्तावाचा स्वीकार केल्यामुळे घटनाकारांचा मार्ग निश्चित झाला. घटना/संविधान समितीच्या अध्यक्षपदी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची निवड झाली होती यांच्याशिवाय पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अब्दुल कलाम आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राधाकृष्णन, अलादी कृष्णास्वामी अय्यर,बी.एन.राव, एन.गोपालस्वामी अय्यंगार, डॉ. सच्चिदानंद सिन्हा, कन्हैयालाल मुन्शी, टी. टी. कृष्णम्माचारी, श्रीकृष्ण सिन्हा, बॅ.जयकर, सरदार बलदेवसिंग, जगजीवनराम, जॉन मथाई, सरोजिनी नायडु, विषयालक्ष्मी पंडीत, फ्राँक अँथनी, आचार्य कृपलानी, हृदयनाथ कुंझरू, एच.व्ही. कामत, पट्टाभी सीतारामय्या, पुरूषोत्तमदास टंडन, मिनु मसानी या सारख्या नामवंत व्यक्तींचा भारताच्या घटना समितीत समावेश होता. भारतीय समाजातील सर्व वर्गांना व स्तरांना घटना समितीत प्रतिनिधीत्त्व मिळाले होते. घटनेच्या/संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने संविधान निर्मितीच्या कार्यात डॉ. बी.

आर. आंबेडकरांनी महत्त्वाची भुमिका पार पाडली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने घटनेच्या मसुद्याला आपली मान्यता दिली. त्या दिवशी घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रप्रसाद यांची घटनेवर स्वाक्षरी झाली अशा प्रकारे भारताचे संविधान तयार करण्यासाठी २ वर्षे ११ महिने १८ दिवसांचा कालावधी लागला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान / राज्यघटना अंमलात आली.

# १.२ विषय–विवेचन

प्रत्येक संविधानाच्या निर्मितीमध्ये तत्त्वज्ञान, मुल्ये, स्त्रोत, मुलभुत वैशिष्टये या संकल्पनांचा समावेश असतो. भारतीय संविधानसुद्धा याला अपवाद नाही. या भागात आपण भारतीय संविधानाचे मुलभुत वैशिष्टय व मुल्ये तत्त्वज्ञान यांचा सविस्तरपणे अभ्यास करणार आहोत.

## १.२.१ भारतीय संविधानाचे स्त्रोत

संविधानकारांनी संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत विविध प्रकारच्या स्त्रोतांचा उपयोग केला होता. यामध्ये स्वातंत्र्य चळवळीतील ज्येष्ठ राष्ट्रीय नेत्यांचा आशा आकांक्षा, १९३५चा भारत सरकार विषयक कायदा, आणी जगातील इतर राष्ट्रांतील संविधान निर्मिती, अंमलबजावणी या विषयीची माहीती, यांचा समावेश होतो. भारतीय संविधान हे एक खुले संविधान आहे. त्यामधे कुठल्याही प्रकारची गुप्तता नाही. या व्यतिरिक्त अजुन काही स्त्रोत आहेत ज्यांचा प्रभाव संविधानाच्या अंमलबजावणी नंतर दिसुन येऊ लागला त्या म्हणजे न्यायालयीन निर्णय, घटना दुरूस्ती व संवैधानिक प्रणाली. वरील सर्व गोष्टीची चर्चा सविस्तरपणे पुढील प्रमाणे आहे.

### (१) संवैधानिक कायदे मंडळातील चर्चा

कॅबिनेट मिशन प्लॅननुसार भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी एक संवैधानिक कायदे मंडळ अस्तित्त्वात आले ज्याला घटना समिती असेही म्हणतात. यामध्ये नामवंत वकिल, बौद्धिक वर्गाचे प्रतिनिधी (विद्वान), स्वातंत्र्य चळवळीतील ज्येष्ठ नेते यांचा समावेश होता. या सर्वांना संविधान निर्मितीसाठी २ वर्षे ११ महीने व १८ दिवस एवढा कालावधी लागला. या मागील उद्देश एकच होता की संविधानाच्या प्रत्येक संकल्पनेवर विस्तृत, व्यापक व सर्व समावेशक मुक्त चर्चा व्हावी. अशा प्रकारच्या चर्चामुळे उच्च दर्जाची बौद्धिक मत, मतांतरे संविधानाच्या प्रत्येक भागाच्या निर्मितीच्या वेळी समोर येत असत त्यामुळे संविधान निर्मितीची प्रक्रिया ही सर्व प्रकारच्या बौद्धिक, भावनिक, मानसिक स्तरांतुन यशस्वीपणे मार्गक्रमण करत निर्माण झाली आहे.

### (२) कायदे मंडळातील विविध समित्यांचे अहवाल

संवैधानिक कायदे मंडळाने विविध प्रकारच्या समित्यांची निर्मिती केली होती. त्यांची मुख्य जबाबदारी म्हणजे संबंधित विषयावर विस्तृत आणि व्यापक व सर्वसमावेशक अहवाल तयार करणे. काही महत्त्वाच्या समित्या म्हणजे केंद्रीय अधिकार समिती, केंद्रीय संवैधानिक समिती, प्रादेशिक संवैधानिक समिती, नागरीक, अल्पसंख्यांक, आदिवासी आणि वंचितांच्या हक्कासाठी समिती, सर्वोच्च न्यायालयासाठी ॲडहॉक समिती, केंद्र – राज्य आर्थिक संबंधासाठी समिती वरील सर्व समित्यांचे अहवाल बारकाईने व विस्तृतपणे मसुदा समितीसमोर मांडले जात व त्यावर चर्चासुद्धा होत असे. या समित्यांच्या अहवालामुळेच संविधान निर्मितीची प्रक्रिया सुलभपणे पार पडली.

### (३) नेहरू रिपोर्ट

ब्रिटीश सरकारने 'सायमन कमिशन' स्थापना केला याचे मुख्य कार्य म्हणजे १९१९ च्या भारत सरकारच्या कायद्याच्या अंमलबजावणीवर अहवाल सादर करणे आणि संवैधानिक तरतुदी सुचवणे ज्यामुळे प्रशासन जास्त कार्यक्षम होईल.

कॉंग्रेसने या कमिशन चा कडाडुन विरोध केला याचे मुख्य कारण म्हणजे ह्या कमिशनवर एकही भारतीय प्रतिनिधी नव्हता. त्यामुळे कॉंग्रेसने पं. मोतिलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. ज्यामध्ये भारताला संवैधानिक दर्जा प्राप्त होण्याबाबत विस्तृत अहवाल निर्माण करण्यात आला.

## (४) काँग्रेसचे लाहोर अधिवेशन

१९३० च्या लाहोर येथील काँग्रेसच्या अधिवेशनात भारताला प्रजासत्ताक गणराज्याचे स्वरूप देण्याविषयी चा ठराव संमत झाला.

## (५) १९३५ चा भारत सरकारचा कायदा

स्वतंत्र भारताच्या संविधानात निर्मितीच्या प्रक्रियेच्या वेळेस भारतीय प्रशासन हे १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यानुसार चालत होते. त्यामुळे संविधान निर्मितीवरील या कायद्याचा प्रभाव आपल्याला स्पष्टपणे दिसून येतो.

प्रामुख्याने खालील तरतुदीवर १९३५च्या कायद्याचा प्रभाव आपल्याला भारतीय संविधानावर जाणवतो;

(१) संघराज्यीय स्वरूप,

(२) संघ यादी, प्रांतिक यादी व समावर्ती यादी यामध्ये अधिकारांची विभागणी,

(३) प्रादेशिक स्वायत्तता,

(४) राज्यपालांचे कार्यालय

(५) द्विगृही कायदे मंडळ

(६) सर्वोच्च न्यायालयाची संरचना

## (६) पं. जवाहरलाल नेहरू यांचा प्रस्ताव

१३ डिसेंबर १९४६ रोजी जवाहरलाल नेहरू यांनी घटना समितीत एक प्रस्ताव मांडला होता, ज्याचा स्विकार घटना समितीने २२ जानेवारी १९४७ रोजी केला. या प्रस्तावाचा स्वीकार केल्यामुळे घटनाकारांचा मार्ग निश्चित झाला. या प्रस्तावात त्यांनी असे सांगितले की, भारत एक स्वातंत्र व सार्वभौम गणराज्य असेल, जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकिय न्याय दिला जाईल त्याचबरोबर सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असुन समता स्थापित केली जाईल. तसेच अल्पसंख्याक, मागास जाती व जमाती व इतर मागासवर्गीयांना आवश्यक ते संरक्षण दिले जाईल.

## (७) विविध राज्यघटनांचा संविधान निर्मितीवरील प्रभाव

खालील नमुद केलेल्या देशांच्या राज्यघटनांतुन संविधान निर्मात्यांनी बऱ्याच संकल्पना घेतल्या असुन त्याचा उद्देश भारतीय संविधान जास्त कार्यक्षम व समाजउपयोगी असावे असा होता.

**(१) ब्रिटनची राज्यघटना : ब्रिटनच्या राज्यघटनेचा प्रभाव खालील गोष्टींवर दिसून येतो.**

- संवैधानिक राष्ट्र प्रमुख
- दुसरे सभागृह (कायदेमंडळ) म्हणजेच लोकसभेला जास्त अधिकार
- मंत्रिमंडळाची कायदेमंडळाविषयक सामुहीक जबाबदारी
- संसदीय शासन व्यवस्था
- कायद्याचे राज्य

**(२) अमेरिकेची राज्यघटना : अमेरिकेच्या राज्यघटनेचा प्रभाव खालीलप्रमाणे आहे.**

- संविधानाची उद्देश पत्रिका
- मुलभुत अधिकारांची तरतुद
- उप-राष्ट्रपतींची कर्तव्ये
- घटना दुरूस्तीची तरतुद
- सर्वोच्च न्यायालयाचे स्वरूप व कार्य
- स्वतंत्र न्यायपालीका

(३) **ऑस्ट्रेलियाची राज्यघटना :** ऑस्ट्रेलियाच्या राज्यघटनेतुन समावर्ती सुचींमधील विषय व केंद्र-राज्य यांमधील समावर्ती सुचींमधील विषयावरील केंद्राचा वरचष्मा व वाद संपविण्याचे मार्ग स्पष्ट केलेले आहेत.

(४) **आर्यलँडची राज्यघटना :** राज्याची मार्गदर्शक तत्त्वे व राज्यसभेसाठी नेमणुकीची पद्धत ही आर्यलँडच्या राज्यघटनेमधून घेतलेली आहे.

(५) **जर्मनीची राज्यघटना :** राज्यघटनेचा प्रभाव आपल्याला राष्ट्रपतींच्या अधिकारांवर स्पष्टपणे दिसून येतो.

(६) **कॅनडाची राज्यघटना :** कॅनडाच्या राज्यघटनेतून सशक्त राष्ट्राची संकल्पना, भारत हा एक संघ आणि केंद्रिय विशेषाधिकार या संकल्पना घेतल्या आहेत.

(७) **दक्षिण आफ्रिकेची राज्यघटना :** दोन तृतीयांश बहुमताने घटना दुरूस्तीची पद्धत, राज्यसभेतील सदस्यांची राज्य कायदेमंडळामार्फत सप्रमाण प्रतिनिधीत्त्वाद्वारे निवडणुकीची व्यवस्था या सर्व बाबी दक्षिण आफ्रिकेच्या राज्यघटनेवरून घेतलेल्या आहेत. या व्यतिरिक्त अजुन असे काही स्त्रोत आहेत की, जे संविधान अंमलात आल्यानंतर किंवा कार्यान्वित झाल्यानंतर प्रकर्षाने समोर येऊ लागले. जसे घटनादुरूस्ती विधेयके, न्यायालयीन निर्णय प्रक्रिया, संवैधानिक पद्धती, संसदीय नियम व कायदे या सर्व बाबींचा परिणाम असा झाला की त्यामुळे भारतीय संविधानाचे एक प्रकारे सशक्तीकरण, सबलीकरण झाले व कायद्याचे राज्य ही संकल्पना मोठ्या प्रमाणात सुदृढ झाली.

## (८) घटना दुरूस्ती विधेयके

भारतीय संविधान/घटनेत दुरूस्ती किंवा बदल करण्यासाठी विषयांची तीन गटांत विभागणी करण्यात आली असुन प्रत्येक गटातील विषयांशी संबंधीत घटनादुरूस्तीसाठी वेगवेगळी पद्धत दिलेली आहे. घटनादुरूस्तीच्या या तीन पद्धतींचे घटनेमध्ये दुरूस्ती करता येते.

- संसदेच्या साध्या बहुमताने करता येणाऱ्या घटना दुरूस्त्या;
- संसदेच्या विशेष बहुमताने केल्या जाणाऱ्या घटना दुरूस्त्या
- संसदेच्या विशेष बहुमताची व घटक राज्यांच्या मान्यतेची आवश्यकता असणाऱ्या घटना दुरूस्त्या असे तीन प्रकारे वर्गीकरण करता येते.

भारतीय घटना दुरूस्तीच्या प्रक्रियेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे कोणतीही घटना दुरूस्ती संसदेच्या संमतीखेरीज होऊ शकत नाही. घटनेत दुरूस्ती करण्याबाबत संसदेलाच खरे अधिकार प्राप्त झाले आहेत. घटनादुरूस्ती प्रक्रियेमधील संसदेची भुमिकाच निर्णायक स्वरूपाची आहे. घटना दुरूस्तीच्या पहिल्या दोन पद्धतींत तर एकट्या संसदेलाच सर्वाधिकार मिळाले आहेत. तिसऱ्या पद्धतीत संसदेच्या जोडीने घटक राज्यांच्या कायदे मंडळांनाही काही अधिकार प्राप्त झाले आहेत. परंतु या पद्धतीतही संसदेची भुमिकाच अधिक महत्त्वाची आहे. कारण घटना दुरूस्तीच्या प्रक्रियेचा प्रारंभ संसदेपासुनच होतो. म्हणजे घटना दुरूस्तीचे विधेयक संसदेच्या कोणत्याही एका सभागृहात प्रथम मांडले जाऊ शकते. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी ते संमत केले की मग ते घटक राज्यांच्या कायदे मंडळांकडे पाठविले जाते. घटना दुरूस्ती विधेयक घटक राज्यांच्या कायदे मंडळाच्या सभागृहात प्रथम मांडले जाऊ शकत नाही. घटनाकारांनी घटनेत दुरूस्ती करण्याचे बहुतांशी अधिकार संसदेलाच दिले आहेत.

वरील सर्व बाबी लक्षात घेता घटनेत वेळोवेळी केल्या गेलेल्या घटना दुरूस्त्यामुळे घटनेला नविन व बळकट स्वरूप प्राप्त झाले आहे.

## (९) न्यायालयीन निर्णय प्रक्रिया व घटनादुरूस्ती

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयामुळेसुद्धा संविधानाला दिशा देण्याचे व त्यांतील मुल्ये जास्त प्रखरपणे समोर आणण्याचे काम केले आहे. अशाच प्रकारच्या विविध निर्णय प्रक्रियेच्या प्रकाश झोतातच घटना दुरूस्ती विधेयकांची अंमलबजावणी होत असते. काही महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय खालीलप्रमाणे आहेत;

(१) गोपालन विरूद्ध मद्रास राज्य

(२) मद्रास राज्य विरूद्ध चंपाकम

(३) गोलकनाथ विरूद्ध पंजाब राज्य

(४) केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य

(५) उन्नीकृष्णन आणि इतर विरूद्ध आंध्रप्रदेश

## (१०) संसदीय नियम (कायदे)

भारतीय संविधानातील कलमांमध्ये सुस्पष्टता आणण्यासाठी वेळोवेळी संसदेने काही नियम बनवले आहेत. संविधानानेच

तसा अधिकार संसदेला बहाल केला आहे. या नियमांना संविधानिक कायद्याचे स्वरूप प्राप्त असते. त्यांच्याशिवाय संविधानाचा बारकाईने अभ्यास करणे शक्य होणार नाही.

(०१) प्रतिबंधित स्थानबद्धतेचा कायदा १९५०,

(०२) लोकप्रतिनिधींचा कायदा १९५० आणि १९५१,

(०३) भारतीय नागरिकतेचा कायदा १९५३,

(०४) आर्थिक आयोग कायदा १९५१,

(०५) राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणुक कायदा १९५२ व १९७७

(०६) राज्य पुर्नरचना कायदा १९५६,

(०७) सर्वोच्च न्यायालय (न्यायाधिशांची संख्या) कायदा १९५६, १९६१, १९८५,

(०८) विधान परिषद कायदा १९५७,

(०९) कार्यालयीन भाषा कायदा १९६३ व १९६८,

(१०) पाँडेचरी (प्रशासन) कायदा १९५७,

(११) पंजाब पुर्नरचना कायदा १९६६,

(१२) गैरकायदेशीर हालचाल रोखण्यासंबंधीचा कायदा १९६७,

(१३) राष्ट्रपती (कर्तव्य निर्वहन) कायदा १९६९,

(१४) अंतर्गत सुरक्षा निर्वहन कायदा १९७१,

(१५) परकीय चलन संरक्षण व तस्कर विरोधी कायदा १९७४,

(१६) नागरी हक्क संरक्षण कायदा १९७६

## (११) संवैधानिक पद्धती

भारतीय संविधान हे जगातील सर्वात बारकाईने लिहिल्या गेलेल्या संविधानापैकी एक असुन काही सवैधानिक पद्धती निर्माण झाल्या आहेत परंतु त्या पद्धतीमुळेसुद्धा संविधानात बळकटी देण्याचे कार्य केले आहे. याबाबतची काही खलील उदाहरणे आहेत.

(१) केंद्र सरकारला राज्यपालाच्या नियुक्ती अगोदर राज्य सरकारची अनुमती घ्यावी लागेल.

(२) राज्यपाल हा संबंधित राज्याचा रहिवासी नसावा,

(३) सर्वोच्च न्यायालयातील किमान एक तरी न्यायाधीश हा अल्पसंख्यांक समुदायातील असावा.

(४) सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश म्हणून सर्वात वरिष्ठ न्यायाधीशाची नेमणूक करण्यात यावी.

(५) संविधानातील 'मंत्रिमंडळ' या शब्दाचा अर्थ म्हणजे 'कॅबीनेट'

(६) लोकसभेतील बहुमत प्राप्त झालेल्या पक्षाचा नेता हाच पंतप्रधान म्हणुन नियुक्त केला जातो.

अशा प्रकारचे स्त्रोत हे भारतीय संविधानाचे असुन आजपर्यंतची वाटचाल या स्त्रोतांमुळेच परिपूर्ण होत असल्याचे आपल्याला पहावयास मिळते.

## १.२.२ भारतीय संविधानाची मुलभुत वैशिष्ट्ये

भारतीय संविधानाची मुलभुत वैशिष्ट्ये ही खालीलप्रमाणे आहेत;

(०१) **जनतेचे सार्वभौमत्त्व :** भारतीय संविधानाची मुळ शक्ती व आधार भारतीय जनता असुन अंतिम सत्ता ही जनतेच्या हातात आहे. सत्तेच्या प्राप्तीसाठी लोकप्रतिनिधींना जनतेलाच आश्वस्त करावे लागते तरच त्यांच्या सत्ता प्राप्तीचा मार्ग मोकळा होतो.

(०२) **लिखित व व्यापक राज्यघटना :** भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना समजली जाते. यामध्ये ३९५ कलमे, १२ अनुसुची असून हे सर्व २२ भागांत विभागलेले आहे.

(०३) **सार्वभौम लोकशाही गणराज्य :** भारतीय संविधानानुसार भारत हा सार्वभौम लोकशाही गणराज्य आहे ज्याचा अर्थ;
**सार्वभौम :** अंतर्गत व बाह्य पूर्णपणे स्वातंत्र्य

**लोकशाही :** लोकशाही प्रजासत्ताक सर्व सत्ता जनतेच्या हातात

**गणराज्य :** राष्ट्रप्रमुख हा जनतेने निर्वाचित केलेला असतो.

(०४) **परिदृढ व परिवर्तनीय :** साधारणतः राज्यघटना ही परिदृढ किंवा परिवर्तनीय असते. परिवर्तनीय राज्यघटनेत कायद्यात बदल करणे सहज शक्य असते या उलट परिदृढ घटनेमध्ये विशिष्ट घटनात्मक पद्धतीचा अवलंब करूनच कायद्यात बदल शक्य होतात. त्यामुळे ती प्रक्रिया किचकट व कठिण होऊन बसते. परंतु भारतीय घटनाकारांनी या दोन्ही गोष्टींचा सुवर्णमध्य साधला असुन भारतीय घटना ही सहज परिवर्तनीय जरी नसली तरी किचकट व परिदृढसुद्धा नक्कीच नाही.

(०५) **धर्मनिरपेक्ष राष्ट्र :** धर्मनिरपेक्ष राष्ट्र किंवा राज्य याचा अर्थ म्हणजे राज्याला कुठलाही धर्म नाही किंवा राज्य हे एखाद्या विशिष्ट धर्माच्या अनुसार शासन व्यवस्था चालवत नाही. येथे धर्म, पंथ, आस्था, विश्वास या बाबतीत कुठलाही भेदभाव होणार नाही. 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द ४२व्या घटना दुरूस्तीने संविधानाच्या उद्देशपत्रिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला असुन, मुळ संविधानामधे तो प्रथमपासुन नाही.

(०६) **एकात्मिक संघराज्य :** भारतीय राज्यघटनेमध्ये जरी 'संघराज्य' असा शब्द प्रत्यक्षात नसला तरी पहिल्या कलमात 'भारत हा राज्यांचा संघ आहे' असे म्हटले आहे. भारतात केंद्र व राज्य अशा दोन प्रकारची शासन व्यवस्था असुन केंद्र प्रभाव आहे. तरीसुद्धा संघराज्यीय स्वरूपाची स्थुल वैशिष्ट्ये यामधे सामावून घेतलेली दिसुन येतात. आणीबाणीच्या काळात संघराज्यीय स्वरूप एकात्मिक शासन व्यवस्थेमध्ये शासन होईल याची काळजी घेण्यात आली आहे.

(०७) **संसदीय शासन प्रणाली :** भारतीय संसदीय प्रणाली ही जगातल्या सर्वात मोठ्या संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेपैकी एक होय. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक चांगल्या वाईट अनुभवातुन यशस्वीपणे मार्गक्रमण करीत ही शासन प्रणाली भक्कमपणे उभी आहे. संसदीय शासन व्यवस्थेमधे जनतेचे सार्वभौमत्त्व हे जास्त प्रभावीपणे पहावयास मिळते. जनतेने विश्वास दाखवला तरच सत्ता प्राप्त होते. अन्यथा नाही.

(०८) **मुलभुत अधिकार व कर्तव्ये :** मुलभुत अधिकार हे व्यक्तिच्या सर्वांगीण विकासाचा स्त्रोत असतो आणि जर त्याला कायद्याचे भक्कम पाठबळ मिळाले तर सर्वसाधारण परिस्थितीत शासनसुद्धा त्या अधिकारांवर निर्बंध आणु शकत नाही. राजकिय व्यवस्थेला वळण लागण्यासाठी व तीला बळकटी आणण्यासाठी मुलभुत कर्तव्यांचा समावेश ४२व्या घटनादुरूस्तीने करण्यात आला.

(०९) **मार्गदर्शक तत्त्वे :** मार्गदर्शक तत्त्वे शासनाने आपले धोरण व कर्तव्य ठरवताना लक्षात ठेवण्याच्या बाबी संबंधी असुन त्याची अंमलबजावणी न्यायालयामार्फत होऊ शकत नाही.

(१०) **स्वतंत्र न्यायपालीका :** जनतेच्या हिताच्या रक्षणासाठी व कायद्याच्या राज्याच्या रक्षणासाठी स्वतंत्र न्यायपालिका असणे गरजेचे असते. भारताचे राजकिय स्वरूप जसे संविधानामधे वर्णिलेले आहे ते कायम ठेवण्यासाठी व घटनाबाह्य कायदानिर्मिती होऊ नये यासाठी स्वतंत्र न्यायपालिका असणे अपेक्षित आहे.

(११) **प्रौढ मताधिकार :** भेदभाव विरहित शासन व्यवस्था निर्माण करण्यासाठी १८ वर्षावरील भारतीय स्त्री पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला आहे. भारतातील मतदारांची संख्या लक्षात घेता भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे.

(१२) **एकेरी नागरिकत्त्व :** भारताचा इतिहास पाहता व एकात्मिक राष्ट्र संकल्पना टिकवुन ठेवण्यासाठी भारतामध्ये एकेरी नागरीकत्त्वाची संकल्पना स्वीकारलेली आहे. केवळ अनिवासी भारतीयांसाठी दुहेरी नागरिकत्त्वाची सुट काही नियमांच्या अधिन राहुन देण्यात आलेली आहे.

(१३) **अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांसाठी खास व्यवस्था :** भारत हा विविधतेने नटलेला देश असुन येथे विविध धर्म, भाषा-संस्कृती आहेत या सर्वांचे संरक्षण, संगोपन करताना त्यांना राष्ट्र विकासाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांसाठी खास व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(१४) **न्यायालयीन पुनर्विलोकन :** संविधानाच्या मुलभुत चौकटीचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही न्यायपालीकेची असुन घटनाबाह्य कायदानिर्मितीला आक्षेप घेणे, रद्द करणे या सर्व गोष्टींचा त्यात अंतर्भाव होतो. यामधे केंद्रीय कायदेमंडळा व्यतिरिक्त राज्याची कायदे मंडळे सुद्धा येतात.

### १.२.३ भारतीय संविधानाची मूल्ये व तत्त्वज्ञान

**आता या भागात आपण संविधानाची मुल्ये व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करणार आहोत.**

(०१) **न्याय :** यामध्ये व्यक्तिगत हित हे समाजहिताशी जोडले गेले असुन त्याद्वारे भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकिय न्याय मिळवून देण्याचा संकल्प संविधानकर्त्यांनी केलेला आहे.

(०२) **स्वातंत्र्य :** लोकशाही समाज व्यवस्थेमध्ये पूर्ण व्यक्तिगत स्वातंत्र्य ही आवशक बाब असुन व्यक्तिचा विकास हा त्यावरच अवलंबुन असतो. येथे स्वातंत्र्य म्हणजे अनावशक मर्यादा नाकारून व्यक्तिला पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करून देणे ज्यामुळे त्याचा सर्वांगीण विकास घडून येईल.

(०३) **समता :** समतेचा अर्थ सर्व व्यक्ती ह्या शारीरिक मानसिक अथवा बौद्धिकदृष्टीने सारख्या आहेत असा नसुन सर्वांना समान संधी उपलब्ध व्हाव्यात असा आहे. अशा समान संधी ह्या कायद्याचे राज्य, भेदभाव विरहित पदाधिकार ह्या संबंधीशी निगडीत आहेत. कायद्यासमोर सर्व समान व सर्वांना समान संरक्षण या नियमाने समतेचे तत्त्व आपल्याला लक्षात घेतले पाहिजे.

(०४) **बंधुता :** विश्वबंधुता हि संकल्पना प्राचीन भारताच्या संस्कृतीशी निगडीत असुन वेद उपनिषदे यामध्ये सुद्धा त्यांचा उल्लेख आढळून येतो. सर्व मनुष्य हे जन्माने स्वतंत्र असुन त्यांची प्रतिष्ठा व हक्क समान आहेत. भारतातील धर्म, जात, भाषा, पंथ, इ. वैविध्य लक्षात घेता बंधुतेची संकल्पना ही राष्ट्राला बळकट करणारी आहे.

(०५) **धर्मनिरपेक्षता :** धर्मनिरपेक्षता हे भारतीय संविधानाचे सर्वात महत्त्वाचे मुल्य/तत्त्वज्ञान आहे. राष्ट्राचा कुठलाही धर्म नसुन प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माप्रमाणे आचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. सर्व धर्म एक समान आहेत.

(०६) **लोकशाही :** सत्ता स्थापन करण्यासाठी जनतेमार्फत लोकप्रतिनिधीची होणारी निवडणुक म्हणजे शासनाचा स्त्रोत ही जनता आहे.

(०७) **सर्वोदय :** ही संकल्पना / मूल्य महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, जयप्रकाश नारायण यांच्या विचारातुन घेतलेले असुन यांमधे सर्व व्यक्तिंचा भौतिक, अध्यात्मिक, बौद्धिक व मौलिक विकास साधला जावा अशी व्यवस्था करण्यात यावी याबाबतचा आहे.

(०८) **समाजवाद :** भारतीय समाजवादाची संकल्पना ही पं. जवाहरलाल नेहरूंची असुन ती अतिशय नाविन्यपूर्ण आहे. यामध्ये समाज केंद्रित विकास अपेक्षित असून व्यक्तिचा सर्वांगीण विकास हा सशक्त समाज व्यवस्थेमुळेच होऊ शकतो अशी संकल्पना सांगितली आहे.

(०९) अध्यात्मवाद : त्याग, शांती, अहिंसा, सहिष्णुता, परस्पर सहकार्य आदी मुल्ये संविधानात समाविष्ट असुन त्याद्वारे सामाजिक कल्याण साधण्याचा हेतु आहे.

(१०) **मानवता :** भारतीय तत्त्वज्ञानामध्ये संपुर्ण मानव हे एक कुटुंब असुन राष्ट्रा-राष्ट्रांतील संबंध परस्पर सहकार्य व सहमतीने चालविण्याचा आग्रह दिसून येतो. याचे उदाहरण म्हणजे राज्याची मार्गदर्शक तत्त्वे.

(११) **विकेंद्रीकरण :** विकेंद्रीकरण हे सर्वोदय संकल्पनेतील एक तत्त्वज्ञान असुन 'पंचायत राज व्यवस्था' हे त्याचे उदाहरण आहे. महात्मा गांधींजी विकेंद्रीकरणाविषयी आग्रही भुमिका मांडली होती.

(१२) **उदारमतवाद :** भारतीय उदार मतवाद हा पाश्चात्य उदात्मवादाशी निगडित नसुन यामधे स्व-शासन, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, आर्थिक विकास, संवैधानिक दृष्टीकोण, प्रातिनिधीक स्वरूपाच्या शासकिय संस्था या सर्व मुल्यांचा समावेश भारतीय संविधानामधे केला गेलेला आहे.

(१३) **मिश्र अर्थव्यवस्था :** खाजगी व शासकीय या दोन्ही क्षेत्रांचा संयोग आर्थिक विकास, स्वावलंबन व प्रगती या तिन्ही गोष्टींसाठी करून घेणे व मुलभुत गरजेच्या वस्तुंचे उद्योग सरकारी क्षेत्रात ठेवणे याला मिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात.

(१४) **गांधीवाद :** अहिंसा, सत्याग्रह, अस्पृशता निवारण, ग्रामोद्योग, प्रौढ शिक्षण, ग्रामिण भागांचा सर्वांगीण विकास, इ. मुल्ये महात्मा गांधीच्या विचारातुन/तत्त्वज्ञानातुन घेण्यात आलेली असुन कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी त्याची आवशकता आहे.

(१५) **भारतीय राष्ट्रीय चळवळ व स्वातंत्र्य लढा :** भारतातील स्वातंत्र्य लढ्याची चळवळ व यामधुन निर्माण झालेले तत्त्वज्ञान म्हणजे सार्वभौम प्रजासत्ताक, लोकशाही गणराज्य होय. संविधानकारांनी या सर्व मुल्यांचा समावेश करण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पारतंत्र्यांच्या, गुलामीच्या जोखडीतुन मुक्त झाल्यानंतर भारतीय समाजाला स्वातंत्र्याची नवी उमेद, दिशा,

मार्ग दाखविणे असा आहे. त्यानंतर १९७७मध्ये संविधानात धर्मनिरपेक्ष व समाजवाद या दोन मुल्यांचा समावेश करण्यात आला ज्या बाबत विस्तृतपणे आपण आधीच चर्चा केलेली आहे.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) घटना समितीचे अध्यक्ष कोण होते?

(२) भारतीय संविधान निर्माण करण्यासाठी किती कालावधी लागला?

(३) कायद्याचे राज्य ही संकल्पना कोणत्या देशाच्या राज्यघटनेतून घेतलेली आहे?

(४) ४२व्या घटना दुरूस्तीद्वारे उद्देश पत्रिकेमध्ये कोणते दोन शब्द टाकण्यात आले?

(५) १९३० साली काँग्रेसचे अधिवेशन कोठे पार पडले?

# १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**सार्वभौमत्त्व :** राज्यातील सर्वश्रेष्ठ आणि अंतिम सत्ता राज्यातील सर्व कायद्यांचे उगमस्थान ही सत्ता असते. या सत्तेवर कायद्याचे बंधन नसते. सार्वभौमत्त्वाचे अंतर्गत आणि बाह्य सार्वभौमत्व असे दोन घटक आहेत.

**समाजवादी :** सर्व जनतेला प्रतिष्ठा व समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था. समता व स्वातंत्र्य यांचा मेळ घालू इच्छिणाऱ्या उदारमतवादी लोकशाही संस्थामार्फत समताधिष्ठित समाज आणू इच्छिणाऱ्या विचारव्यूहास समाजवाद म्हणतात.

# १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद हे होते.

(२) भारतीय संविधान निर्माण करण्यासाठी २ वर्षे ११ महिने १८ दिवस इतका कालावधी लागला.

(३) कायद्याचे राज्य ही संकल्पना ब्रिटिश राज्यघटनेतून घेतलेली आहे.

(४) ४२व्या घटना दुरूस्तीद्वारे उद्देश पत्रिकेमध्ये धर्मनिरपेक्ष, समाजवादी हे दोन शब्द टाकण्यात आले.

(५) १९३० साली काँग्रेसचे अधिवेशन लाहोर येथे पार पडले.

# १.५ सारांश

प्रत्येक संविधान ही इतिहासाची निर्मिती असते. कोणत्याही राष्ट्रातील विशिष्ट प्रकारच्या ऐतिहासिक परिस्थितीतुनच त्या देशाचे संविधान तयार होत असते. भारताचे संविधानसुद्धा याला अपवाद नाही. भारतातील धर्म, जात, पंथ, भाषा, प्रांत याचे वैविध्य लक्षात घेऊन जो कायदा निर्माण केला त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील जनतेचा कायद्याचे राज्य या संकल्पनेवरील विश्वास दृढ झाल्याचे दिसून येते. सार्वभौम लोकशाही गणराज्य स्थापन करण्यासाठी जनतेद्वारा लोकप्रतिनिधींची शासन व्यवस्था निर्माण करण्याचे तंत्र यांमधे स्पष्टपणे दाखविले आहे. स्वतंत्र न्यायपालिकेद्वारे नागरिकांच्या अधिकारांवर, हक्कांवर कुठल्याही शासकिय अथवा अशासकिय निर्बंध आणता येणार नाहीत अशी व्यवस्था त्यामधे झाल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता ही मुल्ये रूजवताना संविधान राज्यांची मार्गदर्शक तत्त्वे व मुलभुत कर्तव्ये यांची जाणीवसुद्धा करून देते ज्यामुळे संविधानाचा गाभा सुरक्षित राहील.

एकेरी नागरीकत्त्व हे राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता यांचे संगोपन व संरक्षण करण्यासाठी स्थापित केलेले मुल्य असुन त्याद्वारे राष्ट्रविरोधी तत्त्वांचा बिमोड करण्याची व्यवस्था यामध्ये केलेली आहे.

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ, व विविध देशांच्या राज्यघटना/संविधान यांमधील तसेच विविध भारतीय व्यक्ती, संस्कृती यांतील मुल्ये यामुळे भारतीय संविधान हे कायद्याचे एक परिपूर्ण स्वरूप आहे असे दिसुन येते.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारतीय संविधानातील तत्त्वज्ञान व मूल्ये स्पष्ट करा?

(२) भारतीय संविधानातील मूलभूत वैशिष्ट्याची चर्चा करा?

(३) भारतीय संविधानाच्या स्त्रोतांबाबत माहिती द्या?

(४) उद्देशपत्रिका म्हणजे काय? सविस्तर माहीती द्या?

(५) ''संविधान हे शरीर व उद्देशपत्रिका आत्मा'' विधानाचे स्पष्टीकरण द्या?

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) नारंग ए. एस. (२०००). *इंडियन गव्हर्मेंट ॲण्ड पॉलिटिक्स.* न्यू दिल्ली, गितांजली पब्लिशिंग हाऊस.

(२) चंदर, पी. (२००१). *इंडियन गव्हर्मेंट ॲण्ड पॉलिटिक्स.* न्यू दिल्ली, कॉसमॉस बुक हाईव.

# घटक २ : संविधानवाद

***अनुक्रमणिका***


२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय-विवेचन
    २.२.१ संविधान म्हणजे काय?
    २.२.२ संविधानवादाचा अर्थ व व्याख्या
    २.२.३ संविधानवादाची वैशिष्ट्ये
    २.२.४ संविधानवादाचे अन्वय
२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला -

- संविधान म्हणजे काय हे समजून घेता येईल.
- संविधानवादाची संकल्पना समजून घेता येईल.
- भारतीय संविधानाचा संविधानवादाशी असलेला संबंध समजून घेता येईल.
- भारतीय संविधानातील मुल्यांचा परिणाम लक्षात येईल.
- संविधानवादाची निर्मितीची प्रक्रिया समजून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक

राज्यामधील प्रशासकीय व्यवस्थेचे काळजीपूर्वक संचलन करण्यासाठी अथवा राज्यकारभार व्यवस्थितपणे चालविण्यासाठी कायद्याची आवशकता असते. कायदा हा सुचीबद्ध असायला हवा ज्यामुळे प्रशासनाच्या कार्याचे विभाजन करणे सोपे जाते पर्यायाने कारभार सुरळीत चालविता येतो. संविधान अशाच सुचीबद्ध कायद्याची मांडणी करते ज्यामुळे शासकिय व्यवस्थेतील विविध संस्थांना आपले संरचना व कार्य याबाबत संपूर्ण मार्गदर्शन व ज्ञान प्राप्त होत असते. त्याच बरोबर नागरिकांचे हक्क व कर्तव्याबाबतसुद्धा संविधानात सुस्पष्ट मांडणी केलेली असते. केवळ लोकशाही राष्ट्रातच नव्हे तर बिगर लोकशाही राषट्रातसुद्धा संविधानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

भारतीय संविधानातसुद्धा प्रत्येक बाबींवर स्वतंत्र व स्पष्टपणे कायद्याची निर्मिती केली गेलेली असून भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठ्या लोकशाही गणराज्याचे यशस्वी व लिखित संविधान म्हणुन ओळखले जाते.

## २.२ विषय–विवेचन

राज्याच्या सार्वभौम शक्तीचे संचलन करण्याचे कार्य हे संविधानामार्फत केले जाते. लोकप्रशासनाच्या अभ्यासात 'संविधानवाद' ही अतिशय नवीन संकल्पना असुन यामधे कायदा व नियम याद्वारे राजकिय व्यवस्थेचे नियंत्रण, संचलन व निर्मिती कशाप्रकारे केली जावी याबाबत बारकाईने विश्लेषण व मार्गदर्शन केलेले असते. संविधानवादाचा अर्थ सुस्पष्ट करताना आपण हे समजुन घ्यायला हवे की यामध्ये कायद्याच्या राज्याला प्राधान्य किंबहुना अग्रक्रम दिलेला असुन कुठल्याही व्यक्तीविशेषाला प्रधान्य दिलेले नाही. यांची जडणघडण ही प्रामुख्याने राष्ट्रवाद, लोकशाहीचे तत्व, मर्यादित शासन पद्धती यातुन झालेली दिसुन येते. सत्तेचे विकेंद्रीकरण करतानाच प्रत्येक बाबींना योग्य न्याय देत जबाबदारी ही शासनावर टाकण्यात आलेली असते.

### २.२.१ संविधान म्हणजे काय ?

संविधानवाद समजुन घेताना संविधान म्हणजे काय? याची माहीती आपल्याला असणे अत्यंत आवशक आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर ''संविधान म्हणजे अशा प्रकारच्या तत्वांचा/मुल्यांचा संच ज्यामुळे शासकीय अधिकार, नागरीकांचे हक्क, आणि या दोहोंतील सुस्थापित संबंध कसे असावेत याबाबत केलेले विश्लेषण होय.'' भारतीय संविधान हेसुद्धा अशाच कायद्याचे निर्वहन करित असुन यशस्वीपणे कार्यरत आहे.

संविधानामार्फत अशा प्रकारच्या राजकीय समाज जीवनाची निर्मिती केली जाते. ज्याला कायद्याचे पाठबळ असुन त्याच कायद्याद्वारे अशा प्रकारच्या कायमस्वरूपी शासकीय संस्था निर्माण केल्या जातात ज्यांचे कार्य व अधिकार वैधानिक पद्धतीने सांगितले जातात.

सर्वप्रथम आपल्याला हे लक्षात घ्यायला हवे की, संविधानामधे शासनाच्या कार्यपद्धतीच्या बाबत संपूर्ण बारकाईने मार्गदर्शन केलेले असते. त्याचराबरोबर संविधानामधे नमुद केलेल्या कायदे, नियम या व्यतिरिक्त काही बिगर संवैधानिक परंपरा, रूढी, सांस्कृतीक चालीरिती यांचाही शासनाच्या कारभारावर प्रभाव असला तरी यांचे स्वरूप असंवैधानिक असते तरीही शासनाच्या सुव्यवस्थेला असे सामाजिक नियम नियंत्रित करत असतात.

आता आपण संविधानवाद ही संकल्पना भारतीय संविधानमार्फत कशाप्रकारे कार्यान्वित होते ती पाहु.

भारतीय घटनाकारांनी / संविधानकारांनी राष्ट्रीय एकात्मतेला अतिशय महत्व दिलेले आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेमधे सुद्धा व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राचे ऐक्य व एकात्मता यांची हमी देणारी बंधुता या संबंधीची शाश्वती सर्व भारतीय नागरिकांना देण्यासंबंधीचा उल्लेख आहे. राष्ट्राचे ऐक्य व एकात्मता यांचे संरक्षण करण्यासाठी संविधानकर्त्यांनी काही तरतुदी स्वीकारल्या होत्या. उदा. सशक्त केंद्र व राज्यांना कमी अधिकार, अधिकारांवर मर्यादा, संकटकाळी, राष्ट्रविरोधी कार्यवायांच्या काळात राष्ट्रपतींमार्फत आणीबाणीची तरतुद, इत्यादी

भारतीय संविधानाने लोकशाही ही एक शासनपद्धती नसुन एक जीवन पद्धती आहे असा व्यापक विचार मांडला आहे. धर्मनिरपेक्षतेची संकल्पना सुद्धा धर्म, जात, पंथ इत्यादींना व्यवस्थेत स्थान देत नाही. राज्याला कुठलाही धर्म नाही केवळ कल्याणकारी कायद्याचे राज्य स्थापन करणे हा एकमेव उद्देश आपल्याला संविधानात आढळून येतो.

भारतीय संविधानकर्त्यांनी लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारण्याचे प्रमुख कारण म्हणजे लोकशाही सिद्धांतावर असलेला त्यांचा पूर्ण विश्वास व भारतीय जनतेशी असणारी त्यांची बांधिलकी याशिवाय राजकिय सत्तेचा वापर देशातील सामान्य लोकांच्या कल्याणासाठी झाला पाहीजे. अशी त्यांची धारणा होती. भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला मजबुत तात्विक अधिष्ठान होते. आणि संविधान कर्त्यांचा असा विश्वास होता की, व्यक्तीचे स्वातंत्र्य व जनतेचे मुलभुत हक्क यांचे रक्षण केवळ लोकशाही व्यवस्थेत केले जाऊ शकते. भारतीय संविधानकर्त्यांना या देशात सामाजिक आर्थिक व राजकिय न्याय प्रस्थापित करू शकणारी राजकिय व्यवस्था अभिप्रेत होती. त्याचप्रमाणे व्यक्ती स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मुल्यांना त्यांनी विशेष महत्त्व दिले होते. स्वतंत्र न्याय मंडळाबाबत सुद्धा त्यांचे असे मत होते की, लोकशाहीचे संवर्धन व संरक्षण विकास या सर्व गोष्टी जर साध्य करावयाच्या असतील तर निश्चितच न्यायपालिकेचे स्वतंत्र अबाधित ठेवायला हवे.

भारतीय संविधान व या अंतर्गत असणारी लोकशाहीची संकल्पना याचा विचार एक शासन पद्धती यादृष्टीने केला तर त्यामधे आता बऱ्याच अंशी स्थैर्य आले आहे. भारतीय संविधान आज कार्यान्वित होऊन पासष्ट वर्षाहुन अधिक कालावधी लोटला आहे. भारतीय संविधानाने व राष्ट्राने अनेक कसोटीचे क्षण या काळात पार पाडले असुन संविधान एक प्रकारे बळकट

झाले आहे. भारतीय मतदार, राजकीय संस्था, राजकीय पक्ष व राजकीय नेतृत्व या सर्वांनी विविध कसोट्यांना उतरण्याची क्षमता आपल्या ठिकाणी आहे हे वेळोवेळी सिद्ध केले आहे.

## २.२.२ संविधानवादाचा अर्थ व व्याख्या

प्रथम संविधान व संविधानवाद या दोन भिन्न संकल्पना आहेत हे स्पष्ट केले पाहिजे. संविधान या संकल्पनेचे विवेचन वरती केलेले आहे. त्यावरून हे उघड होते की, कोणत्याही देशातील शासनसंस्थेची रचना, त्याचे परस्परसंबंध आणि अधिकार यांचा संहितीकरण केलेला कायदा म्हणजेच संविधान होय. असे संविदान जसे लोकशाही व्यवस्थेत असते तसे ते राजेशाही, हुकूमशाही किंवा लष्करशाही असलेल्या देशातही असू शकते. याउलट संविधानवादाचा संबंध राज्यसंस्थांच्या अधिकारावर व्यक्ती स्वातंत्र्याच्या हितासाठी घेतल्या जाणाऱ्या मर्यादाशी आहे. अशी मर्यादित अधिकार असलेली राज्यसंस्था फक्त लोकशाही व्यवस्थेतच आढळते.

संविधानवाद म्हणजे शासनाचे अधिकार मर्यादित असणे. शासनावरील मर्यादा संविधानात नमुद केलेल्या असतात किंवा त्या परंपरेने चालत आलेल्या असतात. संविधानवादाची सुरूवात सतराव्या शतकात जॉन लॉक या ब्रिटिश विचारवंताच्या सामाजिक कराराच्या सिद्धांतातून झालेली आढळते. त्यांच्या विचारानूसार शासन चुकिच्या गोष्टी करू शकत नाही आणि जर त्या गोष्टी शासनाने केल्या तर लोकांना ते शासन बदलण्याचा अधिकार असतो. ज्यावेळेस सत्ता विभाजनातून शासनाचे तीन विभाग निर्माण झाले त्यावेळी शासनावर नियंत्रण आणण्याची कल्पना पुढे आली हाच आधुनिक काळातील संविधानवाद होय. आधुनिक काळातील संविधानवाद हा प्रथम अमेरिकन संविधानातून मांडला गेला.

### ● संविधानवादाच्या व्याख्या

संविधानवाद ही अशी तत्त्वप्रणाली आहे की, ज्यामध्ये संविधानाच्या नियम व तत्त्वाच्या आधारे राज्य केले जाते. लोकांचा विश्वास, मूल्य व विचारांचे प्रतिबिंब त्यामध्ये असतात आणि संविदानानूसारच सत्ताधारी वर्गाला प्रतिबंधित किंवा नियंत्रित केले जाते. जेणेकरून प्रत्यक्ष व्यवहारात सत्ताधारी वर्ग निरंकुश होणार नाही आणि लोकांच्या इच्छेनूसार राज्यकारभार करत राहील. संविधानवाद देखील हा एक मर्यादित सरकार आहे. कारण त्यामध्ये निर्बधांची एक प्रणाली आहे.

(१) पिनॅक आणि स्मिथच्या मते, संविधानवाद केवळ प्रक्रिया आणि तथ्येच नाही तर राजकीय संघटनावर प्रभावी नियंत्रण आणि प्राचिन परंपरा आणि भविष्यातील आशा देखील आहे.

(२) सी. एफ. स्ट्राँग यांच्या मते, संविधानवाद हे एक असे राज्य आहे ज्यामध्ये सरकारचे अधिकार आणि शासित अधिकार या दोघांचे संबंध जुळवून घेतले जातात.

(३) कोरी आणि अब्राहम यांच्यामते, प्रस्थापित संविधानाच्या सूचनेनुसार चालणाऱ्या सरकारला संविधानवाद असे म्हणतात.

(४) जे. एस. रौसेफ यांच्यामते, संविधानवादाच्या संकल्पनेतून असे सुचित होते की ते मुलतः प्रशासकीय स्वरूपात मर्यादित सरकार आणि नियंत्रणाची एक प्रणाली आहे. कार्टन आणि हर्झ यांच्यामते, मूलभूत अधिकार आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था ही प्रत्येक संविधानवादाची आवश्यक आणि सामान्य वैशिष्ट्ये आहे.

(५) के. सी. व्हिअर यांच्यामते, संविधानवादाचा अर्थ संविधानानूसार सरकार चालवण्यापेक्षा काहीतरी वेगळाच आहे.

वरील व्याख्यांचा विचार केल्यास असे म्हटले जाऊ शकते की, संविधानवाद म्हणजे जबाबदार आणि मर्यादित सरकार होय.

## २.२.३ संविधानवादाची वैशिष्ट्ये

### (१) मूल्यधारित संकल्पना

संविधानवाद ही एक मूल्यधारित संकल्पना आहे. एक राष्ट्र म्हणून जी मूल्य असतात ती सर्व मूल्य या संकल्पनेत दिसून येतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही, सामाजिक न्याय, जनतेचे कल्याण, इत्यादी तत्त्वांचा यात समावेश होतो. भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर स्विकारलेली पंचशिल तत्त्व आणि अलिप्तवाद यांचा या संकल्पनेशी संबंध येतो.

### (२) संस्कृतीबंद्ध संकल्पना

संविधानवादाचा संबंध ज्या देशामध्ये सामाजिक मूल्यांचा विकास जालेला आहे किंवा होत आहे अशा देशांशी आहे. प्रत्येकी देशांची राजकीय संस्कृती त्या देशातील सामाजिक मूल्यांना देत असते. सामाजिक मूल्य ही देशात सांस्कृतिक परिवर्तन घडून येण्यासाठी साह्यभूत ठरत असतात.

### (३) गतिमान संकल्पना

संविधानवाद ही गतीमान संकल्पना आहे. परिवर्तन ही काळाची गरज आहे. काळानुरूप बदल घडवून आणणे हे संविधानवादाचे वैशिष्ट्ये आहे. कोणताही समाज हा काळानुरूप बदलत असतो. त्यामध्ये नविन्यता येते व नवनविन कल्पनांना तो जन्म देत असतो. त्यातूनच समाज, देश व संस्कृतीचा विकास होत जातो. संविधानवादात हेच अपेक्षित आहे; वर्तमान काळाबरोबरच भविष्यकालिन नविन संकल्पनांचा शोध घेणे व त्याबरोबर गतिमान होणे.

### (४) साध्यमुलक संकल्पना

संविधानवाद हा साध्यावर जास्त भर देतो हे त्यांचे मुख्य वैशिष्ट्ये दिसून येते. व्यक्ती स्वातंत्र्याला अबाधित ठेवण्यासाठी व निरंकुश सत्तेपासून देशाला वाचविणे हे साध्य करण्यासाठी त्यामध्ये काही प्रयोग केले जातात. जसे कायद्याचे राज्य, अधिकाराची विभागणी, स्वतंत्र्य न्यायपालिका, मुलभूत अधिकाराचे रक्षण, समता, स्वातंत्र्य व बंधुत्त्व या गोष्टी साध्य करण्याचे प्रयत्न केले जातात.

### (५) सहभागी संकल्पना

सहभागी म्हणजे संविधानवादाच्या मूल्यांप्रती दोन किंवा त्यापेक्षा जास्त राज्यांच्या विचारामध्ये समानता असते.

### (६) संविधानाशी एकरूप संकल्पना

संविधानवाद ही संकल्पना त्या-त्या देशाच्या संविधानाशी एकरूप होऊन कार्य करत असते. संविधानातील आदर्शानुसारच कार्य केली जातात.

## २.२.४ संविधानवादाचे अन्वय

संविधानवादात अनुस्यूत असलेल्या शासनावरील मर्यादा कशा घातल्या जातात हे आपण पाहिले. आता या संकल्पनेचे अन्वय म्हणजे या संकल्पनेचे कोणकोणते अर्थ निघतात.

### (१) संविधानाचे सार्वभौमत्त्व

संविधानाचे सार्वभौमत्त्व याचा अर्थ असा निघतो की, संविधान हे सार्वभौम आहे. देशातील कोणतीही शासकीय कृती मग तो निर्णय असो, शासनाची आज्ञा असो की, कायदा तो संविधानाशी सुसंगत असला पाहिजे. संविधानाशी विसंभत असणारा कायदा वैध मानला जात नाही. वैधतेची ही कल्पनाच शासनाच्या अधिकारावर फार मोठे बंधन घालते.

### (२) न्यायालयीन पुनर्विलोकन

अधिकाराचा वापर न्याय पद्धतीने योग्य कारणासाठी होतो आहे हे ठरविण्याचे काम न्यायालय करतात. सामान्य कायदा किंवा शासनाची कृती ही संविधानाच्या चौकटीत बदत नाही असे वाटले तर ती कृती किंवा तो कायदा रद्दबातल ठरविला जातो.

### (३) भारतातील संविधानाच्या मुलभूत वैशिष्ट्यांची संकल्पना

भारतात संविधानाच्या मुलभूत वैशिष्ट्यांची संकल्पना मांडून संविदानवादाच्या क्षेत्रात न्यायालयाने फार मोठे योगदान दिले आहे. सामान्य कायद्यापेक्षा संविधान श्रेष्ठ आहे, हे आपण पाहिले. म्हणूनच संविधानात बदल करण्यासाठी इतर कायद्यासारखे साधे बहूमत पुरेसे होत नाही. भारतात त्यासाठी २/३ बहूमत व काही बाबतीत किमान अर्ध्या घटक राज्यांची मान्यता लागते.

### (४) संविधान दुरूस्ती व सुधारणा

याचा अर्थ घटनेत दुरूस्ती वा सुधारणा करता येणारच नाही वा करू नयेत असा होत नाही. त्या सुधारणा संविधानाच्या मुलभूत ढाच्यात बसण्यासारख्या असल्या पाहिजेत.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**रिकाम्या जागा भरा.**

(१) राज्याच्या सार्वभौम शक्तीचे संचलन करण्याचे कार्य..................करते.

(२) लोकप्रशासनाच्या अभ्यासात....................ही अतिशय नविन संकल्पना आहे.

(३) भारताने..........................शासन पद्धतीचा स्विकार केला आहे.

(४) प्रशासकीय व्यवस्थेचे काळजीपूर्वक संचलन करण्यासाठी....................आवश्यक असतो.

(५) संविधान म्हणजे अनेक.................संच होय.

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**संकल्पना :** वेगवेगळ्या वस्तू किंवा घटना यांच्यात आढळून येणारे सर्वसाधारण लक्षण वा संबंध म्हणजे संकल्पना होय.

**बंधुता :** विश्वबंधुता ही संकल्पना प्राचिन भारताच्या संस्कृतिशी निगडीत आहे. सर्व मनुष्य हे जन्माने स्वतंत्र असून त्यांची प्रतिष्ठा व हक्क समान आहेत. भारतातील धर्म, भाषा, पंथ, इत्यादी वैविध्य लक्षात घेता बंधुता संकल्पना राष्ट्राला बळकट करणारी आहे.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) संविधान

(२) संविधानवाद

(३) लोकशाही

(४) कायदा

(५) मूल्यांचा

## २.५ सारांश

संविधानवादाची संकल्पना भारतीय संविधानाशी निगडीत करतांना आपण असे म्हणू शकतो की, भारतीय संविधानामधे जी तत्त्वे समाविष्ट केली आहेत. ती संविधानवादाची संकल्पना तर स्पष्ट करतातच परंतु या संकल्पनेचे विलक्षण सामर्थ्य काय असु शकते. याबाबतचे चित्र आपल्याला दिसुन येते.

भारतीय संविधानातील लोकशाही व्यवस्थेने देशाच्या सामाजिक जीवनात परिवर्तन घडवुन आणण्यास फार मोठे योगदान दिले आहे. भारतीय संवैधानिक लोकशाही सामाजिक, आर्थिक व राजकिय परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन बनली आहे. उपेक्षित घटकांचा समावेश, शोषितांना पिडीतांना न्याय, प्रौढ शिक्षण, रोजगार, उद्योग, शिक्षण, स्वावलंबन, भेदभाव विरहित समाजरचना, अत्याधुनिक विज्ञानाची कास पकडून त्याचा उपयोग सामान्य व्यक्तीच्या आयुष्यात सकारात्मक बदलासाठी करणे, संस्कतीचे संरक्षण इ. महत्त्वाच्या संकल्पनांना आग्रहाने विकसित करण्याचे कार्य भारतीय संविधानामुळे शक्य झाले आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) संविधानवाद म्हणजे काय?

(२) भारतीय संविधानाचा संविधानवादाशी असलेला संबंध सुस्पष्ट करा?

(३) भारतीय संविधानात असलेली मुल्ये यांचा परिणाम स्पष्ट करा?

(४) संविधानवाद ही संकल्पना कशी निर्माण झाली माहिती द्या?

## २.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) जोहरी, जे. सी. (१९७२). *कम्पॅरेटीव्ह पॉलीटिक्स.* न्यू दिल्ली, स्टर्लिंग पब्लिशर्स.

(२) माहेश्वरी, एस. आय. (२००४). *कम्पॅरेटीव्ह गव्हर्मेंट ॲण्ड पॉलिटिक्स.* आग्रा, लक्ष्मीनारायण अग्रवाल.

ज्ञानगंगा घरोघरी

# घटक ३ : संविधान विषयक ऐतिहासिक न्यायालयीन निर्णय

*अनुक्रमणिका*

३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय-विवेचन
  ३.२.१ न्यायालयाचे महत्त्वाचे खटले आणि निर्णय
३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
३.५ सारांश
३.६ सरावासाठी स्वाध्याय
३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला -

- भारतीय संविधानातील 'स्वतंत्र न्यायमंडळाच्या' भुमिकेचा अभ्यास करता येईल.
- स्वतंत्र न्यायमंडळामुळे नागरिकांच्या मुलभुत अधिकारांचे संरक्षण कशाप्रकारे होते हे समजेल.
- कायदे निर्मितीच्या प्रक्रियेवरील न्यायमंडळाचा अंकुश या बाबी समजतील.
- संघराज्य शासन पद्धतीला स्थैर्य देण्याचे काम न्यायालयीन प्रक्रियेमुळे कश्याप्रकारे होते हे माहित होईल.
- संविधानाचे रक्षण न्यायमंडळ कश्याप्रकारे करते ती प्रक्रिया समजुन घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

भारताचे सर्वोच्च न्यायालय संविधानाचे संरक्षक म्हणुन कार्य करते. तसेच नागरीकांच्या मुलभुत हक्कांचे व स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी देखील न्यायालयाला पार पाडावी लागते. सर्वोच्च न्यायालयाकडे सोपविण्यात आलेली ही कामे व्यवस्थितपणे पार पाडण्यात यावीत याकरिता त्यास न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आलेला आहे.

भारतीय कायदे मंडळाने केलेले कायदे आणि कार्यकारी मंडळाने काढलेले आदेश यांची फेरतपासणी करून ते कायदे किंवा आदेश संविधानातील तरतुदीशी सुसंगत आहेत किंवा नाहीत याचा निर्णय घेण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आलेला आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या या अधिकारालाच न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार असे म्हणतात. या अधिकाराला अनुसरून भारतीय संसदेने किंवा घटक राज्यांच्या कायदे मंडळांनी केलेला एखादा कायदा घटनेशी सुसंगत आहे की नाही याची तपासणी सर्वोच्च न्यायालय करू शकते. जर तो कायदा घटनात्मक तरतुदींशी विसंगत आहे असे न्यायालयाच्या निदर्शनात आले तर असा कायदा सर्वोच्च न्यायालय अवैध ठरवु शकते. अशाप्रकारे भारतीय नागरिकांचे मुलभुत हक्क आणि स्वातंत्र्य यांचा कायदे मंडळ किंवा कार्यकारी मंडळ यांच्याकडून संकोच होणार नाही किंवा ते हिरावुन घेतले जाणार नाही, यांची दक्षता सर्वोच्च न्यायालयामार्फत घेण्यात येते.

## ३.२ विषय–विवेचन

न्यायमंडळाचे स्वातंत्र्य म्हणजे न्यायमंडळाचा स्वतंत्र विभाग असणे नव्हे तर न्यायमंडळावर कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ इतर कोणत्याही व्यक्ती अथवा संघटना यांपैकी कोणाचेही दडपण असता कामा नये. न्यायाधिश मुक्त, निरपेक्ष, निर्भय राहण्याच्या दृष्टीने न्यायमंडळाचे स्वातंत्र्य आवश्यक आहे. नागरिकांच्या अधिकारांचे व स्वातंत्र्याचे रक्षण करून व्यक्तीविकास साध्य होण्यासाठीसुद्धा न्यायमंडळाचे स्वातंत्र्य कायम ठेवणे आवश्यक असते.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने त्यांना संविधानाने बहाल केलले अधिकार व कार्य यामध्ये कधीही कसुर करण्याचा प्रयत्न केलेला नाही, या भागामधे आपण संविधान विषयक ऐतिहासीक न्यायालयीन निर्णयांचा अभ्यास करणार आहोत.

### ३.२.१ न्यायालयाचे महत्त्वाचे खटले आणि निर्णय

**(१) गोलखनाथ विरूद्ध पंजाब राज्य १९७७**

या निर्णयाद्वारे सर्वोच्च न्यायालयानी असे स्पष्ट केले की, यापुढे घटनेच्या तिसऱ्या भागातील मुलभूत हक्क ज्याद्वारे काढुन घेतले जातील किंवा त्यांचा संकोच होईल अशी घटना दुरूस्ती करण्याचा अधिकार संसदेला असणार नाही.

**(२) केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य १९७३**

या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आपली गोलखनाथ खटल्यातील आपली भुमिका बदलली आणि मुलभुत हक्कांत दुरूस्ती करण्यांचा संसदेचा अधिकार मान्य केला. तथापि संसदेला राज्यघटनेच्या कोणत्याही भागात दुरूस्ती करण्याचा अधिकार असला तरी तिला राज्यघटनेच्या मुलभुत संरचनेत बदल करता येणार नाही हे देखील सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

**(३) मिनर्व्हा मिल्स विरूद्ध संघराज्य शासन १९८०**

१९७६ च्या ४२व्या घटना दुरूस्ती अन्वये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारावर अनेक निर्बंध घालण्यात आले. संसदेने केलेल्या कोणत्याही घटनादुरूस्तीला न्यायालयात आव्हान देता येणार नाही अशी तरतुद केली गेली. संसदेच्या घटना दुरूस्तीच्या अधिकारावर कोणत्याही प्रकारच्या मर्यादा असणार नाहीत अशी तरतुद करण्यात आली. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ''मिनर्व्हा मिल्स विरूद्ध संघराज्य शाासन १९८०'' या खटल्यात हा भाग रद्द ठरवताना संसदेला राज्यघटनेच्या मुलभुत संरचनेत बदल करता येणार नाही, असे सांगितले आणि 'न्यायालयीन पुनर्विलोकन' हा राज्यघटनेच्या मुलभुत संरचनेचा एक भाग आहे असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला.

**(४) एस.आर. बोम्मई व इतर विरूद्ध भारत संघराज्य १९९४**

१९९४ साली सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या कलम ३५६ अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रपतीच्या आणीबाणीच्या अधिकाराच्या वापराचा संदर्भ देताना असे सांगितले की, आणीबाणी लागु करण्यामागील कारणांचा शोध घेण्याचा व त्यामागे काही राजकीय षडयंत्र आहे किंवा नाही हे पडताळुन पाहाण्याचा हक्क न्यायालयीन पुर्नविलोकनात समाविष्ट आहे.

**(५) उन्नीकृष्णन आणी इतर विरूद्ध आंध्रप्रदेश १९९३**

१९९३ सालच्या या निकालामधे सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले की, १४ वर्षापर्यंतच्या मुलांना मोफत शिक्षण दिले जावे. भारतातील नागरिकांचा शिक्षण घेण्याचा अधिकार मुलभुत आहे. भारतीय संविधानातील कलम २१ अनुसार जीवन जगणे अर्थपूर्ण होण्यासाठी व वैयक्तिक स्वातंत्र्याचा योग्य उपभोग घेण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे म्हणून सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की शिक्षणाचा अधिकार हा मुलभुत अधिकार आहे.

**(६) २ मे २००२ व १३ मार्च २००३ निर्णय**

या ऐतिहासिक निर्णयांमधे सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, राज्यसभा, लोकसभा, राज्य विधानसभा इ.च्या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी त्याची आर्थिक स्थिती, शैक्षणिक पात्रता आणि गुन्हेगारी पार्श्वभुमी घोषित करावयास

हवी कारण मतदारांना मतदान करण्यापूर्वी उमेदवाराबद्दल माहीती आवश्यक आहे. मतदानाचा निर्णय घेण्यासाठी ती आवश्यक आहे.

**(७) बेनेट कोलमन विरूद्ध भारत सरकार १९७३**

कलम १९ द्वारे नागरिकास अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, याचाच अर्थ नागरिकांनी मते बनवावीत व अभिव्यक्त करावीत असा असुन यासाठी नागरीकास माहीती प्राप्त होणे आवश्यक आहे.

**(८) एस.पी. गुप्ता आणि इतर विरूद्ध भारत सरकार १९८२**

यात सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, गुप्तता ही भ्रष्टाचारास व सत्तेच्या दुरूपयोगास चालना देते. लोकांना माहिती दिली गेली तर लोकांना चांगले व कार्यक्षम प्रशासन मिळण्यास मदत होईल. स्वच्छ व निरोगी प्रशासन मिळेल.

वरील निवडक ऐतिहासिक न्यायालयीन निर्णयांमुळे संविधानाचे पावित्र्य राखले जाते. वास्तविक न्यायमंडळ हे संविधानाचे रक्षक आहे. संविधानातील तत्त्वांचे, नियमांचे संरक्षण करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका न्यायालयाला पार पाडावी लागते. संविधानातील नियम, कायदे, पद्धती यांना स्थैर्य देण्याचे काम न्यायालय करीत असते त्यामुळे नागरिकांमध्ये संविधानविषयी आदराची व प्रेमाची भावना वाढीस लागते.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**एका वाक्यात उत्तरे लिहा**

(१) भारतीय संविधानाचे मुलभूत वैशिष्ट्ये कोणती आहे?

(२) नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे रक्षण करण्याचे महत्त्वाचे कार्य कोण पार पाडते?

(३) संविधानाच्या कोणत्या कलमानुसार शिक्षणाचा अधिकार हा मुलभूत अधिकार आहे?

(४) भारतीय संघराज्यात केंद्र व राज्य यामधील वाद मिटविण्याचे कार्य कोण करते?

(५) ४२वी घटनादुरूस्ती केव्हा करण्यात आली?

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**न्यायपालिका :** सर्व न्यायदान करणारी केंद्रे मिळून कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होणार नाही आणि प्रत्येकाला न्याय मिळेल याची जबाबदारी सांभाळीत असतात. यासर्व न्यायालयांना मिळून न्यायपालिका म्हणतात.

**न्यायालयिन पुनर्विलोकन :** संविधी किंवा प्रशासकीय अधिनियम किंवा कृती यांच्या ग्राह्यतेबद्दल निर्णय देण्याची न्यायालयाची शक्ती.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) स्वतंत्र न्यायमंडळ हे भारतीय संविधानाचे मूलभूत वैशिष्ट्ये आहे.

(२) नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याचे महत्त्वाचे कार्य न्यायमंडळ पार पाडते.

(३) संविधानाच्या कलम २१नुसार शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे.

(४) भारतीय संघराज्यात केंद्र व राज्य यामधील वाद मिटविण्याचे कार्य न्यायमंडळ करते.

(५) ४२वी घटनादुरूस्ती १९७६ साली करण्यात आली.

## ३.५ सारांश

या घटकामध्ये आपण स्वतंत्र न्यायमंडळाच्या भुमिकेचा अभ्यास केला आहे. सर्वोच्च न्यायमंडळ हे संविधानाचे संरक्षण म्हणून कार्य करते, तसेच स्वतंत्र न्यायमंडळामुळे नागरीकांच्या मुलभुत अधिकारांचे संरक्षण होते, शासकीय व्यक्ती अथवा संस्था याद्वारे असंवैधानिक कृती न्यायालयामार्फत रद्द केल्या जातात. त्याचबरोबर कायदेमंडळाच्या कायदे निर्मितीवर एक प्रकारे अंकुश ठेवण्याचे काम न्यायमंडळ करीत असते. तसेच असंवैधानिक कायद्यांना रद्द करण्यात येते अशा ह्या न्यायालयीन प्रक्रियेमुळे संघराज्य शासन पद्धतीला स्थैर्य लाभते. केंद्र व राज्य यांच्या अधिकार विभागणी संदर्भातील काही वाद असल्यास न्यायालयामार्फत त्यावर सर्व सामाईक उपाय योजना करण्यात येते परिणामी न्यायमंडळाचा स्वतंत्र निर्णय क्षमतेमुळे संविधानाचे भवितव्य राखले जाते. त्यामुळे जनतेमध्ये त्याविषयी विश्वास, आदर व प्रेम, इ. गुण वृद्धिंगत होतात.

थोडक्यात, आपण असे म्हणू शकतो की, स्वतंत्र न्यायमंडळाच्या अस्तित्वामुळे नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे रक्षण होत आहे.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) 'गोलखनाथ' प्रकरणाविषयी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची माहीती द्या?

(२) 'स्वतंत्र न्यायमंडळ लोकशाहीची एक गरज' स्पष्टीकरण द्या?

(३) भारतीय संघराज्य प्रणालीतील न्यायमंळाची भुमिका स्पष्ट करा?

(४) केशवानंद भारती खटल्याची माहिती द्या?

(५) 'न्यायमंडळाच्या निर्णय प्रक्रियेमुळे कायदेमंडळाचे स्थान दुय्यम झाले आहे', मत व्यक्त करा?

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) ऑस्टिन, जी. (१९६४). *दि इंडियन कॉन्स्टीट्युशन. लंडन*, ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस.

(२) सावंत, पी. बी. (१९९७). *ज्युडिशियल अॅक्टीविसम : ट्रेंडस् अॅण्ड प्रासपेक्टस पॉलिटिक्स इंडिया.*

# घटक ४ : राजकीय संस्कृती, पक्ष, दबावगट आणि प्रसारमाध्यमे

*अनुक्रमणिका*

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय-विवेचन
 ४.२.१ राजकीय संस्कृती अर्थ व स्वरूप
 ४.२.२ भारतीय राजकीय संस्कृती
 ४.२.३ भारतीय राजकीय संस्कृतीची वैशिष्ट्ये
 ४.२.४ राजकीय पक्ष
 ४.२.५ दबावगट
 ४.४.६ प्रसारमाध्यमे
४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला-

- राजकीय संस्कृती म्हणजे काय, तीची वैशिष्टे कोणती व भारतीय राजकीय संस्कृती कशी आहे याचा अंदाज येईल.
- आधुनिक राजकीय प्रक्रियेतील राजकीय पक्षांची भूमिका व भारतातील प्रमुख राजकीय पक्षांची विचारसरणी व कृती कार्यक्रम लक्षात येतील.
- भारतासहित सर्वच राजकीय व्यवस्थामध्ये दबाव गटांचा प्रभाव व त्यांचे प्रकार जाणून घेता येतील.
- लोकशाही प्रक्रियेत प्रसारमाध्यमांची भूमिका समजून घेता येईल.
- एकूणच या सर्व घटकांचा राजकीय व्यवस्थेवर पडणारा प्रभाव व त्यामुळे त्याचे बदलणारे स्वरूप जाणून घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

आधुनिक राजकीय व्यवस्था विश्लेषणात राजकीय संस्कृती, राजकीय पक्ष, दबावगट यांच्या सहित लोकमताच्या बांधणीसाठी व राजकारणाचे मूल्यमापण करण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. भारतासारख्या विविध संस्कृती असणाऱ्या देशातही वैशिष्ट्येपूर्ण राजकीय संस्कृतीचा उदय झाला आहे. ज्यास प्राचीन काळापासून विविध प्रतिक,

विश्वास आणि राजकीय व सामाजिक मूल्यांनी आकार दिला आहे. भारतीय नागरीकांच्या मनावर झालेले राजकीय संस्कार व त्यांची राजकीय मानसिकता याच आधारे घडलेली आहे. राजकीय पक्ष हे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे लोकांना राजकीय शिक्षणच देत असतात व त्यामुळे राजकीय संस्कृतीतून अभिव्यक्त होणारी राजकीय मूल्य आकारास येतात. राजकीय पक्ष आपल्या विचारसरणी आणि कृती कार्यक्रमांच्या आधारे जास्तीत जास्त लोकाचे समर्थन मिळविण्याचा प्रयत्न करत असतात, जेणे करून त्यांना लोकशाही शासन व्यवस्थेत सत्ता प्राप्त करता येईल. दबावगट मात्र प्रत्यक्ष राजकीय सत्तेत वाटेकरी न होता बाह्य घटकाच्या स्वरूपात आपल्या विशिष्ट हितसंबंधाना साध्य करण्यासाठी शासनावर दबाव आणत असतात. प्रसारमाध्यमे हा आणखी एक असा घटक आहे जो सर्वच शासन प्रकारात कमी अधिक प्रमाणात स्वतंत्र आहे, आणि राजकारणाचे, शासनाचे सतत मूल्यमापन करत असतो. लोकशाहीत तर प्रसारमाध्यमांना चौथा स्तंभ म्हटले जाते कारण लोकशाहीत माध्यमे केवळ शासनाचे मूल्यमापनच करीत नाहीत तर त्याचवेळी लोकांच्या राजकीय ज्ञानातही भर घालतात लोकमताची बांधणी करतात व देशाच्या राजकीय संस्कृतीलाही आकार देत असतात.

एकंदरीत कोणत्याही राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करतांना या घटकाचा आधार घ्यावा लागतो.भारतीय राजकारणाचे आकलन होण्यासाठी तसेच राजकीय प्रक्रीयेस समजून घेण्यासाठी भारताची राजकीय संस्कृती, येथील प्रमुख राजकीय पक्ष, विविध समुहांचे दबावगट आणि भारतीय प्रसार माध्यमांच्या बदलत्या भूमिकांचे अध्ययन गरजेचे आहे.

## ४.२ विषय–विवेचन

### ४.२.१ राजकीय संस्कृती : अर्थ व स्वरूप

राजकीय संस्कृती ही एखाद्या समाजाच्या समग्र संस्कृतीचाच एक भाग असते, ज्याप्रमाणे संस्कृती मानवाचा किंवा समाजाचा जीवनविषयीचा दृष्टीकोण, एखाद्या मार्गावरील अढळ श्रद्धा आणि जगण्याची मूल्ये यांची मिळून बनलेली असते त्याचप्रमाणे राजकीय संस्कृतीही मानव किंवा समाजाची राजकीय मानसिकता असते. आणि कोणत्याही देशाच्या राजकीय व्यवस्थेचा आधार ही तेथील राजकीय संस्कृतीच असते. राजकीय व्यवस्था ही तेथील समाजाच्या राजकीय संस्कृतीशी अनुरूप असेल तरच राजकीय प्रक्रिया सुरळीत चालते नाही तर अंतर्विरोध निर्माण होतो व शेवटी राजकीय संस्कृतीनुरूपच राजकीय व्यवस्थेत बदल होत जातात, भारता व्यतिरिक्त उपखंडातील इतर देशांत लोकशाहीची यशस्वी स्थापना न होण्यामागचे मुख्य कारण म्हणजे तेथील राजकीय संस्कृती लोकशाहीस पोषक नाही. राजकीय संस्कृतीची प्रातिनिधीक व सर्वसमावेशक व्याख्या सिडने व्हर्बा या विद्वानाने केली आहे. त्याच्यामते राजकीय संस्कृतीही एक व्यवस्था आहे जी लोकांचे अनुभवसिद्ध विश्वास, अभिव्यक्त प्रतिक आणि मूल्ये यानी बनलेली आहे व त्यानुसार राजकीय क्रियाचे परिस्थितीजन्य अर्थ काढले जातात. सोप्या भाषेत लोकांचा एखाद्या राजकीय कृत्याकडे बघण्याचा दृष्टीकोन त्याच्या राजकीय संस्कृतीमुळे तयार होतो. यावरून आपणास राजकीय संस्कृतीचे प्रमुख तीन वैशिष्ट्ये दिसून येतात. पैकी एक म्हणजे अनुभवसिद्ध विश्वास. हा राजकीय व्यवस्थेच्या वेगवेगळ्या यंत्रणाचा लोकास आलेल्या चांगलया किंवा वाईट अनुभवावर आधारलेला असतो. उदा. लोकशाहीवर असलेला सकारात्मक भाव किंवा उदासिन भाव हा ज्या त्या देशातील लोकांना आलेल्या अनुभवानुसार विश्वासात रुपांतरीत होतो. दुसरे, एखाद्या राजकीय समाजात कोणत्या राजकीय मूल्यांना प्राधान्य दिले जाते, यावरून ठरते, उदा. तेथील लोक कायद्याचे राज्य, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, निरपेक्ष न्याय व्यवस्था कल्याणकारी राज्य, इ. व अशा अनेक पैकी कोणत्या मूल्यांना प्राधान्य देतात यावर, त्यांची राजकीय संस्कृती ओळखता येते. तिसरे, राष्ट्रीय प्रतिके, जी संस्कृतीची वाहक असतात त्याद्वारे विशिष्ट राजकीय समाजाच्या महत्त्वाच्या राजकीय घटना, परंपरा, मूल्य आदर्श, इ.ची अभिव्यक्ती होत असते.

थोडक्यात राजकीय संस्कृतीत राजकरणाविषयी दृष्टीकोण, राजकीय मूल्ये, विचारसरणी, राष्ट्रीय चारित्र्य, सांस्कृतिक लोकाचरणच नव्हे तर राजकारणाची विशिष्ट तऱ्हा, प्रकार व वास्तविक आकृतीबंधनही सामावलेला आहे.

### ४.२.२ भारतीय राजकीय संस्कृती

भारताच्या राजकीय संस्कृतीचा अभ्यास करताना आपल्याला फक्त भारताच्याच लोकांचा राजकीय दृष्टीकोन मूल्य, विश्वास यांचा विचार करायचा आहे म्हणजे भारतीयांच्या आपल्या राजकीय संस्था, राजकीय प्रक्रिया व राजकारणाविषयीच्या धारणा काय आहेत हे समजून घ्यायचे आहे. भारतीय राजकीय प्रश्नाविषयी जागरूक आहेत काय? भारताची जनता निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकू शकते काय? म्हणजेच भारतीयांच्या राजकारणा विषयीच्या समजूतींचाच आढावा घेताना या प्रश्नांना उत्तर शोधायचे आहे.

### (१) भारतीय जनमाणसातील राजकीय विश्वास

भारत स्वतंत्र झाल्यापासून आपण संसदीय लोकशाहीचा अंगिकार केला असून आजवर ती यशस्वी ठरली आहे व टिकूनही आहे. पण आपल्या शेजारी अनेक देशात तीचा अस्त झाला आहे. म्हणजेच भारतीयांचा लोकशाही संस्था व व्यवस्थेवर अढळ विश्वास आहे. बहुसंख्य निरक्षर मतदार असणाऱ्या काळातही मतदान बेपवाईने झाले नाही. नियमित निवडणुका झाल्या. आणीबाणीसारख्या प्रसंगाला लोकशाहीप्रिय जनतेने कडाडून विरोध केला. निरपेक्ष निवडणुका, स्वतंत्र न्यायपालिका, घटनात्मक शासन, माध्यमांचे स्वातंत्र आणि सद्य:स्थितीत राजकीय स्थैर्यास भारतीयांनी आदर्श मानले आहे आणि लोकशाही मार्गानेच आपल्या अधिकाराची व हक्कांची मागणी करणे यावर त्यांचा विश्वास आहे.

### (२) भारतीयांचे राजकीय मूल्य

भारतीयांचे राजकीय मूल्य कोणती हे संविधानाच्या प्रस्तावनेने अतिशय नेमक्या शब्दात समर्पकरित्या स्पष्ट केले आहे. आपल्या बहुतेक राजकीय मूल्यांचा उदय व विकास भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातून झाला आहे. आपल्या राष्ट्रीय नेत्यांनीही यासाठी भरपूर योगदान दिले. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता, राष्ट्रीय ऐक्य व अखंडता, इ. मूल्य भारतीय राजकीय संस्कृतीचा आधार आहेत. विविधतेने नटलेला हा देश आजही एक राष्ट्र म्हणून जगापुढे एक आगळे वेगळे उदाहरण बनुन उभा आहे.त्यांच्या मूळाशी येथील दीर्घ राजकीय परंपरेतून उदयास आलेली राजकीय मूल्य आहेत. राष्ट्राच्या प्राचीन परंपरेतून उदयास आलेली राजकीय मूल्य आहेत. राष्ट्राच्या प्राचीन व गौरवशाली सांस्कृतिक इतिहासातूनही अनेक मूल्यांचा अंगीकार भारतीयांनी केला आहे. अहिंसा, शांतता, परस्परादर व सहअस्तित्व या राजकीय मूल्यांचा अवलंब देशांतर्गत तसेच परराष्ट्र धोरणासाठीही भारतीयांनी केला आहे.

### (३) भारतीय लोकांच्या प्रभावी प्रतिक्रिया

राजकारण, राजकीय व्यवस्था आणि राजकारण्यांविषयी भारतीय मानसिकता अनुकूल नाही. कारण राजकारणास अलिकडे घृणेणे बघितले जात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय नेतृत्वाकडे सेवाभाव, वैचारिक अधिष्ठान, चारित्र्य यांचा अभाव दिसून येत आहे. राजकारण एक व्यवसाय बनला असून वंशवाद, भ्रष्टाचार, स्वार्थ, सत्तालुप्तता, इ. लक्षणे राजकारण्यांत दिसतात. राजकारणाचे मोठ्याप्रमाणावर अपराधीकरणही झाले आहे. नोकरशाही, अपराधी, –राजकारणी यांच्या सम्न्वयाने हिच राजकीय परिस्थिती निर्माण होत आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत जनतेने एकाच पक्षाला पूर्ण बहुमत देण्यामागे ही भारतीयांची भ्रष्टाचार, बहुपक्षीय दुबळे शासन, राजकीय मूल्यांची विडंबना या विरोधातील प्रतिक्रियाच आहे.

## ४.२.३ भारतीय राजकीय संस्कृतीची वैशिष्ट्ये

प्रत्येक देशाची राजकीय संस्कृती ही इतरांपासून वेगळी आहे. तशी भारताचीही राजकीय संस्कृती विशिष्ट असून काही प्रमुख वैशिष्ट्यांचा आढावा आपणास घेता येईल.

### (१) व्यक्ती श्रेष्ठत्व व चमत्कारी नेतृत्व

भारतीय राजकारणात करीश्मी नेतृत्वाची संकल्पना दृढ आहे. एखाद्या नेत्याच्या व्यक्तित्वालाच व्यवस्थेपेक्षा मोठं केलं जातं पं. नेहरू, इंदिरा गांधी तसेच नरेंद्र मोदी, इ. उदाहरणे आपणास देता येतील. देशाच्या राजकारणास व राज्य व्यवस्थेस त्यानी वेगळे स्वरूप दिले. चमत्कारी नेत्यांच्या भूमिकांमुळे भारतीय राजकारणाचे आजचे स्वरूपही विचार, पक्ष, कार्य यावरून न ठरता नेतृत्वाच्या चमत्कारी वलयामुळे निश्चित होते. निवडणुका दोन पक्षात, विचारसणीत होत नाहीत तर दोन चेहऱ्यात घेतल्या जातात. उदा. नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी.

### (२) वंशवाद

भारतीय राजकीय संस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे वंशवाद. भारतात लोकशाही व्यवस्था व लोकशाही मूल्यांचा स्वीकार संविधानाने केला असला तरी अभिजन, राजवंशी यांचा जन मनावरील प्रभाव स्पष्ट दिसतो. एकाच घराण्यातील अनेक व्यक्तिकडे राजकीय सत्ता एकवटलेली दिसते. त्यात जनतेसही काही गैर वाटत नाही. नेते सर्व सुखसोई उपभोगतात व सर्वसामान्य मात्र हालाकीच्या परिस्थितीत राहतो पण त्यास नेता व त्याचे वंशज सत्तेत असण्याचे नवल वाटत नाही.

## (३) भ्रष्टाचार

भ्रष्टाचाराबाबत भारतीय सहनशील आहेत व शासनात सामिल पक्ष, नेते तसेच नोकरशाहीत होणारा भ्रष्टाचार त्यांना गंभीर वाटत नाही. लोकांचीही मानसिकता झाली आहे की, राजकारणात सक्रिय असलेला भ्रष्ट मार्गाने संपत्ती कमवू शकतो. तसेच लाच दिल्याशिवाय कामे ही होत नाही. म्हणून अनेक नेत्यांवर शेकडो भ्रष्टाचारांचे आरोप आहेत त्यात तथ्य ही आहे पण कोणालाच शिक्षा होत नाही.

## (४) जातीय राजकारण

भारतीय समाज व्यवस्थेचा जाती हा प्रमुख घटक आहे. भारतात राजकीय वर्तनावर जातीचा प्रभाव फार मोठा आहे.कोण उमेदवार असावा या चिंतेपासून कोणता उमेदवार कीती मतांनी निवडून येईल याचे गणित राजकीय पक्ष जातीय आधारावर करतात.प्रत्येक राज्यात प्रबळ, मध्यम व कनिष्ठ जाती असून राजकीय जीवनात वर्चस्व असलेलया प्रबळ जातींना कनिष्ठ जातींकडून कडवे आव्हान निर्माण होत आहे. उदा. महाराष्ट्रात मराठा व ब्राम्हण या राजकीयदृष्ट्या प्रबळ जातींना इतर मागासवर्गीयांसहित अनुसूचीत जाती/जमातींकडून ही आव्हान निर्माण झाले आहे. लोकांचे संघटन ही जातीतील एखाद्या पौराणिक प्रतिकास घेऊन करण्याचा प्रयत्न होतो आहे. उदा. मराठा –शिवछत्रपती, माळी – संत सावता माळी, न्हावी – सेना न्हावी, धनगर – अहिल्याबाई होळकर, वंजारी – संत भगवान बाबा, ब्राह्मण – परशुराम, इ. आदिवासी–बिरसा मुंडा, वाल्मिकी, अनुसुचित जाती, फुले शाहू, डॉ. आंबेडकर, इ. महाराष्ट्राच्या जातीय राजकारणात अस्तित्वात असणारे जातीय संघटन आहेत. देशाच्या इतर भागातही जाट, राजपूत, कायस्थ, रेड्डी, कामा, पटेल, इ. जातीय संघटना आहेत.

## (५) विचारसरणीबाबत अस्पष्टता

भारतीय राजकारणात सर्व क्षम्य आहे, ही समजूत रूढ असल्यामुळे सत्तेसाठी राजकीय पक्षांकडून नाना तडजोडी स्वीकारल्या जातात. जिथे विचारसरणीस ही मुरड घातली जाते. उजव्या पक्षात फारसे वैचारिक कारणाने अंतर नाही व डाव्या पक्षानींही बऱ्याच वेळा सत्तेत सहभाग मिळविण्यासाठी तडजोडी केल्या. संयुक्त सरकारच्या संकल्पनेस भारतीय मतदाराने स्वीकारले व सध्याची लोकसभा वगळता मार्गाल ४ लोकसभा निवडणूकांत लोकांनी विविध राजकीय पक्षावर विश्वास टाकला पण सत्तेसाठी या पक्षांनी आपल्या मुख्य विचारासच बाजुला ठेवत संयुक्त सरकारात घटक बनले म्हणून लोकांच्याही राजकीय विचारप्रणाली काटेकोर नाहीत.

## (६) लोकशाहीचा व्यापक आधार

भारतीय राजकीय संस्कृतीचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे सत्तेच्या विकेंद्रीकरणासोबतच भारतात लोकशाहीचा व्यापक आधार निर्माण झाला आहे व पुर्वीची पारंपारिक संकुचित राजकीय संस्कृती आता सहभागी संस्कृतीत रूपांतरीत होत आहे, लोक राजकारणात सक्रीय सहभाग घेत आहेत. महिला वंचित समुह यांना संविधानाने, आरक्षणाने मुख्य प्रवाहात आणले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकांचे राजकीय प्रशिक्षण ही घडविले जात आहे.नवीन नेतृत्व उदयास येत आहेत. लोकांना राजकीय व्यवस्था व राजकारणात रस वाटत आहे. राजकारणाबाबतची उदासिन वृत्ती कमी होत आहे.

## (७) पारंपारिक स्वरूप

भारतीय राजकीय संस्कृतीमध्ये पारंपरिक तत्वांचा पगडा आहे, जाती, धर्म, वर्ण, भाषा व प्रांत या आधारे लोकांच्या राजकीय निष्ठा विभागल्या गेल्या आहेत. ही परिस्थिती सुधारते आहे असे चित्र असले तरी याच तत्त्वांच्या आधारे निवडणुका होतांना दिसतात. धार्मिक वितुष्टावर पुढारी आपला स्वार्थ साध्य करतात. तर जाती, भाषा, प्रांत, ह्या मुद्यांवर राजकीय पक्षांच्या यशापयशाचे गणित ठरलेले असते. म्हणून राजकीय संस्कृती अजूनही राजकीय विकास साध्य करू शकलेली नाही.

## (८) भारताच्या राजकीय संस्कृतीचे बदलते स्वरूप

भारतात लोकशाही विकेंद्रीकरणाच्या यशस्वी प्रयत्नामुळे ग्रामीण व मागास व्यक्तीचे राजकीय सामाजीकरण शक्य होत असून जगात सगळ्यात मोठा जनाधार भारतातच आहे.कारण भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. यामुळे लोकांचा पारंपरिक दृष्टीकोन मागे पडत चालला आहे व नवीन राजकीय सहभागाची चेतना निर्माण करणारा दृष्टीकोन बळ धरू लागला आहे. लोकशाही प्रक्रियेत व शासनाच्या कारभारात लोक रस घेऊ लागले आहेत. भारतात धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, लोकशाही व राजकीय आधुनिकीकरण या मूल्यांची रुजवण झाली आहे. राजकारणात विविध सामाजिक समुहांचा सहभाग वाढला आहे. वंचित समुहासही सामाजिक न्यायाच्या धोरणाने व आरक्षणाने मुख्य राजकीय प्रवाहात सामावून घेतले आहे.

वरील दोन्ही प्रकारची राजकीय संस्कृती भारतात दिसून येते, त्यामुळे भारतीय राजकीय संस्कृती ही परंपरा व आधुनिकता यांचा उचित समन्वय आहे.

## ४.२.४ राजकीय पक्ष

आधुनिक राजकीय व्यवस्थांमध्ये राजकीय पक्षांची भूमिका अतिशय महत्त्वाची मानली गेली आहे. राजकीय पक्ष लोकशाहीचा कणा आहेत, पक्षपद्धती शिवाय लोकशाहीचे संचलन होऊच शकत नाही.पक्ष लोकांच्या आशा अपेक्षांना सुसूचित करतात. लोकांना प्रतिनिधी व नेतृत्व उपलब्ध करून देतात. राजकीय पक्ष लोकमत निर्मिती व अभिव्यक्तीचे सर्वोत्तम साधन आहेत.

### (१) भारतातील प्रमुख राजकीय पक्ष

भारतातील राजकीय पक्षांचा उदय स्वातंत्र्य चळवळी दरम्यान झाला आहे. इ. स. १८८५मध्ये राष्ट्रीय काँग्रेस या पक्षाचा जन्म स्वातंत्र लढ्यासाठीच झाला होता. निवडणुका लढविणे हा हेतू कदाचितच यामागे असावा. वेगवेगळ्या विचार व मतांचे लोक यात बराच काळ समन्वयाने राहीले पण विशिष्ट हितसंबंधाना जपणाऱ्यांनी या पक्षातून फूटून वेगळे पक्ष निर्माण केले. तसेच राष्ट्रीय काँग्रेसचा प्रभाव वाढल्याने इतर पक्ष जसे साम्यवादी पक्ष, मुस्लिम लिग, हिंदु महासभा, इ. निर्माण झाले. १९१९ व १९३५च्या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी जेव्हा प्रांतिय सरकार स्थापन करण्यात येणार होते, तेंव्हा प्रादेशिक स्तरावर मद्रास जस्टिस पार्टी, बंगाल कृषक लोक प्रजापार्टी पंजाब युनियनिस्ट पार्टी, इ. राजकीय पक्ष अस्तित्वात आले होते. भारताच्या स्वातंत्र्यावेळीही भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, अखिल भारतीय दलित संघ, मुस्लिम लीग, अनुसुचित जाती संघ, हिंदु महासभा, इ. पक्ष होते. ज्यांचा प्रभाव घटनानिर्मितीवरही दिसून येतो कारण घटनापरिषदेच्या निवडणुकांत त्यांनी सहभाग घेतला होता.

### भारतातील राजकीय पक्ष प्रामुख्याने चार प्रकारात विभागले जाऊ शकतात

#### (अ) राष्ट्रीय पक्ष

राष्ट्रीय पक्ष म्हणजे चार किंवा अधिक राज्यात ज्यांना मान्यता मिळाली आहे असे पक्ष. ज्यात विचारसणीवर आधारित असणारे व नसणारे असे पुन्हा दोन उपप्रकार पडतात. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची निश्चित वैचारिक भूमिका नाही म्हणून तो पहिल्या प्रकारातील राष्ट्रीय पक्ष आहे आणि उजवे पक्ष जसे भारतीय जनता पार्टी व डावे पक्ष जसे मा. क. प. व भा. क. प. हे दुसऱ्या प्रकारातील राष्ट्रीय पक्ष आहेत.

राजकीय पक्ष हे ऐच्छिक संघटना असतात. ज्यामध्ये सारखे हितसंबंध व उद्देश असणारे लोक समाविष्ट होतात आणि हे सर्व सदस्य मिळून इच्छित साध्य करण्यासाठी सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्षाची उद्दिष्टे ही काही प्रमाणात स्थिर असतात म्हणून पक्षस्थापना करणारी व्यक्ति गेल्यानंतरही पक्षाचे अस्तित्व टिकून राहते. म्हणून पक्ष हे स्थायी संघटनाही असतात.सुरुवातीस राजकीय पक्षांच्या भूमिकेकडे शंकेने बघितले जात होते. देशहिताविपरीत त्यांचे हित व उद्देश असतील असे वाटायचे पण जगभरात सर्वच शासन प्रकारात राजकीय पक्षाच्या योगदानामुळे लोकांना त्यांचे महत्त्व पटत आहे. सिग्मंड न्युमन या विचारवंताने राजकीय पक्ष हे आधुनिक राजकारणाची जीवनरेषा आहेत असे म्हटले आहे व ते खरेच आहे, कारण राजकीय पक्ष प्रतिनिधीत्वापासून ते शासन संचलनापर्यंत सर्व कार्य करतात. मुळात ते निवडणुकांचे राजकारण करतात.जिथे निवडणुका होतात विशेषत: व्यापक मताधिकारावर आधारीत होतात त्याठिकाणी राजकीय पक्ष उदयास येतात. प्रातिनिधीक संस्था व मतदानाच्या अधिकाराच्या विस्तारासोबतच राजकीय पक्षांचाही जन्म झाला म्हणून ते १९ व्या शतकाचे अपत्य आहे असे म्हणता येईल. सार्वभौम मतदानाचा अधिकार जिथे जिथे स्थापण झाला तिथे राजकीय पक्षांचा उदय व विकास झाल्याचे दिसते. आधुनिक राजकीय पक्षांचा उदय सुरुवातीस अमेरिकेमध्ये झाला, कारण तेथे प्रौढ मताधिकार प्रचलित होता. ब्रिटन आणि युरोपमध्ये हा जवळ जवळ दोन दशकानंतर अस्तित्वात आला. म्हणून राजकीय पक्षही तेथे उशिराने विकसित झाले.

● **व्याख्या**

**मॉरीस दुर्जवर :** राजकीय पक्ष हे असे समूह असतात जे राजकीय व्यवस्थेत सत्ता प्राप्तीसाठी आणि ती उपयोगात आणण्यासाठी संघटीत झालेले असतात.

राजकीय पक्ष हे कोणत्याही व्यवस्थेत सत्ताप्राप्ती व तीच्या संचलनाच्या उद्देशाने निर्माण झालेले असतात व कार्य करतात. याच अनुषंगाने मॅक्स वेबरनेही व्याख्या करतांना म्हटले आहे की, राजकीय पक्ष हे प्रचारक किंवा चळवळकरी संघटना असतात ज्यांचा उद्देश राजकीय सत्तेवर अधिपत्य निर्माण करणे व आपल्या अनुयायी व सदस्यांसाठी लाभ मिळवणे असतो. या व्याख्या राजकीय पक्षांच्या शासन संचालनाच्या कार्याशीच निगडित आहेत पण वास्तवात राजकीय पक्ष लोकांच्यात समन्वय साध्य करतात. आपल्या तत्व व सिद्धांताआधारे शासन करून राष्ट्रीय हितही साध्य करतांना दिसतात. तेव्हा त्यांची एक विचारसरणी आणि त्यास अनुसरून एक कृतीकार्यक्रम असतो. राजकीय पक्षांचे अस्तित्व सर्वच प्रकारच्या शासन व राज्यव्यवस्थांमधून दिसून येते. लोकशाहीत तर राजकीय पक्षावाचून राजकीय प्रक्रियाच चालू शकत नाही. तेथे निवडणुकांच्या माध्यमातून व संवैधानिक मार्गाने राजकीय सामाजिक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करतात. उलट सर्वंकष किंवा हुकुमशाहीतील राजकीय पक्ष क्रांतीच्या माध्यमाने अशी परिवर्तने साकारतात, म्हणून राजकारण व राजकीय प्रक्रिया कोणत्याही स्वरूपाची असो राजकीय पक्षांची भूमिका अपरिहार्य आहे.

## (आ) प्रादेशिक पक्ष

अशा राजकीय पक्षांचा प्रभाव व कार्यक्षेत्र एखाद्या राज्याच्या सिमेअंतर्गत असते.ज्यामध्ये संकुचित हितावर किंवा स्थानिक लोकांच्या भावनेस हात घालून पक्षांची उभारणी व संचलन केले जाते.शिवसेना, आसाम गण परिषद, नॅशनल कॉन्फरन्स, तेलगु देसम, तृणमूल काँग्रेस, हरियाणा विकास पार्टी, सिक्कीम संग्राम परिषद, इ. पक्ष याचे उदाहरण आहेत.

## (इ) प्रादेशिक पण धार्मिक आधार असलेले पक्ष

असे राजकीय पक्ष एखाद्या विशिष्ट जाती किंवा धर्माशी निगडितच असतात व त्यांचे कार्यक्षेत्र ही मर्यादित असते, उदा. मुस्लिम लीग, अकालीदल, इ.

## (ई) अस्थायी पक्ष

भारतात असेही बरेच राजकीय पक्ष असतात जे प्रसंगानुरूप निर्माण होतात व तसेच संपुष्टात येतात. यांचे अस्तित्व एखाद्या लहान गटासारखे असते. उदा. काँग्रेस (तिवारी), केरल काँग्रेस, हरियाण काँग्रेस, जनता पार्टी, रामराज्य परिषद, इ. असे पक्ष महत्त्वकांक्षी नेत्याच्या असंतुष्टतेमुळे निर्माण होतात. यात जास्त तर काँग्रेस मधून बाहेर पडलेल्या नेत्यांनी निर्माण केलेले राजकीय पक्ष आहेत.

## (२) लोकशाहीत राजकीय पक्षांची कार्ये

(१) राजकीय पक्ष लोकांच्या विविध हितसंबंधामध्ये संतुलन निर्माण करून त्या सर्वांचे यथायोग्य प्रतिनिधीत्व करीत असतात. यावेळी विविध हितसंबंधात होणारा संघर्ष कमी करून किमान पुर्ततेवर पक्षाचा भर असतो. म्हणून ते हित अभिव्यक्तीचे साधन असतात.

(२) राजकीय पक्ष जनतेच्या विविध मागण्यांच्या एकत्रीकरणाचे काम करतात तसेच उचित मागण्यांचे धोरणामध्ये रुपांतरण करतात.

(३) राजकीय पक्ष राजकीय सामाजीकरणाचे उत्तम साधन असल्याने व्यक्तींना राजकीय प्रक्रियेत सामावून घेतात व त्यांना सक्रिय बनवतात. विविध हितसमुहांमध्ये समन्वय साधतात, लोकांना राजकारणाचे ज्ञान होण्यास मदत करतात व निवडणूकांत मतदारांना तसेच सर्वसामान्यांना राजकारणाचे प्रशिक्षणही देतात.

(४) जास्तीत जास्त लोकांचे समर्थन प्राप्त करणे त्यासाठी लोकांपर्यंत आपल्या वैचारिक भूमिकेचा आणि कृती कार्यक्रमाचा प्रचार करणे लोकमताप्रमाणे बदल अंगीकारणे हेही राजकीय पक्षांचे महत्त्वाचे कार्य मानले गेले आहे.

(५) राजकीय पक्ष आपल्या समर्थकांमधून राजकारणातून कार्यकर्ता व नेता यांची अव्याहतपणे भरती करीत असतात. हे सर्वच शासन व्यवस्थात दिसून येते की राजकीय पक्ष निवडणूकात उमेदवारांना पक्षांची तिकीटे देऊन उभे करतात व नव नवीन नेतृत्वांना संधी मिळते याच पैकी पुढे सत्तेत सहभागी होतात व शासन करतात.

(६) धोरणनिर्धारणाचे महत्त्वाचे काम राजकीय पक्ष करतात.लोकशाहीत जो पक्ष बहुमताने सत्तेत येतो तो आपल्या कृती कार्यक्रमातील तत्त्वानुसार संपूर्ण व्यवस्थेसाठी धोरण आखत असतो. बहुतेकवेळा हे धोरण निवडणुकांतील घोषणापत्रावर आधारलेले असते.

(७) शासनाचे संचलन हे अतिशय महत्त्वाचे काम राजकीय पक्ष करतो लोकशाही व सांसदीय शासन व्यवस्थेत तर कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ हे बहुमतप्राप्त राजकीय पक्षांचेच असते. तोच शासनाचे संचालन करतो व निवडणुकात त्या खालोखाल संख्या असलेला विरोधी पक्ष होतो आणि शासनाच्या धोरणांची समीक्षा करीत असतो.

## (३) राजकीय पक्षपद्धतीचे प्रकार

सर्वसाधारणपणे राजकीय पक्षांच्या संख्येवरूनच पक्षपद्धतीचे वर्गीकरण केले जाते. पण या व्यवस्थांचे स्वरूप राज्यपरत्वे वेगळे असू शकते. उदा. आफ्रिकेतील देशातून बघायला मिळणारी एक पक्षपद्धती साम्यवादी देशासारखी नाही. तरी पण अभ्यासकांना समजण्याच्या दृष्टीने हे वर्गीकरण उपयुक्त आहे.

### (अ) एकपक्ष पद्धत

या राज्यव्यवस्थेत एकच प्रमुख राजकीय पक्ष अस्तित्वात असतो. जो शासनात भरती व शासनाचे संचालन करण्यास सत्ता बाळगून असतो. सर्व अधिकार व कार्याचे केंद्रीकरण झालेले असते. काही इस्लाम हुकूमशाही राष्ट्र, काही आफ्रिकी सांस्कृतिक एकात्मिक राष्ट्र व साम्यवादी चीन, रशिया सारख्या राष्ट्रांतून ही पद्धत दिसून येते. यात राजकीय स्थैर्य, एकता, राष्ट्रवाद, इ. वैशिष्ट्ये दिसून येतात. म्हणून धोरणात सातत्य टिकून राहते, राष्ट्रांचा विकास होतो, पण साम्यवादी व सर्वंकष राज्यव्यवस्थेत मात्र विरोध दडपूण टाकला जातो. लोकांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते.लोकांपुढे शासन निवडीचा पर्याय नसतो, इ. दोष ही या व्यवस्थेचे आहेत.यास आफ्रिकन राष्ट्र अपवाद आहेत. तेथे एकपक्ष पद्धती असूनही लोक उचित स्वातंत्र्याचा उपभोग घेतात.तेथे ही पक्ष पद्धती लोकांच्या इच्छेने अस्तित्वात आली आहे, त्यांच्यावर लादलेली नाही.

### (आ) द्विपक्ष पद्धत

दोन प्रमुख राजकीय पक्ष सत्तेसाठी जिथे स्पर्धा करतात अशा ठिकाणी ही पक्षपद्धती अस्तित्वात असते. इतर लहान सहान पक्षांचे जरी अस्तित्व तिथे असले तरी ते नगण्य असते. खऱ्या अर्थाने द्विपक्ष पद्धत अमेरिका व ब्रिटन मध्ये दिसते ज्याठिकाणी मतदारांपुढे दोन स्पष्ट पर्याय उपलब्ध असतात. ज्यात भावी शासनाचे दोन वेग-वेगळे स्वरूप, धोरण, उद्देश व कार्यक्रम प्रस्तुत केले जातात. त्यामुळे मतदार नि:सकोचपणे यापैकी एका पर्यायाची निवड करू शकतो. या पद्धतीत राजकीय पक्ष लोकांप्रती जबाबदार बनतात. सत्तेत असतांना लोकांच्या अपेक्षानुरूप कार्य केले नाही तर लोक त्या पक्षास निवडणूकात पसंती देत नाहीत व दुसऱ्या पक्षास संधी मिळते. यात एक सत्ताधारी तर दुसरा विरोधी पक्ष असतो.जो शासनाचे कायम मुल्यमापन करत असतो. शासन लोकांप्रती कायम जबाबदार असते व लोककल्याणकारी असते. लोकांचे हक्क सुरक्षित राहतात, इ. या पक्षपद्धतीचे गुण आहेत तर धोरणात सातत्य राहत नाही व बहुमताचे अल्पमतावर दडपण येते हे प्रमुख दोष आहेत.

### (इ) बहुपक्ष पद्धती

या पद्धतीमध्ये राजकीय व्यवस्थेत दोनपेक्षा अधिक प्रभावी राजकीय पक्ष अस्तित्वात असतात आणि त्यापैकी एकासही स्पष्ट बहुमत नसते. परिणामत: संयुक्त सरकारची निर्मिती होते. या पक्षपद्धतीबाबत असेही मत मांडले जाते की, यात सर्वसमाजाला योग्य प्रतिनिधीत्व मिळते, अनेक राजकीय पक्ष वेगवेगळ्या समुहाचे विशिष्ट हित जोपासून ते साध्य करू शकतात. विशिष्ट निवडणूक प्रक्रियेमुळे ही व्यवस्था निर्माण होते. या पद्धतीचा प्रमुख दोष राजकीय अस्थैर्य मानला जातो पण युरोपीयन देश, भारतात प. बंगाल, महाराष्ट्र, इ. राज्यात अस्तित्वात असलेली संयुकत सरकार व पक्षपद्धती यास अपवाद आहेत.

## (४) भारतातील प्रमुख राष्ट्रीय राजकीय पक्ष व त्यांचे कार्यक्रम

भारतात प्रमुख राष्ट्रीय पक्षामध्ये काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, कम्युनिष्ट पार्टी ऑफ इंडिया व मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, जनता दल, बहुजन समाज पार्टी, इ. चा उल्लेख करता येईल, इतरही बऱ्याच पक्षांना काही काळ राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला पण नंतर येणाऱ्या निवडणुकांत त्यांची कामगिरी खालावल्याने त्यांची राष्ट्रीय पक्षाची मान्यता काढून घेण्यात आली. उदा. समता पार्टी, स्वतंत्र पक्ष, जनसंघ इ. आपल्याला प्रमुख राष्ट्रीय पक्षाच्या विचारसरणी व कार्यक्रमाचा आढावा इथे घ्यायचा आहे.

## (अ) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (काँग्रेस)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली व १९०७ पर्यंत हा पक्ष पारतंत्र्यात इंग्रज सरकार विरुद्ध लढा देत होता. १९०७-१० दरम्यान हा पक्ष मवाळ व जहाल गटात विभक्तरीत्या काम करत होता. १९२०-१९४७ या पक्षाचे नेतृत्व महात्मा गांधीनी केले व देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या पक्षाचे विसर्जन व्हावे असे गांधीजींना वाटत होते. कारण पक्षस्थापनेच उद्दिष्ट पूर्ण झाले असे त्यांना वाटत होते. निवडणुकात सहभाग, सत्ताप्राप्ती हा काँग्रेसेचा उद्देश गांधीना अभिप्रेत नव्हता. पण महत्त्वाकांक्षी धुरंधर काँग्रेस नेत्यांनी त्यास देशाचा प्रमुख सत्ताधारी पक्ष म्हणून स्थापित केले. हा पक्ष भारताच्या एकूणच राजकीय जीवनावर अत्यंत व्यापक प्रभाव टाकणारा ठरला. स्वातंत्र्यानंतर जवळपास ६० वर्षे हा पक्ष सत्तेत होता व एकपक्षीय वर्चस्व असलेल्या पक्षपद्धतीचा या दरम्यान प्रत्यय येतो.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची पक्षीय संघटना अतिशय मजबूत आहे, गावपातळीपासून ते राष्ट्रस्तरावरील केंद्रिय समितीपर्यंत पद परंपरेप्रमाणे संघटनेची विस्तृत बांधणी करण्यात आली आहे. पक्षाचे सदस्यत्व प्राथमिक व सक्रिय अशा दोन स्वरूपाचे आहे. भारतातील सर्व राज्याच्या प्रांतिय काँग्रेस समित्यावर राष्ट्रीय समितीचे नियंत्रण असते. त्यात एक अध्यक्ष, कार्यकारीणी समिती, अखिल भारतीय काँग्रेस समिती, वार्षिक अधिवेशन इ. चा समावेश होतो, कार्यकारीणीत २० सदस्य असतात त्यात १० अ.भा. काँग्रेस समितीद्वारे निवडून आलेले व १० अध्यक्षाकडून नियुक्त. काँग्रेस पक्ष सांसदीय बोर्डात अध्यक्ष व इतर सदस्य असतात. काँग्रेसच्या घटनेत 'हायकमांड' अतिशय महत्त्वाची आहे. यात पक्षातील सर्वश्रेष्ठ व सर्वात प्रभावी नेत्यांचा गट असतो जो पक्षाच्या एकूणच निर्णय व कृती कार्यक्रमावर नियंत्रण ठेवतो.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी शक्यतो नेहरूंचे वंशज व गांधी घराण्याची वर्णी लागते. काँग्रेस पक्षाच्या संघटनेची धुरा गांधी घराण्यास लाभलेल्या वलयावर अवलंबून आहे, म्हणून सध्या सोनिया गांधी पक्षाच्या सर्वेसर्वा आहेत. पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाखाली इतर सर्व काँग्रेस नेत्यांचे अस्तित्व केवळ त्यांचे समर्थक म्हणूनच होते. पक्षांतर्गत कुचंबनेमुळे व वेगळ्या महत्त्वाकांक्षेपोटी काँग्रेसमध्ये सर्वाधिक पक्षांतर्गत गटबाजी नेहमीच दिसून आली आहे. या पक्षातून वेळोवेळी असंतुष्टने त्यांनी फुटून वेगळ्या पक्षाची स्थापना केली. १९६९ मध्ये इंदिरा गांधींशी काही वरीष्ट नेत्यांचे मतभेद झाल्याने पक्ष विघटीत झाला. मात्र इंदिराच्या नेतृत्वास मानणारा वर्ग काँग्रेस (आय) सोबत होता जो संख्येने मोठा होता. नेहरूकालीन भारतीय राजकारण तर केवळ काँग्रेसच्या निर्विवाद वर्चस्वाचेच होते पण नंतरही १९६९ पासून इंदिरा गांधीनीही भारतीय राजकारणावर आपली मजबूत पकड टिकून ठेवली. १९७१-७२च्या निवडणुकात मोठे यश या पक्षास मिळाले. परंतु आणीबाणीच्या कलमांच्या गैर वापरामुळे लोकांनी काँग्रेसला १९७७ च्या निवडणुकात नाकारले. या संधीचा फायदा विरोधी पक्षांना घेता आला नाही. मध्यावधी निवडणुकात १९८०साली काँग्रेस पुन्हा बहुमताने सत्तेत आली. इंदिरा गांधीच्या मृत्युनंतर सर्वाधिक ४०२ जागा १९८४ च्या निवडणूकात काँग्रेसला मिळाल्या तेव्हा स्व. राजीव गांधी पंतप्रधान झाले. नंतर पी. व्ही. नरसिंहराव १९९१-१९९६, मनमोहन सिंग २००४-२०१४ यांनी देशाचे पंतप्रधानपद भूषविले. कॉंग्रेस युपीए सरकारने तब्बल दहा वर्षे केंद्रात वर्चस्व राखले मात्र २०१४च्या सार्वत्रिक निवडणुकात काँग्रेसचे पतन झाले आहे. विरोधी पक्षाचा दर्जाही भांडून मिळवावा लागला आहे.

### ● सिद्धांत व कार्यक्रम

काँग्रेस पक्षांची वैचारिक भूमिका व कार्यक्रम पक्षाच्या घटनेच्या पहिल्याच कलमात स्पष्ट करण्यात आली आहे. पक्षाचे ध्येय भारताच्या नागरिकांचे कल्याण व उन्नती आहे. शांतीमय व संवैधानिक मार्गाने समाजवादी राज्य स्थापनेचा आधार संसदीय लोकशाही असेल व संधी आणि समता, विश्वशांती आणि विश्वभातृत्व हे उद्दिष्ट असेल. यावरून कळते की काँग्रेसची निश्चित अशी विचारसरणी नाही पण उच्च ध्येय आहेत ज्यांच्या प्राप्तीसाठी व्यावहारीक कृतीकार्यक्रमावर पक्षाचा भर आहे.

(०१) संपत्तीचे केंद्रीकरण रोखणे व सामाजिक न्यायासाठी प्रयत्न करणे.

(०२) कृषी क्षेत्रास बळकटी देणे.

(०३) मोठ्या व सार्वजनिक उद्योगांची स्थापणा

(०४) रोजगार उपलब्ध करून देणे.

(०५) दारिद्र्य निर्मूलन

(०६) शिक्षणाचा प्रसार व बालशिक्षण

(०७) ग्रामीण विकासावर भर

(०८) वैज्ञानिक दृष्टीकोण व तंत्रज्ञानावर भर

(०९) अल्पसंख्याक व दलितांच्या हक्कांचे संरक्षण करणे.

(१०) शांततापूर्ण सहअस्तित्वाची परराष्ट्रनिती.

या मुद्यांना धरूनच कॉंग्रेस नेहमी पुरोगामी भूमिका घेत आला आहे, घोषणापत्रातून दलित + मुस्लिम मतांना आकर्षित करण्याची युक्ती त्यांच्या निवडणुका लढण्याचे तंत्र आहे. पण हल्लीच्या निवडणूकात या समीकरणाचा समाचार जनतेने घेतला. जातीय राजकारणाच्याही बेरजा, त्यांना ६० वर्षे पुरल्या मात्र काळाच्या ओघात विकासासाठी अनुकूल मतदार मानसिकतेचा वेध त्याना या सार्वत्रिक निवडणुकात घेता आला नाही, म्हणून पक्षास मोठे अपयश पदरी पडले.

## (आ) भारतीय जनता पार्टी

भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय कार्य समितीद्वारे दुहेरी सदस्यत्व अमान्य केल्यामुळे लालकृष्ण अडवाणी यांनी ६ एप्रिल १९८० रोजी जनता पार्टीच्या सदस्यांचे दोन दिवशीय संमेलन बोलावून या धोरणाच्या विरोधी बाजूने असणाऱ्या ४००० प्रतिनिधींनी या संमेलनात भाग घेतला व याठिकाणी भारतीय जनता पक्षाची स्थापना करण्यात आली.अटलबिहारी वाजपेयी यांना अध्यक्ष तर अडवाणी, सिंकदर बख्त व मुरली मनोहर जोशी यांना सचिव नियुक्त केले गेले. जनसंघाच्या माजी सदस्यांसोबतच संघ व तत्सम विचारसरणीशी संबंध नसणारे शांतीभुषण, बख्त, राम जेठमलानी, इ. नेतेही पक्षात सामिल झाले. जयप्रकाश व गांधीच्या आदर्शाने ६ मे १९८० रोजी पक्षाने ५ निष्ठा व्यक्त केल्या. ज्यात राष्ट्रवाद व राष्ट्रीय सौजन्य, लोकशाही, प्रभावी धर्मनिरपेक्षता, गांधीवाद व समाजवाद या तत्वावर आधारीत स्वच्छ राजकारण यांचा उल्लेख केला गेला. या विचारांशी सहमत सर्व लोकांना सदस्यत्व देण्याचे ठरले. राष्ट्राच्या मूलभूत समस्या विषयी सर्वमताने तोडगा काढणे, नियोजित विकास व प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने लहान राज्यांच्या निर्मितीवर भर दिला.

भारतीय जनतापक्ष उजव्या विचारसरणीचा असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्वच सदस्य या पक्षाचे मुख्य, समर्थक असल्याचे मानले जाते. शिवाय अखंड भारत व हिंदु राष्ट्रवाद या संकलपनांचाही आधार घेतल्याने सनातन हिंदु, शहरी मध्यमवर्ग बुद्धीजीवी वर्गाचे ही मोठ्या प्रमाणावर पक्षाने समर्थन प्राप्त केले. पक्षाच्या कामगिरीचा आलेख शुन्यावस्थेपासून वाढता आहे. राज्यपातळीवर यशस्वी ठरल्यानंतर १९८२ ला लोकसभेच्या पोटनिवडणुकात ७ पैकी २ जागा मिळवणारा पक्ष १९८४ ला मात्र इंदिरांच्या मृत्यूनंतर सहानुभूतीची लाट असल्याने त्या निवडणूकीत म्हणजे ८ व्या लोकसभेत २२१ उमेदवारांपैकी केवळ २ उमदेवार निवडून आले होते.

१९८९ ला २२७ जागेवर निवडणूक लढविताना ८६ जागा मिळवल्या, १९९१ च्या निवडणूकात १२० जागा मिळवून प्रमुख विरोधी पक्ष बनला. १९९६ ला १६१ जागा जिंकुनही व सर्वात मोठा पक्ष असूनही सरकार स्थापनेसाठीचा आकडा पक्ष गाठू शकला नाही, १९९८ ला त्रिशंकुजनादेश आला मात्र १७९ जागा जिंकुनही मित्र पक्षांची साथ न मिळाल्याने मध्यावधी निवडणुका झाल्या. सप्टें. १९९९च्या १३ व्या लोकसभा निवडणूकात पक्षास १८२ जागा व २३.७%मते मिळाली व तेलगुदेसम सारख्या (२९ जागा) मित्र पक्षांच्या आधाराने राष्ट्रीय लोकशाही आघाडी (भाजपा प्रणित)चे सरकार बनले. अटलबिहारी वाजपेयी देशाचे पंतप्रधान बनले. मात्र सहकारी पक्षांच्या हितांमध्ये समन्वय साधतांना स्पष्ट बहुमत नसल्याने पक्षाची कामगिरी म्हणावी तशी सरस नव्हती. पण १६ व्या लोकसभा निवडणुकीत भारतीय राजकारणात ऐतिहासिक बदल घडवून आणतांना पक्षाने २८३ जागा काबीज करून स्वबळावर व स्पष्ट बहुमताचे सरकार स्थापन केले आहे, सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी असून त्यांच्याच व्यक्तिमत्व प्रभावाने भाजपाला हे यश मिळाल्याचे मानले जात आहे. या निवडणुकीत भारतीय पक्ष पद्धती व राजकारणात अमूलाग्र बदल दिसून आला. मतदारांनी स्पष्ट जनादेश देऊन राजकीय स्थैर्य व विकासाला प्राधान्य दिले व काँग्रेसचे कधी झाले नव्हते तेवढे पतन या निवडणुकीत झाले. भाजप हिंदु पुरस्कृत पक्ष असल्याचे सांगून डावे व काँग्रेस सारखे विरोधक हा पक्ष इतरांप्रती असहिष्णू असल्याचा कांगावा राजकीय वैफल्यातून करतांना दिसत आहेत.

## (इ) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (सी.पी.आय.)

एम. एन. रॉय यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने २६ डिसेंबर १९२५ रोजी भारतात साम्यवादी पक्षाची स्थापना झाली. १९२८ला या पक्षाची कार्यपद्धती ठरविण्यात आली, खंर तर सोव्हिएत संघाच्या मार्गदर्शनाखाली भारतात साम्यवादी चळवळ सुरू झाली होती. सुरूवातीस काहींना तेथून प्रशिक्षणही मिळाले होते. स्वातंत्र्य लढ्यात साम्यवाद्यांनी काँग्रेसला सहकार्य केले पण दुसऱ्या महायुद्धा वेळी काँग्रेस व साम्यवादी नेत्यात मतभेद झाले कारण काँग्रेस ब्रिटीश विरोधी तर साम्यवादी ब्रिटीशांना जर्मनी विरुद्ध संघर्षासाठी सहकार्य करण्याच्या मताचे होते. याचे कारण रशिया व ब्रिटन एका बाजुने लढत होते. १९४५ ला काँग्रेसने सर्व साम्यवादी नेत्यांना महासमितीतून काढून टाकले. तेव्हा पासूनच साम्यवादी स्वतंत्र भारताच्या सर्वच व्यवस्थेत नकारात्मक मानसिकतेने सहभागी होतात. संविधान निर्मितीवेळी त्यांनी यास ''दास्यत्वाचे घोषणापत्र'' म्हणून संबोधले होते.

● **पक्ष संघटना**

साम्यवादी पक्षाचे ग्राम पातळीपासून ते राष्ट्रपातळी पर्यंतचे संघटनस्तरीय समित्याद्वारे होते, राष्ट्रीय परिषद सर्वोच्च असते. पक्षावर केंद्रीय नियंत्रण आयोग ही आहे. विचारधारेशी सहमत असणारा व्यक्ती या पक्षाचा सदस्य होऊ शकतो.

● **भारतीय राजकारणात स्थान**

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर पक्षाने १४-१७ फेब्रु. १९४८ ला कलकत्ता थेसिस स्वीकृत केला, ज्यानुसार मिळालेले स्वातंत्र्य हे खरे नसून नेहरूंनी भांडवलवादी हितांशी व राष्ट्रांशी सलोखा केला आहे व त्यामुळे रणदिवे सारख्या पक्षनेत्यांनी भारतात ही सोव्हिएत क्रांती करण्याची भाषा केली, साम्यवाद्यानी देशभर अनेक हिंसक आंदोलनेही केली.

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकात पक्षास २७ जागा मिळाल्या, एन. के. गोपालन यांनी त्यावेळी काँग्रेस व्यतिरिक्त इतर पक्षांसी मिळून सरकार स्थापण्याचेही प्रयत्न केले. दुसऱ्या निवडणुकीत २९ जागा मिळाल्या व तो काँग्रेस व्यतिरिक्त सर्वात मोठा राजकीय पक्ष होता. पक्षाचा खरा प्रभाव तत्कालीन केरळ विधानसभा निवडणुकात दिसून आला जेथे पूर्ण बहुमताने ५ एप्रिल १९५७ ला पक्षाचे सरकार बनले. परंतु पश्चिम बंगाल, केरळ या प्रमुख राज्यव्यतिरिक्त हा पक्ष राज्यस्तरावर इतर ठिकाणी कामगिरीत सुमार राहीला आहे. १९५३ ला पक्षात मतभेद झाले, जे १९६२च्या चीन मुद्यानंतर विकोपास गेले, पक्षात फुट पडली व विचासरणीची धार बोथट झाली. १९७१, ७२ ला काँग्रेसचा सहकारी पक्ष व नंतरही अनेक वेळा सत्तेत सहभागी होतांना हा पक्ष इतर पक्षासी हातमिळवणी करतांना दिसतो. १९७७ ला केवळ ७ सदस्य निवडून आले, तर १९८० ला ११ जागी कम्युनिस्टांना यश आले. १९८४ ला ६ तर १९८९ ला १२ जागा. यात थोडी वाढ होत १९९१-१४ जागा, १९९६ - १२, १९९८-९ जागा, १९९९ मध्ये फक्त ४ जागा मिळाल्या. थोडक्यात कम्युनिस्टांच्या कामगिरीचा आलेख ९०च्या दशकानंतर उत्तरोत्तर खालावत गेला.

● **सिद्धांत व कार्यक्रम**

(१) खाजगी संपत्ती व भांडवलवादावर नियंत्रण

(२) नवीन आर्थिक धोरणास विरोध

(३) कामगार व शेतकरी वर्गाच्या हितांचे संरक्षण

(४) न्यायव्यवस्थेवर संसदेचे नियंत्रण असण्यावर भर.

(५) मोठे उद्योग, बँका यांचे राष्ट्रीयकरण करण्यावर भर.

(६) परराष्ट्र धोरणाबाबत साम्यवादी देशांशी जवळीक साधण्याचा मानस. इ. प्रमुख मुद्दे त्यांच्या घोषणापत्रांतून वारंवार दिसून येतात. सध्या सिताराम येचुरी, प्रकाश करात, इ. पक्षाचे प्रमुख नेते आहेत.

## (ई) जनता दल (Janta Dal)

१९८७-८८च्या दरम्यान काँग्रेसच्या एक पक्षीय प्रभुत्वाच्या विरोधात महत्त्वाकांक्षी नेते व गटांनी एक पर्यायाच्या रूपाने 'जनतादल' स्थापण केला. विश्वनाथ प्रताप सिंग यांना पहिले अध्यक्षपद देण्यात आले. रामकृष्ण हेगडे, अजितसिंग इतर नेतेही प्रमुख पदावर होते. सर्व मिळून १४० सदस्यीय राष्ट्रीय कार्यकारीणी बनविली गेली. १९९० ला पक्षाचे विभाजन झाले. चंद्रशेखर व देवीलाल यांनी जनता दल (एस.) ची स्थापना केली, पाठोपाठ अजिंतसिंग ही वेगळे झाले व १९९७ साली लालू प्रसाद यादवांसह उर्वरीत नेत्यांना घेऊन राष्ट्रीय जनता दलची स्थापना केली. ओरीसात बीजू पटनायकांनी १९९७ ला बीजु जनता दल स्थापण केला. १९९९ ला राष्ट्रीय जनतादल या पक्षाचे विभाजन होऊन नितिशकुमार, शरद यादव यांचा जनता दल युनायटेड व इतर नेत्यांचा जनतादल सेक्युलर असे दोन पक्ष परत तयार झाले. या पक्षास सगळ्यात मोठे यश १९८९ च्या सार्वत्रिक निवडणूका मिळाले. १४२ लोकसभेच्या जागा त्यांना मिळाल्या व जनता दल प्रणित राष्ट्रीय मोर्चाचे सरकार केंद्रात सत्तेत आले. त्याचे पंतप्रधान चंद्रशेखर होते. १९९६ लाही संयुक्त मोर्चा सरकारमध्ये जनता दलाचा मोठा वाटा होता. १६ व्या लोकसभेत मात्र कोणत्याही जनता दलास विशेष कामगिरी करता आली नाही. मात्र राज्यपातळीवर बिहार मध्ये पुन्हा जनता दला व सहकाऱ्यांचेच सरकार आले आहे.

**विचारसरणी व कार्यक्रम**

(१) कामाचा अधिकार व माहितीचा अधिकार मूलभूत हक्कात समाविष्ट करणे.

(२) निवडणूक सुधारणा कायद्याची अंमलबजावणी, राजकीय सुधारणा.

(३) भ्रष्टाचार निर्मूलनास कटीबद्द.

(४) आर्थिक नियोजनात ग्रामीण,मागास, उपेक्षित वर्गाच्या उत्कर्षासाठी अधिकाधिक तरतूद करणे.

(५) महिला व वंचितांना आरक्षण देण्यावर भर.

(६) अल्पसंख्याक व मागासवर्गीयांना सामाजिक सुरक्षितता बहाल करणे.

इ. कार्यक्रम त्यांच्या घोषणापत्रातून वारंवार घोषित केले जातात, मात्र पक्षाचा खरा लोकाधार व मते त्यास जातीय आधारावर मिळतांना दिसतात. बिहार, उत्तरप्रदेश, हरियाणा, राजस्थान, इ. राज्यात हा पक्ष प्रभावी आहे.

## (५) भारतातील राज्यपातळीवरील पक्ष

भारतीय पक्षपद्धतीचे स्वरूप सातत्याने बदलताना दिसते यात १९६७ नंतर प्रादेशिक पक्षांचा प्रभाव लक्षवेधक आहे. प्रांतीय हितांना तसेच स्थानिक अस्मितेला भांडवल करून राज्यपातळीवर आज अनेक पक्ष सत्तेत सहभागी झाले आहेत. एवढेच नाही तर केंद्रात जेव्हा संयुक्त सरकार बनले तेव्हा प्रदेशिक पक्षांचे बळ व त्यांचा राष्ट्रीय राजकारणावरील प्रभाव ही अनुभवायला मिळाला. या पक्षांचा आधार प्रामुख्याने संकुचित हितसंबंध असतो. उदा. धर्म, प्रांत, भाषा, जात, स्वायत्तता, इ. प्रादेशिक राजकीय पक्षांची निर्मिती व विकास स्थानिक प्रभावी राजकीय नेतृत्वामुळे झाला असल्याचे दिसते उदा. बाळासाहेब ठाकरे, फारूख अब्दुल्ला, करुणाकरण, एन. टी. रामराव, चौधरी चरणसिंग, बीजु पटनायक, इ. केंद्र – राज्य संबंधातील तनावामुळेही अनेक प्रादेशिक पक्षांच्या निर्मितीला पोषक वातावरण लाभले आहे.

भारतात तीन प्रकारचे प्रादेशिक राजकीय पक्ष आहेत. पहिल्या प्रकारात जाती, धर्म, प्रांत किंवा सामुदायिक हिंताचे प्रतिनिधीत्व करणारे पक्ष उदा. द्रविड मुनेत्र कळघम (तामिळनाडू) डी. एम. के. आणि ए. डी. एम. के., अकाली दल (पंजाब), नॅशनल कॉन्फरन्स (जम्मु-काश्मिर), शिवसेना (महाराष्ट्र), झारखण्ड पार्टी (बिहार), नागालँड – नॅशनल डेमोक्रेटीक पार्टी, आसामगण परिषद, मिझो नॅशनल फ्रंट, इ. तेलगु देसम (आंध्रप्रदेश)

दुसऱ्या प्रकारात कॉंग्रेसपासून वेगळे झालेले पक्ष – तृणमुल कॉंग्रेस, भारतीय क्रांती दल, बंगला कॉंग्रेस, उत्कल कॉंग्रेस, तेलंगणा प्रजा समिती, हरियाण लोक दल, इ. आणि तिसऱ्या प्रकारात, वैचारिकदृष्ट्या राष्ट्रीय पण समर्थन बघता ते राज्यस्तरावर कार्यरत आहेत असे पक्ष फॉरवर्ड ब्लॉक, मुस्लिम लीग, सोशलिस्ट युनिटी सेंटर, इ.

### ● प्रादेशिक पक्षांचे औचित्य

प्रादेशिक राजकीय पक्षांकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक असण्याचे काहीच कारण नाही. त्यांच्या अस्तित्वमुळे राष्ट्रीय एकता व अखंडतेला बाधा आली नसून भारताच्या संघव्यवस्थेचे पोषणच होत आहे. शिवाय प्रत्येक सामाजिक, भौगोलिक लोकघटकांचे योग्य प्रतिनिधीत्व व हितसंरक्षण होत आहे. केंद्राकडून राज्यावर कुरघोडीचे प्रयत्न कमी होतांना दिसत आहेत. राज्यांची ओळख व अधिकार अबाधित आहेत केंद्राच्या पक्षपाती धोरणांमुळे देशात अनेक राज्यात जो असंतुलित विकास दिसतो. त्यावरही या पक्षांमुळे नियंत्रण स्थापन झाले. थोडक्यात संविधानास अपेक्षित संसदीय लोकशाही व संघप्राणालीचे औचित्यपूर्ण संचलन प्रादेशिक राजकीय पक्षांमुळे होत आले आहे.

थोडक्यात भारतीय लोकशाहीचे यशस्वी संचलन करतांना भारतीय राजकीय पक्षांची वेळोवेळी होणारे बदल आत्मसात केले व देशाच्या संसदीय शासन पद्धतीस कधीही अवकळा येऊ दिली नाही. पक्ष पद्धतीतील एवढी स्थित्यंतरे इतर कुठेही आली नसतील जेवढी भारतात आली. कॉंग्रेसचा वर्चस्वाचा काळएकपक्षीय वर्चस्व असणारी पक्षपद्धती म्हणून गणल्या जातो तर नंतरचा काळ बहुपक्ष पद्धतीचा होता. केंद्रात बऱ्याच वेळा संयुक्त सरकार बनले. पुन्हा कॉंग्रेस प्रणित आघाडीचे वर्चस्व स्थापण होऊन प्रभावी पक्ष असणाऱ्या द्विपक्ष पद्धतीचा काळ आला. १६व्या लोकसभा निवडणुकांनी तर भारतीय पक्ष पद्धतीत ऐतिहासिक बदल घडवून आणला. भाजपा या एकाच पक्षाला बहुमत देत जनतेने पुन्हा एक पक्षीय प्रभुत्वास कौल दिला. यावेळी मात्र कॉंग्रेस सत्तेत नाही, पण इतर सर्व विरोधी पक्षांनी मिळून कॉंग्रेसला भाजपाविरोधी उभा केल्याचे चित्र दिसते. भाजपा विरोधी महागठबंधन ही अनेक राज्यात अस्तित्वात आल्याचे दिसून येत आहे.

## ४.२.५ दबाव गट

राजकारणात दबावगट किंवा हितसमुह या संकल्पना नवीन नाहीत. इतिहासात अनेक उदाहरणातून दिसते की लोकांनी राज्य व्यवस्थेस दबावात आणून मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी स्वत:च्या संघटना निर्माण केल्या. या समूहांना आधुनिक राजकीय परिस्थितीमध्ये विशिष्ट नावाने ओळखल्या जाऊ लागले आहे. आर्थर बेंटले यांच्या १९०८ साली प्रकाशित झालेल्या दि प्रोसेस ऑफ गव्हर्नमेंट' या पुस्तकातून दबावगटांच्या अभ्यासास खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. आणि तेव्हापासून विशिष्ट

समुहांचे विशिष्ट हित संबंध असतात व ते साध्य करण्यासाठी त्या समूहांकडून राजकीय व्यवस्थेत प्रभावित करण्याचे कसे प्रयत्न होतात याचे विश्लेषण महत्त्वाचे मानले जाऊ लागले. सामाजिक व्यवस्था असो किंवा राजकारण हे वेगवेगळ्या समुहांच्या अभिव्यक्तींचा एकत्रित परिणाम असतो. या दबावसमूहांत कामगार, धार्मिक, जातीय, व्यावसायिक, भाषिक, नोकरशाही, इत्यादीचे समूह त्यांच्या विशिष्ट हितांना साध्य करण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांच्या हितसंबंधात आपसात संघर्ष ही होतो पण यात समन्वय साधण्याचा दबावही सरकारवरच असतो. आधुनिक राजकारणात दबावगटांना लोकशाहीस पोषक मानले जात आहे. ज्या मार्फतसमाजातील सर्वच घटकांचे हितसंवर्धन होतांना दिसते व शासन अधिक लोकाभिमूख होतांना दिसते. म्हणून दबावगटांना राजकीय व्यवस्थेतील इतर संस्थांप्रमाणेच आवश्यक संस्था मानलेल्या आहे.

## (१) अर्थ व स्वरूप

दबावगट या संबोधनाबाबतच अभ्यासकांत मतभेद आहेत, अनेक विचारवंत हितसमूह, समूह, संघ, इत्यादी शब्द उपयुक्त मानतात. दबाव गट हा शब्द नकारात्मक असल्याचे त्यांचे मत आहे. यात समूहाने दबाव, बलप्रयोग किंवा इतर अनैतिक मार्गाचा अवलंब केल्याचे निर्देशित होते. पण प्रत्यक्षात हे समूह फक्त राजकीय व्यवस्थेशी क्रिया प्रतिक्रियांच्या माध्यमातून आपले उद्देश साध्य करू पाहतात. त्यांचा उद्देश सत्तेत सहभागी होणे नसतो, तर समूहाच्या काही हितांची पूर्ती करणे असतो. उद्देश पूर्ण होताच काही समूहांचे विसर्जन ही होते. समाजात शेतकरी, मजूर, शिक्षक, विद्यार्थी, व्यावसायिक, इत्यादी समूह सारख्या हितांच्या व्यक्तिंचे मिळून बनलेले असतात. तसेच एक व्यक्ति अनेक गटांचा सदस्य ही असू शकतो. कारण एका व्यक्तीचे अनेक हित असू शकतात.असे समूह जेव्हा आपण उद्देशांना साध्य करण्यासाठी शासनाशी आंतरक्रिया करतात व शासनाच्या, धोरणनिर्मितीस प्रभावीत करतात. थोडक्यात 'शासनावर संवैधानिक मार्गानेच मागण्यांचा दबाव आणतात. तेव्हा त्यांना दबावगट म्हटले जाते'. दबाव हा शब्दच खऱ्या अर्थाने या समुहांच्या स्वरूप, भूमिका आणि राज्यवस्थेत यांच्या महत्त्वाचे द्योतक आहे.दबाव गटांच्या व्याख्यांपैकी पीटर ओडीगार्डने केलेली व्याख्या अधिक तार्किक वाटते त्यात ते म्हणतात की, ''दबावगट ही अशा लोकांची औपचारीक संघटना असते ज्यांचे उद्देश किंवा स्वार्थ एकसारखे असतात आणि ते साध्य करण्यासाठी किंवा सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाच्या निर्णय प्रक्रियेस व धोरणास प्रभावीत करण्याचा प्रयत्न करतात.'' थोडक्यात दबाव गट एक माध्यम आहे ज्याद्वारे सारख्या हितसंबंधाचे लोक शासनावर आपल्या मागण्यांचा दबाव आणतात व त्या पूर्ण करून घेण्याचा प्रयत्न करतात. म्हणून त्यांची ही लक्षणे आपणास सांगता येतील.

(१) दबावगट आपले उद्देश साध्य करण्यासाठी धोरण निर्धारकावर दबाव आणत असतात.
(२) दबाव गटात विशिष्ट हितांशी व मुद्यांशी संबंधित असतात.
(३) ह्या राजकीय संघटना नसतात त्यामुळे पक्षाप्रमाणे निवडणुकातही भाग घेत नाहीत.
(४) दबावगटांना 'अज्ञात साम्राज्य' म्हटले जाते कारण जेव्हा विशिष्टा व्यक्तिगटांचे हितसंबंध धोक्यात असते तेव्हाच ते सक्रिय होतात.

## (२) राजकीय पक्ष व दबावगट

राजकीय पक्ष आणि दबावगटात मूलभूत फरक आहे. दबावगट हे सामाजिक समूह आहेत तर पक्ष हे राजकीय. पक्षांची सदस्यसंख्या, उद्देश, कृतीकार्यक्रम व संघटना खूप व्यापक असते त्या तुलनेत दबावगट अतिशय संकुचित असतात.पक्षामध्ये विविध स्तरातील लोकांच्या हितसंबंधात समन्वय राखला जातो तर दबावगट केवळ एका विशिष्ट लोकसमुहाचे हित अभिव्यक्त करतो. राजकीय पक्ष निवडणूका लढवून सत्तेत सहभागी होतात, दबावगट मात्र कोणत्याही निवडणुकीत व संवैधानिक पदावर आपले सदस्य पाठवत नाहीत. राजकीय पक्ष सांसदीय शासन व्यवस्थेचे निर्वाहक असतात व शासन यंत्रणेत काम करतात तर या यंत्रणेबाहेर दबावगट कार्यरत असतात.पक्ष स्थायी संघटना असतात तर दबावगट प्रांसगिक संघटन असतात.राजकीय पक्षांचा सदस्य हा एकावेळी एकाच पक्षाचा सदस्य असतो मात्र दबावगटाचे सदस्य हितपरत्वे अनेक दबावगटाचे एकाच वेळी सदस्य असू शकतात, इत्यादी मुद्यांवरून दबावगटांचे स्वरूप लक्षात येते. त्याचबरोबर राजकीय पक्षापासून ते कसे वेगळे आहेत याचाही अंदाज येतो.

## (३) दबावगटांचे तंत्र

(१) आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ लोकांना आपली बाजू पटवून देणे व त्यासाठी प्रचार आणि प्रसार करणे.
(२) आपल्या हिताच्या व सोयीच्या आकडेवारीचे संकलन व प्रकाशन करणे.
(३) सभा संमेलने आयोजित करून संघटन वाढविणे.

(४) कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या सदस्यांमार्फत लॉबी बनवने.

(५) प्रदर्शन करणे ज्यात रॅली, मिरवणूका, संप यांचा समावेश होतो.

(६) निवडणुकांदरम्यान मतदारांच्या बौद्धिक विचाराचे प्रयत्न करणे जेणे करून आपले हित साध्य करण्यासाठी दबाव वाढविता येईल. या तंत्रांचा प्रयोग करून दबावगट आपले हेतू साध्य करण्यासाठी प्रयत्न करतात. ज्यांचा प्रभाव थेट राजकीय व्यवस्था आणि शासनसंस्थेवर होत असतो.

**(४) दबावगटांचे प्रकार**

भारतीय राजकारणात दबावगटांचे प्रामुख्याने चार प्रकार दिसून येतात. त्यापैकी पहिला संस्थात्मक दबावगट हा फार प्रभावी आहे. कारण व्यवस्थेमध्ये राहून हे कार्य करतात उदा. नोकरशाही, सेना, सत्ताधारीपक्षांच्या शिखर समित्या या दबावगटांना संस्थात्मक आधार असल्याने त्यांचे संघटन व्यापक व ठोस असते. ते आपल्या हितांच्या व्यतिरिक्त समाजाच्या इतर घटकांशी संबंधीत असतात. व्यवस्थेत सामावलेले असल्याने निर्णय प्रक्रियेवर त्याचा प्रभाव तत्काळ व तीव्र स्वरूपाचा असतो. उदा. वन रँक वन पेन्शनची सैनिकांची मागणी शासनाला मान्य करावी लागली.

दुसऱ्या प्रकारात संघटनात्मक दबावगट आहेत.ज्यामध्ये एका विशिष्ट समुहाच्या संघटनेंचा समावेश होतो. उदा. शेतकरी, व्यावसायिक, वकील संघ, प्राध्यापक संघटना, इ. यांचे विशिष्ट हितसंबंध व त्या अनुषंगाने मागण्या असतात. ज्यांची पुर्तता करून घेण्यासाठी विविध माध्यमाने शासनावर दबाव आणतात. उदा. सोन्यावर अधिक कर लादल्याने २०१६-१७च्या केंद्रीय बजटचा सोन्या चांदीच्या व्यापाऱ्यांच्या अखिल भारतीय संघटनेने जोरदार विरोध केला आहे. तिसऱ्या प्रकारात असमूहात्मक दबाव गट येतात त्यात प्रामुख्याने पारंपरिक व संकुचित हितावर आधारीत अनौपचारिक समुहांचा समावेश होतो. उदा. धार्मिक संघटना, जातीय संघटना, भाषिक संघटना, इ. दबाव गट आपल्या विशिष्ट हितसंबंधांची अभिव्यक्ती संकुचित भावनेने करतात. चौथ्या प्रकारात, प्रदर्शक दबावगट येतात यांचे वैशिष्ट्ये म्हणजे आपल्या मागण्या मांडण्यासाठी अशांती व संवैधानिक मार्गाचा ते अवलंब करतात उदा. चळवळी, दंगे, जाळपोळ, धरणे, घेराव, रास्तारोको, इ. आत्ताच हरियाणामध्ये जाट आरक्षणाच्या मुद्यावर जे हिंसक आंदोलन झाले ते याचे यथोचित उदाहरण आहे.

## ४.२.६ प्रसारमाध्यमे

प्रसार माध्यमे सामाजिक अभिसरणाचे (Social Mobilization) प्रमुख साधन आहेत आणि त्यामुळे आधुनिक राजकीय व्यवस्थांमध्ये त्यांना लोकशाहीचा महत्त्वाचा आधार मानला जातो. शासनव्यवस्थे एवढेच महत्त्व प्रसार माध्यमांना दिले जात आहे. कोणतेही शासन लोकांची मर्जी असेपर्यंत सत्तेत असू शकते. त्यास जनतेची अधिमान्यता म्हटले जाते. या अधिमान्यतेची निर्मितीही याच प्रसारमाध्यमांच्याद्वारे होते किंवा शासन लोकहितात नसेल तर राजकीय परिवर्तनाचे साधन ही प्रसारमाध्यमच ठरते. राजकीय आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतील अतिशय महत्त्वाचे साधन म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. लोकांच्या पारंपारिक मतांना व संकुचित राजकीय भावनांना तार्किक आवाहन करून जनतेची पुरोगामी राजकीय समाजाच्या दिशेने वाटचाल प्रसारमाध्यमांमुळेच शक्य होते. या सर्व चर्चेच्या केंद्रस्थानीआहे 'लोकमत' कारण हाच कोणत्याही राज्यव्यवस्थेचा, राजकीय संस्कृतीचा व राजकीय विकासाचा आधार आहे.या लोकमताची निर्मिती प्रसार माध्यमाद्वारे होते. वर्तमानपत्रे, वृत्तवाहीन्या, रेडीओ व इतर दृकश्राव्य माध्यमे माहीती प्रसारणाबरोबरच शासनाच्या धोरणाचे मूल्यमापन करून ते जनतेपुढे मांडतात.लोकांची राजकीय समज वाढवतात. म्हणजेच त्यांचे राजकीय सामाजिकरण करीत असतात. तंत्रज्ञानातील व संचारातील क्रांतीमुळे माध्यमांचा प्रभाव अतिशय वाढला आहे. लोकांच्या दैनंदिन जीवनाचा ते अविभाज्य घटक बनले आहेत. करमणूकीबरोबरच सामाजिक व राजकीय प्रश्नांविषयी लोकजागृतीही माध्यमे करीत आहेत. प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडींची माहीती जनतेला देतांना प्रासंगिक निवेदन प्रादेशिक बातमीपत्रे, वृत्तवाहीण्यावरील विशेष कार्यक्रम, चर्चा, मुलाखती पत्रव्यवहार, इत्यादीद्वारे लोकांच्या मानसिकता आणि मनोभूमिका प्रसार माध्यमेच घडविताना दिसत आहेत.

प्रसारमाध्यमे व्यवस्थेतर्गंत औपचारिक सहभाग घेत नसले तरी मात्र राजकीय व्यवस्था आणि लोक यांच्यातील अनौपचारिक दुवा आहेत, म्हणून प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य ही लोकशाहीची पहिली अट आहे कारण अभिव्यक्ति स्वातंत्र्य हा लोकशाहीचा पाया आहे. यावरच प्रसार माध्यमे काम करतात. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात तसेच युरोपीयन उदारमतवादी लोकशाही राष्ट्रांत प्रसारमाध्यमांना स्वायत्तता आहे.त्यामुळेच सर्वोच्च सत्ताधीशावरही तेथील माध्यमे निर्भिडपणे टिका करतात. पेटॅगॉन, वॉटरगेट, इ. भ्रष्टाचार अमेरिकेत, माध्यमांनीच उघडकीस आणले. भारतातही तहलका, कोलगेट, कॉमनवेल्थ घोटाळा, तेलगीप्रकरण २जी प्रकरण व इतर अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणं प्रसारमाध्यमानींच जनतेच्या लक्षात आणून दिली. त्याचाच परिणाम १६ व्या लोकसभा निवडणुकात एक हाती सत्तापरिवर्तन झाले आहे.

**● प्रसार माध्यमांची प्रमुख वैशिष्ट्ये**

(१) प्रसारमाध्यमांना राजकीय व्यवस्था व जनता यांच्यातील अनौपचारिक दुवा म्हणता येईल.

(२) राजकीय व्यवस्थेत लोकांच्या मागण्यांच्या व अपेक्षांच्या तुलनेत शासनाने प्रदान केलेल्या धोरणाचे मूल्यमापण करून व्यवस्थेत लोकांच्या प्रतिक्रियांचे प्रत्याभरण माध्यमे करतात.

(३) प्रसारमाध्यमे राजकीय सामाजिकरणाचे प्रभावी साधन असतात.

(४) प्रसारमाध्यमे राजकीय आधुनिकीकरणाचेही प्रमुख साधन आहेत.

(५) प्रचाराच्या माध्यमातून लोकमताची निर्मिती ते करत असतात.

भारतात आज अनेक प्रकारची प्रसारमाध्यमे उपलब्ध आहेत.पण त्यातल्या त्यात 'इलेक्ट्रॉनिक मिडीया' हा लोकसंसुचनाचा सर्वात प्रभावी प्रकार आहे. देशातील मोठ मोठी राजकीय परिवर्तने माध्यमाने प्रसारीत केलेल्या भूमिकेवरून ठरत आहेत, उदा. जनलोकपाल आंदोलनात अण्णा हजारेना मोठी प्रसिद्धी देऊन भारतीय माध्यमांनी पारंपरिक भारतीय राजकारणात मोठी परिवर्तनाची लाट आणली. वृत्तपत्रे व इतर छापील माध्यमे तसेच रेडीओ सारखे आजच्याही युगात उपयुक्त असणारे माध्यम सामाजिक बांधिलकेचे भान घेऊन काम करतात. पंतप्रधानांनाही 'मन की बात' या रेडीओवर प्रसारीत होणाऱ्या कार्यक्रमाचा आधार घेऊन आपली भूमिका लोकांना पटवून देण्याची गरज पडली. राजकीय घटनांचा सर्वांगीण लेखाजोखा ही माध्यमे लोकांमुळे मांडत असतात.

लोकशाही शासनव्यवस्थेत प्रसारमाध्यमांना अधिक स्वायत्तता असते व अभिव्यक्ति स्वातंत्र्याच्या नावाने ती कायद्याने संरक्षित केलेली असते, उलट हकूमशाही, सर्वकषशाही किंवा राजेशाही या प्रकारात प्रसारमाध्यमे शासननियंत्रित असतात व शासनाची भालवणच करतांना दिसतात. मूल्यमापनाचे कार्य तेथे ते करू शकत नाहीत.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

(१) चमत्कारी नेतृत्व हे भारतीय राजकीय संस्कृतीचे वैशिष्ट्ये आहे.

(२) भारताने एकपक्ष पद्धतीचा स्विकार केला आहे.

(३) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना १८८५मध्ये झाली.

(४) शेतकरी संघटना ही दबावगट म्हणून कार्य करते.

(५) शिवसेना हा राजकीय पक्ष आहे.

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**राजकीय संस्कृती :** राजकीय व्यवस्थेची प्रतिके आणि मूल्य यांचा समुच्चय म्हणजे राजकीय संस्कृती होय.

**द्विपक्षीय व्यवस्था :** ज्या देशात दोन पक्ष महत्त्वाचे प्रतिस्पर्धी असतात त्या व्यवस्थेस द्विपक्षीय व्यवस्था म्हणतात.

**बहुपक्षीय व्यवस्था :** ज्या व्यवस्थेत अनेक लहान-मोठे पक्ष असून कोणताही एक पक्ष स्वबळाच्या आधारावर सत्ता मिळवू शकेल इतका मोठा असत नाही यास बहुपक्षीय व्यवस्था म्हणतात.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) बरोबर

(२) चूक

(३) बरोबर

(४) बरोबर

(५) बरोबर

## ४.५ सारांश

प्रसारमाध्यमे आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये निर्णय प्रक्रिया आणि क्रियान्वयण यांच्या मूल्यमापणात निर्णायक भूमिका बजावतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा परिपाक यामुळे होत राहतो. लोकाभिमुखत्ता राखणे शासनास गरजेचे होते. सर्वसामान्यांचे प्रश्न व अपेक्षा शासनापर्यंत पोहचविणे तसेच शासनाच्या भ्रष्ट, लोकहिताविरोधी धोरणांवरही लोकजागृतीच्या माध्यमाने जरब बसतो. प्रसारमाध्यमे समाजाला व राज्यव्यवस्थेला आरसा दाखविण्याचे काम करतात. म्हणून त्यांचे स्वातंत्र्य व निरपेक्षता अबाधित राहणे गरजेचे आहे.जर माध्यमांनी प्रामाणिक भूमिका ठेवली नाही तर संपूर्ण देश चुकीच्या वाटेने चालू शकतो.येलो जर्नालीजम, पेंड न्युज, इ. गैरप्रकार माध्यमातही घुसले असल्याने केवळ टी. आर. पी. वाढविण्यासाठी भारतात माध्यमांचा दर्जा खालावत चालला होता. पण मागील काही वर्षांपासून भारतीय प्रसारमाध्यमांत सुधारणा होतांना दिसत आहे, केवळ अनावश्यक हस्तक्षेप, पक्षपात, अप्रस्तुत घटना व व्यक्तिंचे जाहीरातीकरण त्यांनी बंद करावे व राष्ट्रहित कसे कार्य करतात येईल बघावे अशी अपेक्षा सजग नागरीकांची आहे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नाचे थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारतीय राजकीय संस्कृतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(२) राजकीय पक्ष पद्धतीचे प्रकार सांगा?

(३) लोकशाहीतील राजकीय पक्षांची कार्ये लिहा.

(४) दबाव गटांचे प्रकार सांगा.

(५) प्रसारमाध्यमांची वैशिष्ट्ये लिहा.

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) चौधरी, एल. (२०१४). *भारताचे संविधान.* पुणे चौधरी लॉ पब्लिशर्स.

(२) Grova, V. (Vol.8) *Politics of Influence*. Violence and pressure groups.

(३) Heywood, A. (2006). *Politics*. Palgrave Foundan, Reprint.

(४) Basu, D. (2002). *Introduction to the Indian constitution*. Nagpur, 19th edition reprint.

(५) भोळे, भा. ल. (२००३). *भारताचे शासन आणि राजकारण.* नागपूर, पिंपळापुरे अँण्ड कंपनी.

(६) Gibbins, J. (1989). *Contemporary Political Culture.*

# घटक ५ : संविधान आणि शिक्षण

*अनुक्रमणिका*


५. ० उद्दिष्टे
५. १ प्रास्ताविक
५. २ विषय-विवेचन
  ५. २.१ मुलभूत अधिकार व शिक्षण
  ५. २.२ मार्गदर्शक तत्त्वे आणि शिक्षण
  ५. २.३ मुलांच्या मोफत व अनिवार्य शिक्षणाचा हक्क कायदा २००९
  ५. २.४ शिक्षणविषयक वैधानिक मंडळे
  ५. २.५ देशाचे शैक्षणिक धोरणे व आयोग
५.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
५.५ सारांश
५.६ सरावासाठी स्वाध्याय
५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ५. ० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला -

- भारताच्या संविधानातील शिक्षण विषयक तरतुदींची माहिती मिळेल.
- नव्याने अंमलात आलेल्या शिक्षणाचा अधिकार जाणून घेता येईल.
- मूलभूत अधिकारांच्या यादीत शिक्षणाचा समावेश झाल्यानंतर शैक्षणिक धोरणात झालेले बदल अभ्यासता येतील.
- देशाचे शैक्षणिक धोरणाबद्दल माहिती मिळेल.

## ५. १ प्रास्ताविक

भारतीय शिक्षणपद्धती आणि शैक्षणिक धोरणे यात काळाप्रमाणे अनेक बदल होत गेले आहेत. वैदिक युगापासुन पारंपरिक शिक्षण पद्धती आणि त्यास पोषक सामाजिक व राजकीय नियम आधुनिक काळातही अस्तित्त्वात होते. १९व्या शतकापर्यंत भारतात शिक्षण घेण्याचा अधिकार विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित होता. स्त्रियांना, तर शिक्षणाचा हक्क नव्हता. इंग्रजानी काही सामाजिक सुधारणांना संरक्षण दिले. त्यापैकी शिक्षण विषयक सुधारणा प्रमुख आहेत. वैदिक व गुरुकूल शिक्षण पद्धती अतिशय गौरवपूर्ण होती. पण ती सर्वसामान्यांसाठी असल्याने इंग्रजी व पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा भारतात जम बसला. सत्ता ब्रिटीशांकडे असल्याने लॉर्ड मेकाले यांनी आज भारतात अस्तित्त्वात असलेल्या शिक्षण व्यवस्थेचा पाया घातला. मर्यादित शिक्षण संस्था व ठराविक दर्जा, भारतीयांना दुय्यम वागणूक यामुळे हा काळ ही शिक्षणाच्यादृष्टीने फार आशादायी नव्हता.

भारताच्या शिक्षणव्यवस्थेचा खरा विकास स्वातंत्र्यानंतर सुरू झाला. संविधान परिषदेच्या चर्चेतून शिक्षण विषयक मूलभूत अधिकार आणि राज्याची या संदर्भातील जबाबदारी यांचा उहापोह करण्यात आला. शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार कलम २९ व ३० आणि मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण विषयक तरतुद करण्याचे शासनाला निश्चित करतांना कलम ४५ अन्वये स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला दिशा दिली. मार्गदर्शक तत्त्वांत उल्लेख केल्या गेला की, घटना अंमलात आल्यापासून येत्या १० वर्षात १४ वर्षाखालील सर्व मूलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले जाण्यासंदर्भात शासनाने ठोस पाउले उचलली पाहिजेत. या अपेक्षेची पुर्तता करतांना शासनाला ६० वर्षे लागली. १९६८ पासून त्यादिशेने प्रयत्न सुरू झाले आणि १९९० व ९२च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून तसेच २००२ मध्ये झालेल्या ८६ व्या घटनादुरुस्तीने शिक्षणाचा अधिकार हा मुलभूत अधिकारात समाविष्ट होईपर्यंत शासनाने विविध स्तरावर याबाबत विचारविनिमय केला व संभाव्य वाटचालींची रूपरेषा आखली. घटनादुरुस्तीनंतर 'मुलाच्या मोफत व अनिवार्य शिक्षणाचा अधिकार कायदा (२००९) अस्तित्त्वात आला, ज्याची अंमलबजावणी २०१० पासून जम्मू व काश्मिर व्यतिरिक्त देशभरात सर्वत्र झाली आहे.

संविधानातील शिक्षणविषयक तरतुदी आणि त्यानुसार भारतीय शैक्षणिक धोरणाचा विकास प्रामुख्याने दोन महत्त्वाच्या घटना दुरूस्त्यांनी प्रभावीत झाला आहे. एक म्हणजे ४२वी घटना दुरूस्ती १९७६ ला झाली ज्यात शिक्षण हा विषय सामाजिक महत्त्वाचा मानला गेला व राज्यसुचीतून तो समवर्तीसुचीत टाकण्यात आला, आणि दुसऱ्या वेळी ८६वी घटना दुरूस्ती झाली त्यात शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून मान्य करण्यात आला. या दोन्हींचा परिपाक म्हणून शिक्षणाचा हक्क विषयक कायदा, २००९मध्ये अस्तित्त्वात आला. भारतीय संविधानात शिक्षणास अतिशय महत्त्व देण्यात आले आहे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत: शिक्षणाच्या महत्त्वाचे दाखले आयुष्यभर दिले. संविधानात प्राथमिक शिक्षणाच्या सोबत उच्च, तंत्र व व्यावसायिक शिक्षणाविषयी महत्त्वाच्या तरतुदी आहेत. याशिवाय मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल घटक, अलपसंख्याक, आणि स्त्रिया यांच्या शैक्षणिक अधिकारांचेही संरक्षण करण्यात आले आहे.

## ५.२ विषय-विवेचन

### ५.२.१ मूलभूत अधिकार व शिक्षण

सध्याच्या भारतीय शिक्षणव्यवस्थेची मुहुर्तमेढ स्वातंत्र्यपूर्व काळातच रोवल्या गेली. पाश्चात्य उदारमतवादी शिक्षणाचा प्रभाव आमच्या प्रमुख राष्ट्रीय नेतृत्त्वावरही झालेला दिसतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संविधान निर्मितीचे महत्त्वाचे कार्य या नेत्यांमुळे होते, भारताची मोठी लोकसंख्या, विविधता, निरक्षरता, दारिद्र्य प्रतिगामी विचार या सर्व समस्यां भारताचे संविधान निर्माण करतांना ध्यानी ठेवून कार्य करायचे होते. संविधान सभेत घटनापरिषद व मसुदासमितीच्या परिश्रमानंतर २६ नोव्हें. १९४९ रोजी भारतीय संविधानाची निर्मिती झाली. संविधानात व्यक्तिची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, हक्कासोबतच सार्वजनिक हिताची व सदृश्य, समतेची ही प्रस्थापना करण्यात आली. संविधान निर्मात्यांचा दृष्टीकोन व अपेक्षांचे प्रतिबिंब उद्देशपत्रिकेतून उमटलेले आहे आणि या आदर्शांची अंमलबजावणी करण्यासाठी संविधानाच्या तिसऱ्या व चौथ्या भागावर अधिक भर देण्यात आला. म्हणजेच मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे. संविधानातील प्रमुख शिक्षणविषयक तरतुदी याच भागात समाविष्ट केल्या आहेत. अनेक विद्वानाचं मत आहे की, भारताच्या संविधानातील मूलभूत हक्कांमध्ये आजवरच्या सर्व राजकीय व नागरी अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कांच्या घोषणापत्रातील कलम २ ते २१मध्ये ज्या अधिकारांचा उल्लेख करण्यात आला ते सर्व आपल्या मूलभूत हक्कांत सामिल झाले. पण या घोषणापत्राच्या २६व्या कलमान्वये १९४८ साली सांगण्यात आले होते की, प्रत्येकास शिक्षणाचा अधिकार आहे. शिक्षण हे मोफत व अनिवार्य असले पाहिजे किमान प्राथमिक स्तरावरील शिक्षण तरी मोफत व सक्तीचे असावे. या शिफारशीला भारतीय संविधानात अप्रत्यक्षपणे कलम ४५ म्हणजेच मागर्दशक तत्त्वांमध्ये स्थान देण्यात आले होते. त्यानंतर कित्येकवेळा शिक्षणाचा हक्क हा मूलभूत अधिकारात सामिल करावा या आशयाची मतं, शिफारशी शासनापुढे आल्या. संविधान पुनर्विलोकन आयोगाच्या (२००२) मधील शिफारशींमध्येही १४ वर्षापर्यंतच्या सर्व मूलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार असावा असे सूचित करण्यात आले होते.

भारत शासनाचे १९९२ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखले तेंव्हा १९९० च्या धोरणाचे परिक्षण करतांना ही शिफारस पुढे आली की शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क असतो याच दरम्यान १९९२ला शासनाने युनोच्या Convention on The Right of Child (CRC) करारावर सह्या केल्या आणि शिक्षणाच्या हक्कास मूलभूत हक्काचे स्थान देण्याच्या प्रक्रियेस सुरूवात

झाली. आणि शेवटी २००२ झाली, ८६ व्या घटनादुरुस्तीने कलम २१ (ए) मध्ये शिक्षणाच्या हक्काचा समावेश करण्यात आला.

## (१) शिक्षणाच्या हक्काबाबत प्रमुख घटनादुरुस्त्या

शिक्षणाच्या हक्कांबाबत काही प्रमुख घटनादुरुस्त्या मैलाचा दगड ठरल्या ज्यांचा आढावा घेणे येथे गरजेचे आहे.

### (अ) ४२वी घटना दुरुस्ती १९७६

संविधानाने संघीय शासनप्रणाली स्थापित केल्याने राज्य आणि केंद्राचे अधिकारक्षेत्र वेगवेगळे आहे. ज्यात दोघांनाही विषयांची विभागणी करून देण्यात आली आहे, केंद्रसूची, राज्यसूची, समवर्तीसूची आणि उर्वरीत अधिकार यापैकी समवर्ती सूचीतील विषय केंद्र व राज्य दोन्हींच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. १९७६ पूर्वी शिक्षण हा विषय राज्यसूचीत असल्याने केंद्र त्यावर कायदा करू शकत नव्हते आणि राज्यांच्या स्थितीनुसार शिक्षणाची गती होती. पण ४२व्या घटनादुरुस्तीने शिक्षण समवर्तीसूचीत टाकण्यात आले, तेव्हा केंद्रासही शिक्षणविषयी कायदे करणे आणि निर्णय घेणे सोपे झाले. एवढेच नाही तर त्यामुळे राज्य व केंद्राच्या कायद्यात समन्वय स्थापन झाला. जेथे या विषयावर केंद्राने केलेल्या कायद्या व्यतिरिक्त राज्य काही करायला गेले तर त्यांचे कायदे आपोआपच रद्द होतील कारण शिक्षण आज समवर्ती सूचीतील विषय आहे.

### (ब) ८६वी घटनादुरुस्ती २००२

या घटनादुरुस्तीने शिक्षणाच्या हक्कास संवैधानिक आधार मिळवून दिला. आता शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क आहे. या दुरुस्तीने नव्याने कलम २१ (ए) याचा समावेश मूलभूत हक्कात केला ज्या अन्वये ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मूलांना शिक्षणाचा मूलभूत हक्क बहाल करण्यात आला आहे. याच घटनादुरुस्तीमध्ये कलम ४५ बदलून ६ वर्षापर्यंतच्या मुलांचे संगोपन व शिक्षण मिळेल याची व्यवस्था शासनाने करावी असे कलम टाकण्यात आले आहे व मूलभूत कर्तव्यांच्या कलम ५१मध्ये पोटभाग (ए) जोडून पालकांनी आपल्या ६ ते १४ वर्षापर्यंतच्या पाल्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी हे त्यांचे मूलभूत कर्तव्य असल्याचे म्हटले आहे.

### (क) ९३ वी घटना दुरुस्ती

२००५ साली करण्यात आलेल्या संविधानातील या दुरुस्तीने २० जाने. २००६ पासून कलम १५मध्ये पोटकलम (५) समाविष्ट करण्यात आले आहे, ज्यानुसार संसदेला अनुसूचीत जाती/जमाती तसेच सामाजिक व आर्थिक मागास घटकांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे, ज्यान्वये या सर्व घटकांना शासकीय, निमशासकीय किंवा खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये (अल्पसंख्यांक शिक्षणसंस्था वगळून) प्रवेशाच्या माफक संधी उपलब्ध होतील.

## (२) शिक्षण हक्कविषयक महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय

शिक्षणाच्या अधिकाराच्या विकासात काही न्यायालयीन निर्णयांचे योगदान ही महत्त्वाचे आहे. या संदर्भात १९९२ च्या दोन खटल्यामधील निर्णयांचा प्रामुख्याने विचार करता येईल. एक मोहिनी जैन विरुद्ध कर्नाटक राज्य खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निकाल देतांना शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकाराशी संबंधित असून घटनेच्याच तिसऱ्या भागात तो अंतर्भूत आहे, त्यामुळे या देशाच्या प्रत्येक नागरीकास शिक्षणाचा हक्क आहे. या निर्णयाचे पुनर्विलोकन करतांना १९९३ सालच्या उन्नीकृष्णा वि. आंध्रप्रदेश राज्य खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने सुधारीत निर्णय दिला की, जरी संविधानात शिक्षणाचा हक्क स्पष्टपणे नमुद नसला तरी अप्रत्यक्षपणे तो कलम २१ अंतर्गत जीवन जगण्याच्या हक्कात समाविष्ट असून मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने त्याचा समावेश हक्कांत करता येईल. पण सध्या तरी शिक्षणाच्या हक्कांचा विचार मार्गदर्शक तत्त्वांच्या कलम ४१ व ४५ च्या संदर्भानेच करावा लागेल. त्यात देशातील प्रत्येक १४ वर्षाखालील बालकास मोफत शिक्षणाचा अधिकार आहे. आणि १४ वर्षानंतर राज्य व केंद्र सरकारने आपल्या क्षमतेनुसार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. या दुसऱ्यानिर्णयात शिक्षणाचा हक्क केवळ १४ वर्षापर्यंतच्या बालकांसाठी असून व्यावसायिक अभ्यासक्रम आणि उच्च शिक्षणासाठी हा लागू होणार नाही असेच अस्पष्टपणे न्यायालयाने सांगितले होते.

या सर्व घटनाक्रमानंतर आज घटनेच्या मूलभूत अधिकारांचा विस्तार झाला आहे. आणि त्यात समाविष्ट पुढील कलमान्वये शिक्षणाचा हक्क व शिक्षणविषयक इतर अधिकार नागरीकांना बहाल केले आहेत.

(१) कलम २१(ए) हे पोटकलम २००२ च्या घटनादुरुस्तीने जोडण्यात आले ज्या नुसार वयोगट ६ ते १४ पर्यंतच्या सर्व बालकांना मोफत व अनिवार्य शिक्षण घेण्याचा हक्क आहे. हा हक्क जीवन जगण्याच्या हक्काचाच एक भाग आहे.

(आ) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क कलम (२९ व ३०) कलम २९ अन्वये देशातील प्रत्येक नागरीक किंवा विशिष्ट नागरीक समुदायास आपल्या भाषा, लिपी आणि संस्कृती जपण्याचा हक्क आहे. कोणत्याही व्यक्तीस शासकीय मदतीने चालविल्या जाणाऱ्या किंवा प्रत्यक्ष शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थेत भाषा, धर्म, वंश व जात या कारणाने प्रवेश नाकारला जाणार नाही.

कलम ३०नुसार भारतातील अल्पसंख्यांक समुहांचे शैक्षणिक व सांस्कृतिक हित जपण्यासाठी त्यांना अलपसंख्यांक शैक्षणिकसंस्था स्थापन करण्याचा व त्या चालविण्याचा हक्क देण्यात आला आहे. अल्पसंख्यांकाचा मतितार्थ भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्यांक असा अभिप्रेत असून या शैक्षणिक संस्थांना पुर्ण स्वायत्तता देण्यात आली आहे जेणे करून ते आपल्या शिक्षणाचे माध्यम, अभ्यासक्रम व विषय आवडी, निवडीनुसार ठरवू शकतात. अनुदान देतांनाही शासन इतर शैक्षणिक संस्थाप्रमाणेच अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना अनुदान देईल त्यात भेदभाव करणार नाही. मात्र शासनाने अनुदान व अशा संस्थांना मान्यता देतांना त्यांचा कारभार स्वायत्त असला तरी तो गैरकारभार नसेल याची दक्षता घ्यावी. शासनाच्या आधीन राहूनच या संस्था चालवल्या जातील त्याचबरोबर शैक्षणिक दर्जा, सामाजिक, समस्या, स्वच्छता, आरोग्य, नैतिकता, अभ्यासक्रमाची आखणी बाबत सर्वसामान्य नियम, इ. चे पालन करणे गरजेचे आहे. टी. एम. ए. पाई वि. कर्नाटक राज्य खटल्यात निकाल देतांना न्यायालयाने म्हटले होते की, कलम ३० नुसार मिळालेला मुलभूत हक्क ही राष्ट्रहितानंतर येतात त्यामुळे अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांतून देशहितास बाधा पोचणार नाही याची दक्षता घेणे ही आवश्यक आहे.

## ५. २. २ मार्गदर्शक तत्त्वे आणि शिक्षण

घटनाकारांच्या शिक्षणाविषयीची जागरूकता मार्गदर्शक तत्त्वांमधून दिसून येते. सर्वच नागरी हक्क सुरूवातीला मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट करणे शक्य नव्हते. पण देशाने कोणत्या दिशेने वाटचाल करायची आहे व कोणती उद्दिष्टे साध्य करायची आहेत, याबाबतचे संकेत मार्गदर्शक तत्त्वांमधून देण्यात आले. मार्गदर्शक तत्त्वांची अवहेलना झाल्यास न्यायालयात दाद मागता येत नाही हे जरी खरे असले तरी कोणतेही शासन आपली लोकप्रियता टिकवून ठेवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे धोरण आखतेवेळी डोळ्यासमोर ठेवतेच. त्यांची पायमलली करत नाही. आज शिक्षणाचा हक्क मूलभूत हक्कांत सामिल झाला तो मार्गदर्शक तत्त्वातील काही तरतुदींच्या पार्श्वभूमीवरच म्हणजे कलम ४१ व कलम ४५, कलम ४१ नुसार शासनाने आपल्या आर्थिक क्षमतेनुसार आणि विकासाच्या गरजा लक्षात घेवून शिक्षणाच्या अधिकाराबाबत काही परीणामकारक तरतुदी कराव्यात आणि कलम ४५ नुसार १४ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना मोफत व अनिवार्य शिक्षण उपलब्ध करून देण्यास शासनाने प्रतिबद्ध असावे असे पूर्वी नमूद केले होते, त्यानुसार २००२ साली ४६व्या घटनादुरुस्तीने आता हा मूलभूत हक्क आहे. त्याऐवजी कलम ४५ मध्ये आता.
६ वर्षाखालील बालकाचे संगोपन आणि शिक्षण यांचा समावेश करण्यात आला आहे.

या शिवाय मूलभूत कर्तव्याच्या कलम ५१ (ए) मध्ये नमुद करण्यात आले आहे की, ६ ते १४ वर्ष वयोगटातील बालकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे प्रत्येक पालकाचे मूलभूत कर्तव्य आहे. मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्य यांची न्याययोग्य कलमे म्हणून संविधानात नोंद नसली तरी पण ते संविधानाचा अतिशय महत्त्वाचा भाग आहेत. एखाद्या घटनेची संवैधानिकता यांच्या आधारे ठरविली जाऊ शकते. आज अंमलात आलेला शिक्षणाचा अधिकार कायदा (२००९) याच तत्त्वांच्या पार्श्वभूमीवर अस्तित्वात आला आहे.

## ५. २. ३ मुलांच्या मोफत व अनिवार्य शिक्षणाचा हक्क कायदा, २००९

**(Right of Children to Free and Compulsory Edu. Act)**

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने २००२ साली ८६वी घटनादुरुस्ती झाली आणि मार्गदर्शक तत्त्वातील कलम ४५ नुसार शिक्षणाच्या अधिकाराची शिफारस मूलभूत अधिकाराच्या स्वरूपात मान्य करण्यात आली आणि कलम २१(ए) मध्ये त्याचा समावेश करण्यात आला. याच पार्श्वभूमी वर ऑगस्ट २००९ साली मुलांच्या मोफत आणि अनिवार्य शिक्षणाचा हक्क अधिनियम पारीत करण्यात आला. या कायद्याची अंमल बजावणी जम्मू काश्मिर वगळता भारतात सर्वत्र दि. १ एप्रिल २०१० पासून करण्यात आली आहे. या कायद्यान्वये भारतात पहिल्यांदाच ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व भारतीय मूलांना धर्म, प्रांत, भाषा, जात, लिंग, वंश, इ. बाबत भेदभाव न बाळगता शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. या चांगल्या व स्वागतार्ह निर्णयाचे श्रेय शासनाला व राज्यास देणे आवश्यक आहे. कारण या माध्यमातून शासनाने आपली शिक्षणविषयक जबाबदारी पार पाडली आहे. या कायद्यामध्ये पुढील प्रमुख बाबींचा समावेश आहे.

## (१) मुलांना मोफत व अनिवार्य शिक्षणाचा अधिकार

या कायद्यान्वये भारतातील प्रत्येक ६ ते १४ वर्षाच्या बालकास आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत जवळच्या शाळेत मोफत व अनिवार्य शिक्षणाचा अधिकार असेल, या बालकात मुले, मुली, दिव्यांग, मानसिक दृष्ट्या अक्षम सर्व प्रकारच्या बालकाचा समावेश असेल, समान संधी अधिकार संरक्षण आणि पूर्ण सहभाग अधिनियम १९९५च्या धर्तीवर दुर्बल घटक व दिव्यांग बालकाशी भेदभाव करता येणार नाही. त्यांनाही शिक्षणाचा अधिकार प्राप्त आहे, प्राथमिक शिक्षणाची व्याख्या करतांना पहिली ते आठवी पर्यंतचे शिक्षण असे यात म्हटले आहे. तसेच शासनाकडून स्थापण करण्यात आलेल्या, संचलन होत असलेल्या किंवा अनुदान घेत असलेल्या सर्व शाळांमध्ये हा नियम लागू असेल.

ज्या मुलांनी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले नाही, किंवा ६ वर्षापेक्षा जास्त वय होऊनही कोणत्याच शाळेत प्रवेश घेतलेला नाही, शाळा सोडली आहे किंवा अनुत्तीर्ण झाले आहेत त्यांना ही या कायद्यांतर्गत विशेष तरतुद करून शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. असे मुल त्याच्या वयानुसार पुढील वर्गात प्रवेश घेऊ शकतील व त्यांना विशेष प्रशिक्षणाची ही व्यवस्था करण्यात आली आहे.

अशा मुलांना आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करतांना प्रशिक्षणाची व्यवस्था शाळेच्या मुख्याध्यापकांनी करावी.

## (२) शाळेतील प्रवेश व स्थलांतर प्रमाणपत्र

शिक्षणाचा अधिकार बहाल करतांना हा कायदा सांगतो की शाळांनी दरवर्षी प्रवेश प्रक्रिया घालून दिलेल्या नियमाने पार पाडावी. कोणत्याही मुलास कागदपत्रांच्या त्रुटींमुळे प्रवेश नाकारू नये. कोणत्याही शाळेस मुलांना प्रवेश किंवा स्थलांतर प्रमाणपत्र (टी. सी. ) नाकारता येणार नाही. मुलांना आपल्या सोयीनुसार व निवडीनुसार शाळा निवडता येईल.

## (३) शाळेत प्रतिबंध घालता येणार नाही

या कायद्याच्या १६ व्या कलमा नुसार शाळेने कोणत्याही मुलास मागच्याच वर्गात ठेवू नये तसेच कोणत्याही मुलास शाळेतून काढण्यास प्रतिबंध घातला आहे. याचा अर्थ मुलाचे मूल्यमापण न करता केवळ त्यांना उत्तीर्ण करावे असा होत नाही तर सतत व सर्वसमावेशक मूल्यमापन पद्धतीने शिक्षकाने विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करावे.

## (४) शिक्षक व शिक्षणाचा दर्जा

या कायद्याच्या पाचव्या भागात शिक्षणाचा दर्जा हा शिक्षणाच्या अधिकाराचा अभिन्न भाग असल्याचे म्हटले आहे. कायद्याने घालुन दिलेल्या नियमांनुसार विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षकांच्या नियुक्त्या, त्यांचे प्रशिक्षण यांची व्यवस्था शाळेने करावी, शिक्षकांनी (Continuoues and Comprehensive Evaluation System) निरंतर व सर्वसमावेशक मूल्यमापन पद्धती अवलंबावी ज्यात प्रत्येक महिन्यास वर्ग चाचण्या आणि वार्षिक दोन सत्रात परीक्षा घ्याव्यात व सरासरीने विद्यार्थ्यांची कामगिरी तपासावी.

## (५) गैरप्रकारांना प्रतिबंध

या कायद्याने प्रवेशासाठी गैरमार्गाने घेतल्या जाणाऱ्या जादा पैसे किंवा डोनेशनला प्रतिबंध घातला आहे. तसेच शाळेत शारीरिक किंवा मानसिक शिक्षा देणे ही गुन्हा आहे. या कायद्याच्या सर्व निर्देशांचे पालन करणे शाळांना बंधनकारक आहे. शासनाच्या या संबंधित मान्यता प्रमाणपत्रा शिवाय आता कोणत्याही शाळेच्या स्थापणेस परवानगी मिळत नाही.

## (६) शाळांची जबाबदारी

या कायद्यान्वये शासकीय सर्व स्तरातील शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्वच मुलांना मोफत व अनिवार्य शिक्षण दिले जाईल. शासनाकडून अनुदान घेत असलेल्या शिक्षण संस्थांमध्ये शासनाकडून अनुदान घेत असल्याच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना शिक्षणाचा अधिकार द्यावा लागेल. ही संख्या एकूण विद्यार्थ्यांच्या कमीत कमी २५ टक्के असणे गरजेचे आहे. विशिष्ट गटातील शिक्षण संस्थांत २५टक्के दुर्बल घटकांतील मुलांना प्रवेश देणे तसेच प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व अनिवार्य शिक्षण देणे गरजेचे आहे, आणि विनाअनुदानीत खासगी शाळांतही जवळ दुसरी शासकीय शाळा नसल्यास मुलांना या कायद्यांतर्गत प्रवेश देणे गरजेचे आहे. अशा २५टक्के दुर्बल घटकांवर झालेला शैक्षणिक खर्च शासन त्या संस्थेला परत देईल अशी तरतूद आहे, परंतु या अधिकारांच्या संदर्भात प्रत्येक गोष्टीची माहिती शाळांनी व शैक्षणिक संस्थांनी तत्सम शासनाला देणे गरजेचे आहे.

## (०७) शासनाची जबाबदारी

शिक्षणाच्या अधिकाराची अंमलबजावणीची सगळ्यात मोठी जबाबदारी शासनावरच आहे. केंद्रीय शाळा, नवोदय विद्यालय व सैनिकी विद्यालय इ. विशिष्ट गटातील शाळां सहित सर्वस्तरावरील शाळांमध्ये या कायद्याच्या पालनाची भिस्त केंद्र सरकार, राज्यसरकार तसेच केंद्रशासित प्रदेशात तेथील प्रशासनावर आहे. या अंतर्गत शासनाने जिथे शाळा नाहीत तेथे शाळा स्थापण कराव्यात. एक ठरावीक अंतराने प्रत्येक भागात शाळा उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी. या कायद्याच्या अंमलबजावणीपासून तीन वर्षाच्या आत देशात सर्वत्र मुलांना शिक्षणाचा हक्क मिळेल एवढ्या शाळा शासनाने स्थापण कराव्यात. यासाठी लागणारा खर्च केंद्र तसेच राज्य शासन या दोघांची संयुक्त जबाबदारी असेल. केंद्राने प्रसंगी खर्चाचा अंदाज घेऊन राज्यशासनाला काही अनुदानही द्यावे, तसेच वित्त आयोगाने कलम २८० नुसार शाळांना अतिरिक्त उत्पादन साधने देण्याचा विचार करण्याची विनंती राष्ट्रपतीस करावी. थोडक्यात राज्य व केंद्राने मिळून या कायद्यच्या अंमलबजावणीचा खर्च करायचा आहे.

## (०८) शासनाचे कर्तव्य

शासनाने प्रत्येक मुलास मोफत व अनिवार्य शिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे, जेणे करून ६ ते १४ वर्ष वयोगटावरील मुलास आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करता येईल. तसेच ६ ते १४ वर्ष वयोगटातील प्रत्येक मुलांच्या अनिवार्य शालेय प्रवेश, उपस्थिती याची हमी शासनाने घ्यायला हवी. शासनाने शाळेस लागणाऱ्या पायाभूत सुविधा पुरवायला हव्यात. ज्यात शाळेची इमारत, शौचालय, स्वयंपाकघर, स्वच्छ पिण्याचे पाणी, ग्रंथालय, खेळाचे मैदान, इ. सुविधांचा समावेश होतो. तसेच शासनाने त्याच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या शाळांवर नियंत्रण ठेवावे. एकूणच दर्जेदार प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून द्यावे.

## (०९) शालेय व्यवस्थापन समिती

शाळेच्या व्यवस्थापनात समाजातील इतर घटकांसोबत महत्त्वाचे म्हणजे पालकवर्गाचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न याद्वारे व्हायला हवा. या कायद्याने शाळेच्या व्यवस्थापन समितीत ७५टक्के शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक सहभागी असावेत. त्यापैकी ५०टक्के महिला असाव्यात. या समित्यांना शाळांच्या कामगिरीवर विकास योजनांवर, लक्ष ठेवण्यासाठी विशेषाधिकार देण्यात आले आहेत.

## (१०) पालकांचे कर्तव्य

या कायद्याद्वारे पालकांचे हे कर्तव्य असेल, की त्यानी आपल्या ६ ते १४ वर्ष वयाच्या पाल्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध होईल, त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईल यासाठी प्रयत्न करावेत. तशी व्यवस्था करावी. जवळच्या शाळेत आपल्या पाल्याचा प्रवेश व पुढील शिक्षणाचा पाठपुरावा पालकाने करायला हवा.

## (११) बालक हक्क संरक्षण आयोग

मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराची अंमलबजावणी नीट होते की नाही यावर बालक हक्क संरक्षण आयोग कायदा २००५ अन्वये हा आयोग लक्ष ठेवेल. शिक्षणाच्या हक्क कायद्याच्या अंमलबजावणी बाबतच्या तक्रारीची चौकशी करणे आणि बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक पाऊले उचलणे ही कार्ये या आयोगाची आहेत.

## (१२) तक्रारीचे निवारण

शिक्षणाच्या अधिकारांच्या अंमलबजावणीबाबतच्या तक्रारीचे निवारण संबंधित शासनाने किंवा अधिकार मंडळाने तीन महिन्यांच्या आत करणे बंधनकारक आहे. तक्रार गंभीर स्वरूपाची असेल तर राज्य बालक हक्क संरक्षण आयोगाकडे ती वर्ग करावी.

## (१३) राष्ट्रीय सल्लागार समितीची स्थापना

केंद्रीय शासनाने जाहीरपणे केंद्रीय सल्लागार समितीची स्थापना करावी ज्यात १५ पेक्षा जास्त सदस्य नसतील. या सदस्यामध्ये शासनाने प्राथमिक शालेय शिक्षणासंदर्भात प्रत्यक्ष अनुभव असलेल्या तसेच बालविकास नियोजनात उल्लेखनीय योगदान असणाऱ्या व्यक्तींची नियुक्ती करावी. या सल्लागार समितीचे प्रमुख काम आहे की, शिक्षणाच्या अधिकाराची अंमलबजावणी अधिक परिणामाकारकरित्या होण्यासाठी उपाय सुचवावेत. याच धर्तीवर राज्यपातळीवरही राज्यशासनाने राज्य

सल्लागार समित्यांची स्थापना करावी. केंद्र शासनाला राज्यशासनास कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने निर्देश किंवा सूचना करण्याचा अधिकार असेल. तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीच्या मार्गात येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा अधिकारही केंद्र शासनास आहे.

एकंदरीत शासनाने मुलाच्या मोफत व अनिवार्य शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ अंमलात आणून आपल्या लोककल्याणाप्रती असलेल्या जबाबदारीस पार पाडले आहे. यासाठी शासनाला कौतुकाची थाप देणे गरजेचे आहे, पण याच सोबत ही केवळ शासनाची जबाबदारी आहे, म्हणून कुणीही आपले हात झटकता कामा नये. संविधानात कीतीही पुरोगामी तत्त्वांचा समावेश केला तरी समाजपरिवर्तनासाठी त्या तत्त्वांना समाजाचेही पाठबळ लागते. कायदे चांगलेच आहेत, पण त्यांची अंमलबजावणी करतांना शासनास आपण सहकार्य करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे, म्हणून शिक्षणाचा हक्क बहाल करण्यात आला असला तरी पालक, पाल्य, विद्यार्थी, शिक्षक या सगळ्याच घटकांत संविधान व कायद्याप्रती आदर व तत्परता असणे गरजेचे आहे. शासन, शैक्षणिक संस्था व नागरिक या सगळ्यांच्या समन्वयानेच प्राथमिक शिक्षणाचा हक्क या देशातील प्रत्येक मुलास मिळू शकते. त्यासाठी शिक्षणाच्या हक्काविषयी अजून जनजागृतीची आवश्यकता आहे.

## ५. २. ४ शिक्षण विषयक वैधानिक मंडळ

भारतात शिक्षणासंदर्भातील सर्व जबाबदाऱ्या व कार्य पार पाडण्यासाठी काही शीर्ष वैधानिक मंडळांची व्यवस्था केली आहे. त्या सगळ्यांचे सनियंत्रण केंद्रशासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालया मार्फत होते. प्रामुख्याने उच्च व तंत्र शिक्षण आणि शालेय शिक्षण असे दोन भाग केले जातात.

उच्च शिक्षणाची जबाबदारी UGC, AI CTE, यासारख्या संस्थावर असते तर शालेय शिक्षणासंदर्भात सर्वस्वी जबाबदारी NCERT या संस्थेवर सोपविली गेली आहे.

### (१) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद - National Council of Educational Research and Training (NCERT)

भारतात शालेय शिक्षणाच्या बाबतीत सर्व शैक्षणिक जबाबदाऱ्या या संस्थेवर सोपविण्यात आल्या आहेत, इतर सात उपसंस्थांची मिळून २७ जुलै १९६१ रोजी भारतीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने ही संस्था स्थापण करण्यात आली व या संस्थेने आपले प्रत्यक्ष कार्य १ सप्टेंबर १९६१ पासून सुरू केले. पुर्वी सात वेगवेगळ्या संस्था ज्या कार्य करत होत्या, त्या सर्वाचे विलीनीकरण या संस्थेत करण्यात आले. त्या संस्था होत्या. १ केंद्रिय शिक्षण संस्था (१९४७), केंद्रीय पाठ्यपुस्तक संशोधन मंडळ (१९५४),केंद्रिय शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन संस्था (१९५४), माध्यमिक शैक्षणिक कार्यक्रम विस्तार संचलनालय (१९५८), राष्ट्रीय मूलभूत शिक्षण संस्था (१९५६), राष्ट्रीय मूलभूत शिक्षण केंद्र (१९५६), आणि राष्ट्रीय दृकश्राव्य शिक्षण संस्था (१९५९), इ.

राष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे, या संस्थेची निर्मिती केंद्र शासनास शालेय शिक्षणाच्या संदर्भात कार्यात मदत व सल्ला देण्यासाठी करण्यात आली आहे. या संस्थेचे संचालक म्हणून डॉ. ऋषीकेश सेनापती यांची सप्टेंबर २०१५मध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. तेच सध्याचे संचालक आहेत. या संस्थेच्या स्थापनेमागे शासनाची तसेच या संस्थेची स्वत:ची काही उद्दिष्टे आहेत.

(१) राष्ट्रीय स्तरावर अभ्यासक्रमाचा आराखडा लागू करणे.

(२) प्राथमिक शिक्षणाचे वैश्वीकरण (UEE)

(३) व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण देणे.

(४) विशेष गरज असणाऱ्या समुहांचे शिक्षण

(५) तुलनात्मक मूल्यशिक्षण देणे.

(६) माहिती तंत्रज्ञानावर आधारीत शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी मूल्यमापन व परिक्षणाची व्यवस्था करणे.

(७) मुलींच्या शिक्षणाची विशेषत्त्वाने काळजी घेणे.

(८) शिकविणे आणि शिकण्याच्या संदर्भातील प्रक्रियाचे परिक्षण करणे.

(९) शिक्षकांच्या शिक्षणावर व प्रशिक्षणावर भर देणे.

(१०) शालेय शिक्षणपूर्व बालकांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे.

(११) विद्यार्थ्यांची वैचारीक पातळी उंचावणारे शिक्षण देणे.

## राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे उपक्रम

या संस्थेकडे व्यापक स्तरावर कृती कार्यक्रम असून या कार्यात राष्ट्रीय शिक्षण संस्था (NIE), विभागीय शिक्षण संस्था (RIE), केंद्रिय व्यावसायिक शिक्षण संस्था (CIVE) तसेच राज्यस्तरावरील क्षेत्रिय सल्लागार, इ. सर्व यंत्रणा कार्यरत असतात. संस्थेकडून वेगवेगळे उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात. ज्यात, बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानासारखे कार्यक्रम समाविष्ट असतात. शैक्षणिक उन्नतीसाठी कार्य पार पाडण्यासाठी ही संस्था राष्ट्र विकास समूहाच्या सचिवालयाचे कार्य करते. ज्यात प्रशिक्षण सुविधा कार्यशाळा, नवीन उपक्रम, इ. ची व्यवस्था देशातील शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीकरिता उपलब्ध करून दिली जाते. NCERT इयत्ता १ली ते १२वीच्या सर्व विषयांच्या पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करते, तसेच नमुना प्रश्नसंच पुरविते. ज्यांचा उपयोग देशभरातील CBSEच्या अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व शाळांना होतो.

या संस्थेच्या प्रकाशनासंदर्भात तसेच राजकीय हस्तक्षेपांमुळे अनेक वेगवेगळे वाद निर्माण झाले होते, तरी पण या संस्थेची देशाच्या शैक्षणिक प्रगतीसाठीची जबाबदारी मोठी असल्याने याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. एकूणच या संस्थेचे मूलभूत काम देशात शालेय शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, प्रत्येक मुलास शिक्षण कसे उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करणे हे आहे, या संदर्भात शासन NCERT या संस्थेच्या सर्व सुचनांचे हिरीरीने पालन करतांना दिसते.

### (२) विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission)

भारत सरकारने संविधानातील शिक्षण विषयक तरतुदींना प्रत्यक्षात लागू करण्यासाठी जी व्यवस्था केली आहे त्यात १९५६च्या कायद्यनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या नियंत्रणात ही संस्था कार्य करते. देशातील उच्च शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी शैक्षणिक संस्था व विद्यापीठांना अनुदान देणे, मान्यता देणे तसेच उच्च शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी समन्वय, नियंत्रण व निर्देशनाचे प्रमुख काम युजीसी करते. या संस्थेचे मुख्यालय दिल्ली येथे असून इतर सहा विभागीय कार्यालये पुणे, हैद्राबाद, बेंगलूर, कोलकाता, भोपाळ, गुवाहाटी येथे आहेत.

**युजीसीच्या अंतर्गत उच्च शिक्षणासंदर्भातील पुढील संस्था काम करतात.**

(०१) All India council for Technical Education (AICTE)
(०२) Indian Council of Agricultural Research (ICAR)
(०३) Bar Council of India (BCI)
(०४) National Council for Teacher Education (NCTE)
(०५) Rehabiliation Council of India (RCI)
(०६) Medical Council of India (MCI)
(०७) Pharmacy Council of India (PCI)
(०८) Indian Nursing Council (NIC)
(०९) Dental Council of India (DCI)
(१०) Central Council of Homeopathy (CCH)
(११) Central Council of Indian Medicine (CCIM)
(१२) National Council for Rural Institute (NCRI)
(१३) State Council of Higher Education (SCHE)
(१४) Councial of Architecture (COA)

उच्च शिक्षणाची व्यापक व्यवस्था हा उद्देश असतांनाच देशाच्या मनुष्यबळ व प्रगतीची भिस्त उच्च शिक्षणावरच असल्याने त्याचा दर्जा उंचावणे हे युजीसीसाठी नेहमीच आव्हान आहे. त्यात युजीसीच्या उपयोगितेविषयी तर्कवितर्कव नव्या शासनाने युजीसी ऐवजी पर्यायी संस्थेच्या स्थापणेचे दिलेले संकेत यावरून भविष्यात ही संस्था संपुष्टात येण्याची चिन्हे दिसत आहेत. उच्च शिक्षणास संशोधनावर अमाप निधी खर्च होऊनही दर्जेदार संशोधन होत नसल्याची खंत सर्व पातळीवर व्यक्त होत असतांना भाजपप्रणित NDA सरकार अंतर्गत मनुष्यबळ विकास मंत्रालयाने युजीसीचा विकास करून राष्ट्रीय उच्च शिक्षण व संशोधन आयोग National Commission for Higher Education and Research (NCHER) स्थापन करण्याची घोषणा केली आहे. यापूर्वी ही २०११ मधील उच्च शिक्षणाविषयीच्या एका बीलामध्ये याची शिफारस करण्यात आली होती.

याच धर्तीवर डिसेंबर २०१५ मध्ये उच्च शैक्षणिक संस्थाच्या गुणवत्ता पडताळणी व दर्जा निश्चित करण्यासाठी National Institution of Ranking Framwork ची स्थापना भारत सरकारने केली आहे.

१९५६ पासून विद्यापीठ अनुदान आयोगाने भारत सरकारच्या वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या शैक्षणिक धोरणानुसार उच्चशिक्षणाच्या विस्ताराचे, समन्वय व नियंत्रणाचे काम केले आहे. त्या अनुषंगाने देशातील उच्च शिक्षणाची धुरा युजीसी आणि शालेय शिक्षणाची NCERT वर आहे असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.

## ५.२.५ देशाचे शैक्षणिक धोरणे व आयोग

भारतात स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच शिक्षणाचा प्रचार व प्रसार शासनाचा एक प्रमुख उद्देश राहीला आहे. मोठ्या प्रमाणावर निरक्षरता व उच्च शिक्षणातील अल्प सहभाग या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने तसेच संविधानकर्त्यांनी शैक्षणिक वाटचाली संदर्भात संविधानातील तरतुदींच्या माध्यमातून जो मार्ग दाखवला त्यावर अंमल करण्यासाठी शासनाने वेळोवेळी प्रयत्न केले त्याचा मागोवा घेतांना लक्षात येते की भारतीय शिक्षणाच्या विकासाच्या टप्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मोठा वाटा आहे.

### (१) कोठारी आयोग (१९६४)

भारत सरकारने देशाच्या प्राथमिक ते उच्च शिक्षणाचे मूल्यमापन व परिक्षण करण्यासाठी दौलतसिंग कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली १४ जुलै १९६४ रोजी आयोग नेमला जो कोठारी आयोग म्हणून सर्वपरिचीत आहे. देशाच्या शैक्षणिक व्यवस्थेचे प्रतिमान उपयुक्त व दर्जेदार कसे होईल या संदर्भात या आयोगाने शिफारशी केल्या. १९६४-६६ या काळात आयोगाने तत्कालिन शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करून शिफारशी सरकारला सुपुर्द केल्या होत्या, ज्यामध्ये प्रमुख शिफारशी होत्या.

(१) शिक्षणव्यवस्थेचे आदर्श प्रतिमान १०+२+३ असावे.

(२) त्रिस्तरीय शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण असे असावे. शालेय शिक्षण वर्षभरात २३४ दिवस आणि उच्च शिक्षण २१६ दिवस चालले पाहिजे. ज्यात १००० प्रत्यक्ष कामाचे तास शाळेसाठी व ११०० उच्च शिक्षणासाठी असेल पाहिजे.

(३) शाळांना महाविद्यालये संलग्नित केली पाहिजे.

(४) विद्यार्थ्यांना पुस्तक बँक, शिष्यवृत्ती, वसतीगृह, अभ्यासिका, कमवा व शिका योजना, इ. सुविधा शिक्षणसंस्थांनी पुरविल्या पाहिजे.

(५) स्त्री शिक्षणावर केंद्र व राज्य शासनाने अधिक भर देण्याची शिफारस करण्यात आली.

(६) मुलींसाठी वसतीगृहे आणि शाळा स्थापण करण्यास शासनाने पुढाकार घ्यावा तसेच शैक्षणिक क्षेत्रात त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

(७) केंद्र व राज्य अशा दोन स्तरावर अभ्यासक्रम असावा त्यात शाळेतील प्रयोगशिलतेस वाव असला पाहिजे.

(८) अधिकाधिक मुलांना शालेय शिक्षणाचा लाभ मिळावा तसेच मागासवर्गीयांच्या प्रवेशासंदर्भात प्राथमिक तत्त्वावर प्रयत्न केले जाणे गरजेचे आहे.

या सर्व शिफारशींना शासनाने आपल्या सवलती आणि आर्थिक साधनांच्या उपलब्धतेनुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात समाविष्ट केले.

### (२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-१९६८

१९६६ च्या कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार भारतीय शिक्षण व्यवस्थेत मूलभूत परिवर्तन घडविणारे शैक्षणिक धोरण १९६८ला आखण्यात आले. संविधानाने सांगितल्याप्रमाणे १४ वर्षाखालील मुलांस मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा सर्वप्रथम निर्धार या धोरणातून करण्यात आला होता. शिक्षकांच्या भरती व प्रशिक्षणावर विशेष भर देण्यासंदर्भात ही यात गांभीर्याने विचार करण्यात आला होता. त्रिभाषीय सूत्र म्हणजे मातृभाषा, राष्ट्रभाषा, संपर्कभाषा या स्वरूपाच्या स्वीकारण्यात आले. तसेच प्रादेशिक भाषा अभ्यासक्रमात समावेश करण्यावर भर देण्यात आला. संस्कृतचा अभ्यासक्रमात समावेश करण्याचेही संकेत यात होते. या शैक्षणिक धोरणाने राष्ट्रीय एकूण उत्पन्नाच्या ६टक्के शिक्षणावर खर्च व्हावा असे सूचित केले होते.

### (३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

देशाचे तत्कालीन पंतप्रधान स्व. राजीव गांधी यानी देशाच्या नव्या शैक्षणिक धोरणाची घोषणा मे १९८६ साली केली ज्यात, विषमता नष्ट करून सर्वांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला होता. विशेषत: अनुसुचित जमाती, स्त्रिया, आणि अनुसुचित जाती यांना शिष्यवृत्तीत वाढ, प्रौढशिक्षण, या संवर्गातून अधिक शिक्षकांची भरती, गरीब कुटुंबांना त्यांच्या मुलांना शाळेत पाठविता यावे यासाठी आर्थिक मदत, नवीन शिक्षण संस्थांच्या विकासासाठी निधी, इ. या धोरणाचे प्रमुख वैशिष्ट्ये होते. प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात मुलकेंद्रित, मूल्य केंद्रित विद्यार्थी केंद्रित दृष्टीकोण ठेवून, 'ऑपरेशन ब्लॅक बोर्ड' उपक्रम राबविला गेला. प्राथमिक शिक्षणाचा देशभर प्रसार होण्यास याचा फायदा झाला. उच्च शिक्षणात 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची स्थापना' करण्यात आली. तसेच महात्मा गांधी यांच्या विचारांनुसार ग्रामीण विद्यापीठांना विशेष प्रोत्साहन या धोरणाने दिल्या गेले.

### (४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सुधारणा करतांना पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात १९९२ ला नवीन धोरण अमलात आले. त्यात 'किमान सार्वजनिक कार्यक्रम' या तत्त्वावर भर देण्यात आला होता आणि एक कृती कार्यक्रम जाहीर केला गेला. जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम याचाच भाग होता. त्यात ८५टक्के केंद्र सरकारचा निधी होता व १५टक्के राज्य सरकार खर्च करणार होते. याच धर्तीवर पुढे २००१ साली सर्वशिक्षा अभियान राबविण्यात आले होते. यासाठी केंद्रशासनानेआंतरराष्ट्रीय संघटना उदा. World Bank, UNICEF यांच्याकडून निधी उभारला होता.

वेळोवेळी शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात परिस्थितीनुसार बदल केले आहेत, या सर्व प्रक्रियेत केंद्रबिंदू विद्यार्थी आहे, कारण भारतात अजूनही १००%साक्षरतेचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. तेव्हा शिक्षणाचा अधिकाधिक प्रसार हाच खऱ्या अर्थाने संविधानातील शिक्षणाच्या अधिकाराचा हेतू आहे. तेव्हा प्रत्येक, मुलास मग तो मागासवर्गीय असो, स्त्री असो की दिव्यांग किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, सर्वांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे आव्हान शासनापुढे आहे. त्याच सोबत देशाच्या प्रगतीची भिस्त ज्या मनुष्याबळावर आहे ते दर्जेदार व कुशल असावे यासाठीही शासन प्रयत्नशील असते.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**जोड्या जुळवा**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (१) कोठारी आयोग | (अ) शिक्षणावर ६% खर्च व्हावा |
| (२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ | (ब) किमान सार्वजनिक कार्यक्रम |
| (३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ | (क) ऑपरेशन ब्लॅक बोर्ड |
| (४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२ | (ड) स्त्री शिक्षणावर भर |

## ५.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**समवर्ती सूची :** भारतीय राज्यघटनेतील अशी सूची ज्यातील विषयाबाबत केंद्रिय कायदेमंडळ व राज्य विधिमंडळ यांना कायदा करण्याचा अधिकार असतो.

**युजीसी :** युनिर्व्हसिटी ग्रँड कमिशन (U.G.C.)

**ऑपरेशन ब्लॅक बोर्ड :** प्राथमिक शाळांना मूलभूत सेवा-सुविधा पुरवणारी मोहिम.

## ५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) ड
(२) अ
(३) क
(४) ब

## ५.५ सारांश

मूलभूत हक्क हे भारतीय संविधानाचा प्रमुख गाभा आहे, त्यात शिक्षणाचा हक्क समाविष्ट करण्यामागे तसेच विविध संवैधानिक मंडळे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व व्यापक शैक्षणिक उपक्रम राबविण्यामागे संविधानकर्ते, राज्यकर्ते, प्रशासन व विज्ञान यांचा एकच उद्देश आहे, तो म्हणजे सुजान नागरिक निर्माण करणे. आपल्या हक्क व कर्तव्याची जाणीव शिक्षणातूनच मिळते त्यामुळे भारतात जन्माला येणारं प्रत्येक मुल शिक्षणापासून वंचित राहू नये ही पहिली अट आणि राष्ट्राचा शैक्षणिक दर्जा उंचावणे ही दुसरी अट संविधानाने घातली आहे.

आज माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे शिक्षणक्षेत्राच्या सर्वच पातळीवर परिस्थिती बदलत चालली आहे. परदेशी विद्यापीठे ही भारतात दाखल होऊ पाहत आहेत, प्राथमिक मोफत शिक्षण देणाऱ्या संस्थांचा दर्जा तसेच अनुदानित उच्च शिक्षण संस्थांचा दर्जा टिकविण्यासाठी शासनाला धोरणाचे परिक्षण करणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणाच्याही बाबतीत शासनाला सर्वसामान्य शिक्षण घेऊ शकतील याची व्यवस्था करावी लागेल. शिक्षण जर महाग असेल तर निश्चितच ते गरीबांसाठी राहणार नाही. केवळ शिक्षणाचा अधिकार मूलभूत हक्कात समाविष्ट करणे पुरेसे नाही. ही केवळ सुरूवात आहे ध्येय नव्हे. शासनाला या अधिकाराचा उपभोग घेता येईल अशी परिस्थितीही निर्माण करावयाची आहे. त्यामुळे संविधानने केवळ वाट दाखविली आहे. ध्येय गाठण्यासाठी शासन, व प्रत्येक नागरीकाने शिक्षणाविषयीच्या आपल्या कर्तव्य आणि प्रतिबद्धतेने पालन केले पाहिजे.

## ५.६ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मूलभूत हक्क व शिक्षण यावर चर्चा करा.
(२) ४२ व्या घटना दुरुस्तीचे महत्त्व सांगा.
(३) मुलांच्या मोफत व अनिवार्य शिक्षणाचा हक्क कायद्यावर सविस्तर चर्चा करा.
(४) कोठारी आयोग १९६४ यावर भाष्य करा.
(५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२ स्पष्ट करा.

## ५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) Kashyap, S. (2001). *Our Constitution*. New Delhi, National Book Trust of India.

(२) Aradhya, N. Kashyay, A. (2006). *The Fundamantals of the fundamental right to education in India*. Banglore for change.

(३) Juneja, N. (2009). *Indias Histeric Right to Free and Compulsory Education for children Act.*

(४) Pillai, C. (2004). *Right to Inducation in India*. New Delhi, IInd Internation conference on Law org. by UNESCO.

(५) *National Policy on Education*.


ज्ञानगंगा घरोघरी

# घटक ६ : निवडणूकप्रक्रिया

*अनुक्रमणिका*


६.० उद्दिष्टे
६.१ प्रास्ताविक
६.२ विषय-विवेचन
  ६.२.१ निवडणूकीबाबत घटनात्मक तरतुदी
  ६.२.२ निवडणूक आयोग
  ६.२.३ प्रत्यक्ष निवडणूकीची प्रक्रिया
  ६.२.४ निवडणूकांचे प्रकार
  ६.२.५ मतदारांचे राजकीय वर्तन
  ६.२.६ निवडणूक सुधारणा
६.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
६.५ सारांश
६.६ सरावासाठी स्वाध्याय
६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ६.० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला -

- लोकशाहीत निवडणूकांचे काय महत्त्व असते ते कळेल.
- वेगवेगळ्या स्तरावर निवडणूका कशा स्वरूपात घेतल्या जातात याचाही अंदाज येईल.
- भारतीय संविधानातील निवडणूक प्रक्रियेच्या संदर्भात ज्या तरतुदी करण्यात आल्या आहेत, त्यांचाही आढावा घेता येईल.
- निवडणूक आयोगाचे अधिकार व कार्य तसेच निवडणूक सुधारणेच्या शिफारशींची माहिती मिळेल.

## ६.१ प्रास्ताविक

प्रत्येक शासनव्यवस्थांमध्ये निवडणूकांचे महत्त्व सर्वच जण मान्य करतात पण लोकशाहीमध्ये निवडणूका अनन्य साधारण महत्त्वाच्या आहेत. खरंतर, निवडणूक प्रक्रिया हाच लोकशाहीचा खरा आधार आहे. इतर शासन प्रकाराप्रमाणे लोकशाहीत नुसत्या निवडणूका होणे, अपेक्षित नाही, तर त्या किती निरपेक्ष पद्धतीने होतात, त्यात किती मतदारांचा सक्रिय सहभाग आहे, राजकीय पक्षामध्ये निकोप स्पर्धा आहे का, निवडणूकांत भ्रष्टमार्गांचा अवलंब तर होत नाहीना, यासर्वच बाबी विशेष महत्त्वाच्या आहेत. कारण निवडणूकांच्याच माध्यमातून लोक आपल्या आशा अपेक्षेप्रमाणे सरकार निवडतात आणि नापसंत पक्षास सत्तेतून पायउतार करतात. याचमुळे तर अंतिम सत्ता जनतेच्या हाती टिकून राहते आणि सत्ताधारी पक्ष जनतेस

जबाबदार असतो, त्यामुळेच तर निवडणूक घेणारी यंत्रणा ही नि:पक्षपाती व सत्ताधारी पक्षाच्या नियंत्रणापासून मुक्त असली पाहिजे, जर असे झाले नाही तर लोकशाहीच्या मुळावरच घाव घातल्यासारखे होईल याची जाणीव भारतीय घटनाकारांनाही होती. त्यामुळेच तर त्यानी निवडणूक प्रक्रियेसाठी संविधानाच्या १५व्या भागात घटनात्मक तरतुदीच करून ठेवल्या आहेत. इतर देशांच्या राज्यघटनांत निवडणूकांविषयी कलमे नाहीत, याची जबाबदारी तेथील कायदेमंडळावरच सोपीवली आहे, मात्र आपल्या संविधानाने निवडणूकां सदर्भातील सर्व जबाबदारी नि:पक्षपाती व स्वतंत्र यंत्रणेवर सोपविली आहे. ज्यास आपण निवडणूक आयोग म्हणतो. निवडणूक आयोग निवडणूकांचे संचलन, नियंत्रण व निर्णय संपुर्णत: याच आयोगाच्या अख्त्यारीतली कामे असून न्यायव्यवस्थेप्रमाणेच आयोगाच्या मुख्य आयुक्ताचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यात आले आहे. जगातील इतर कुठल्याही लोकशाही राष्ट्रापेक्षा भारतात जनाधार मोठा आहे.जवळपास ६० कोटीपेक्षा अधिक लोक सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा हक्क बजावतात. म्हणूनच भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला कुठलाही भेदभाव न बाळगता राजकीय हक्क बहाल करण्यात आले आहेत. ज्यांची अंमलबजावणी लोक निवडणूक मतदानाच्या माध्यमातून करतात. भारतात संसदीय व राज्यपातळीवर सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या आधारेच निवडणूका घेतल्या जातात. प्रत्यक्ष निवडणूकात लोकांकडून प्रत्यक्षरीत्या निवडून आलेले प्रतिनिधी असतात, तर अप्रत्यक्ष निवडणूकात एकलसंक्रमण मतदानाच्या पद्धतीने राष्ट्रपतीची निवडणूक पार पडते, त्याच धर्तीवर लोकांकडूनच अप्रत्यक्षपणे निवडलेले प्रतिनिधी राज्यसभा, विधानपरिषदेचे सदस्य होतात.

पहिल्या सार्वत्रिक निवडणूकांपासूनच भारतामध्ये निवडणूक प्रक्रियेत सुधारणेविषयी सल्ला मसलत होत आली आहे. अनेक प्रसंगी वेगवेगळ्या शिफारसी समोर आल्या त्यांच्यापैकी काही व्यवहार्य व महत्त्वाच्या निवडणूक सुधारणा मान्य करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणेच केंद्र व राज्य पातळीवर निवडणूका घेतल्या जातात. निवडणूकांच्या माध्यमातून शांततापूर्ण राजकीय परिवर्तन होते व हिंसक क्रांतीची शक्यता मावळते. निवडणूकांमुळेच लोकांच्या राजकीय चेतना जाग्या होतात. लोक आपल्या मताधिकाराने लायक पक्ष व नेतृत्वास संधी देतात आणि अपेक्षाभंग करणाऱ्या उमेदवारांना सत्तेतून पायउतार करतात. एकूणच निवडणूक प्रक्रिया हा लोकशाहीचा आत्मा आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## ६.२ विषय–विवेचन

### ६.२.१ निवडणूकीबाबत घटनात्मक तरतुदी

भारतीय लोकशाहीचे सगळ्यात कौतुकास्पद वैशिष्ट्ये म्हणजे आपण संविधानातून सुरक्षित केलेला सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा हक्क. एखाद्या नवोदित राष्ट्राने एवढा व्यापक व सर्वसमावेशक मताधिकार जनतेस द्यावा हे उर्वरीत जगाच्या दृष्टीने आश्चर्याचे होते. कारण पाश्चात्य प्रगत उदारमतवादी लोकशाही राष्ट्र म्हणवणाऱ्या देशातून ही मताधिकाराचे सार्वत्रिकरण अगदी १९६० पर्यंत झाले नव्हते, आणि त्यासाठीही अनेक आंदोलने तेथील जनतेस करावी लागली होती पण पारतंत्र्यातून मुक्त झाल्याने भारतीय संविधानकर्त्यांनी संविधानाच्या १५व्या भागात कलम ३२४ ते ३२९ (ए) मधून निवडणूका आणि त्यासंदर्भातील नागरिकांचा हक्क याबाबत स्वतंत्र व्यवस्था केली आहे.

#### (१) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार

संविधानकर्त्यांनी देशातील विविधता, जनतेचे दारिद्र्य, निरक्षरता, प्रतिगामी मानसिकता या सर्व परिस्थितीची जाण ठेवूनच देशातील प्रत्येक प्रौढ स्त्री व पुरुषास ज्याचे वय १८ व त्यापेक्षा अधिक आहे अशा सगळ्यांनाच निवडणूकात मतदानाचा हक्क बहाल केला आहे. त्यामुळे जगात इतर कुठल्याही राष्ट्रापेक्षा भारतात मतदारांची संख्या जास्त आहे आणि भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या हक्कास कलम ३२६ मध्ये काही मर्यादाही सांगण्यात आल्या आहेत की व्यक्ति वेडी, सराईत गुन्हेगार वगैरे असू नये. जी व्यक्ती भारताचा नागरिक आहे, वयाची १८ वर्षे पुर्ण झालेली असतील ती मतदानाच्या हक्कास पात्र ठरते.

#### (२) निवडणूक आयोगाची तरतुद

कलम ३२४ नुसार संविधानाने देशात होणाऱ्या संसदेच्या, राज्यविधीमंडळाच्या, राष्ट्रपती तसेच उपराष्ट्रपतींच्या निवडणूकांचे निरीक्षण, निर्देशन, नियंत्रण व संचलन केवळ निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रातील कार्य आहेत.या आयोगाचा मुख्य

निवडणूक आयुक्त असेल व इतर आयुक्तांची संख्या वेळोवेळी राष्ट्रपती ठरवू शकतो. या सगळ्यांच्या नेमणूका राष्ट्रपतीमार्फत होतात. मुख्य निवडणुक आयुक्त हा अध्यक्षस्थानी असतो. याच कलमान्वये प्रादेशिक स्तरावरही राज्यनिवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीची व्यवस्था मुख्य निवडणूक आयुक्त याच्या सल्याने सार्वत्रिक निवडणूकांसाठी करण्यात येते.

निवडणूक आयुक्ताचे पद सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणेच स्वतंत्र व अधिकाराचे आहे. मुख्यनिवडणूक आयुक्तास पदावरून बडतर्फ करायचे झाल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशास ज्याप्रमाणे पदावरून काढण्यात येते त्याच पद्धतीने करता येईल, इतर कुठल्याही मार्गाने नव्हे.

### (३) एकत्र सार्वत्रिक मतदार यादी

कलम ३२५ अनुसार संसदेच्या तसेच राज्यविधीमंडळाच्या निवडणूकांसाठी एकच मतदार यादी असेल. कोणत्याही मतदारसंघातील सर्व मतदारांच्या नावांचा समावेश यात असेल, मतदारयादीत नाव नोंदविताना कुणालाही जात, वंश, धर्म, लिंग, भाषा या आधारे नाकारले किंवा स्वीकारले जाणार नाही. या कलमाने इंग्रजानी धुर्तपणे ज्या जातीय आधारे मतदार याद्या बनविल्या होत्या त्या संविधानकर्त्यांनी रद्द केल्या.

### (४) संसद व राज्यविधीमंडळाचे अधिकार

कलम ३२७ नुसार संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या निवडणूकी संदर्भातील व राज्य विधी मंडळाच्या निवडणूकी संदर्भातील अधिकारांचे वर्णन केले आहे. या बाबत मतदार याद्या बनवणे, मतदार संघाची आखणी करणे, उमेदवार व मतदारांची पात्रता ठरविणे, प्रत्यक्ष निवडणूकीचे संचलन करण्या विषयीचे कायदे करण्याचा अधिकार संसदेस आहे. कलम ३२८ नुसार राज्यविधीमंडळांनाही दोन्ही सभागृहाच्या निवडणूकीबाबत असे अधिकार बहाल करण्यात आले आहेत पण संविधानाशी तसेच संसदेने याबाबत केलेल्या कायद्याशी राज्यांनी केलेले कायदे विसंगत नसावे अशी अट आहे. संसद व राज्याच्या विधीमंडळांना घटनेच्या चौकटीत राहूनच हे अधिकार वापरता येतात हे उघड आहे.

### (५) न्यायालयांच्या हस्तक्षेपावर मर्यादा

कलम ३२९ नुसार न्यायालयांना निवडणूकी संदर्भातील काही बाबींत हस्तक्षेप करता येत नाही. उदा. मतदार संघाची आखणी, जागांची वाटणी याबाबतीत कुठल्याही निर्णयावर न्यायालयात खटला भरता येत नाही तसेच कोणत्याही निवडणूकीदरम्यान उपस्थित झालेला वाद निवडणूक याचिकेच्या माध्यमातूनच मांडता येतो. सध्या लोकप्रतिनिधी कायद्याप्रमाणे सार्वत्रिक निवडणूकांतील निवडणूक याचिका उच्च न्यायालयात व अपीलात सर्वोच्च न्यायालयात मांडता येतात. मात्र राष्ट्रपती व उपराष्ट्रपतींच्या निवडणूकांविषयीचे वाद मात्र केवळ सर्वोच्च न्यायालयातच निवडणूक याचिकेच्या माध्यमातून मांडता येतात.

## ६.२.२ निवडणूक आयोग

भारतीयांनी दीर्घकाळ पारतंत्र्य व हक्कांचे दमन यांचा कटू अनुभव घेतला. त्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यानंतर संविधानकर्त्यांनी सांसदीय लोकशाहीच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकास समान राजकीय हक्क देण्याची व्यवस्था निवडणूकी बाबत घटनात्मक तरतूदी करून केलेली आहे. नवोदित राष्ट्रात लोकशाहीच्या पोषणासाठी निवडणूकांची नि:पक्षपाती व हस्तक्षेपविरहित व्यवस्था असणे किती गरजेची आहे. याचा अंदाज घटनाकारांना होता म्हणूनच त्यांनी संविधानाच्या ३२४ कलमान्वये निवडणूक आयोगाची स्थापना केली आहे. ज्याचे देशातील संसदेच्या, राज्यविधी मंडळांच्या तसेच राष्ट्रपती व उपराष्ट्रपतींच्या निवडणूकांचे निरीक्षण, निर्देशन, नियंत्रण व संचलन करणे प्रमुख कार्य आहे.

### (१) निवडणूक आयोगाची रचना

निवडणूक आयुक्तपदी एखाद्या व्यक्तीची नेमणुक करण्यासंदर्भातील संसदेने वेळोवेळी केलेल्या कायद्यांना अनुसरून भारताचा राष्ट्रपती मुख्य निवडणूक आयुक्त तसेच गरज वाटल्यास इतर निवडणूक आयुक्तांची नेमणूक करतो. इतर आयुक्तांची संख्या राष्ट्रपती ठरवू शकतो. तसेच निवडणूक आयोगाच्या सल्ल्याने प्रादेशिक आयुक्तांची ही नेमणूक राष्ट्रपतीकडूनच होते. १ ऑक्टो. १९९३ साली राष्ट्रपतींनी निवडणूक आयोग बहुसदस्यीय असल्याचे अध्यादेशाद्वारे घोषित केले होते आणि मुख्य आयुक्तासारखाच इतर आयुक्तांचाही दर्जा असेल असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय टी. एन. शेषण यांच्या ऑक्टो. १९९३ च्या याचिकेवर देण्यात आला. आता निवडणूक आयोग मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्त यांचा मिळून बनलेला आहे. निवडणूक आयुक्तांच्या सेवा शर्ती संसदेच्या कायद्यांप्रमाणे राष्ट्रपती ठरवितो. सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश ज्या कारणाने

पदच्यूत करता येतो त्याच कारण व प्रक्रियेणे मुख्य निवडणूक आयुक्त पदच्यूत केला जाऊ शकतो, इतर मार्गाने नाही. यामुळे हे पद राजकीय हस्तक्षेप आणि दबावापासून मुक्त राहू शकते. तसेच निवडणुक आयुक्ताच्या नेमणूकीनंतर त्यांच्या सेवा शर्तीत त्यांचे आर्थिक नुकसान होईल असा बदल करता येत नाही हे विशेष.

## (२) निवडणूक आयोगाची कार्ये

### (अ) मतदारसंघाची आखणी करणे

मतदार संघाची आखणी लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ नुसार राष्ट्रपतीच्या आदेशाने करण्यात आली होती, पण ती समाधानकारक न वाटल्याने मतदारसंघ सीमांकन आयोग-१९५२ अधिनियम पारित करण्यात आला. त्यानुसार प्रत्येक जनगणनेनंतर या नियमाने मतदारसंघाची आखणी करण्यात येते.यात मुख्य निवडणूक आयुक्त अध्यक्ष असतात व सर्वोच्च न्यायालयाने किंवा उच्च न्यायालयाचे माजी दोन न्यायाधीश असे तीन सदस्य असतात व प्रत्येक राज्य पातळीवर यास मदत करण्यासाठी इतर २ ते ७ सदस्य असतात. या आयोगासमोर लोकांकडून सूचना व आक्षेप मागविले जातात. त्यानंतर अंतिम आदेशान्वये आयोग सीमांकीत मतदारसंघाची घोषणा करतो त्या विरोधात कोणासही कोणत्याच न्यायालयात खटला भरता येत नाही. मतदारसंघाची रचना करतांना भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या यांचा विचार आयोगास करावा लागतो.

### (आ) मतदार याद्या तयार करणे

निवडणूक आयोगाचे महत्त्वाचे व पहिले काम मतदारयाद्या अद्यावत करणे आहे, संसद किंवा राज्यविधी मंडळाच्या कुठल्याही सार्वत्रिक व मध्यावधी निवडणूकांपूर्वी सर्वसमावेशक अद्यावत आणि निर्दोष मतदार याद्या बनविण्याची जबाबदारी आयोगाची आहे, सर्व निवडणूकांसाठी एकच यादी अंमलात आणली जाते.

### (इ) राजकीय पक्षांना मान्यता देणे

निवडणूक आयोगाचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे राजकीय पक्षांना राष्ट्रीय राजकीय पक्ष, प्रादेशिक राजकीय पक्ष आणि राजकीय पक्ष या तीन्ही प्रकारात मान्यता देण्याविषयी नियम बनविणे, निकष ठरविणे व त्यानुसार मान्यता देणे. किंवा या निकषांना पुर्ण न करू शकणाऱ्या राजकीय पक्षांची मान्यता रद्द करणे हे काम ही आयोगाचेच आहे. उदा. राज्यस्तरावर पक्ष म्हणून मान्यतेसाठी त्या पक्षाने विधानसभेच्या एकूण वैध मतदान ४%मते मिळविलेली असतील तसेच लोकसभेत दर २५च्या प्रमाणात १ व विधानसभेत दर ३०च्या प्रमाणात १ उमेदवार निवडूण आलेला असावा, अशाप्रकारे कमीत कमी चार राज्यात कामगिरी करणारा पक्षच राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यतेला जातो.

### (ई) राजकीय पक्षांना चिन्ह वाटप करणे

निवडणूकांत सहभागी होणाऱ्या सर्व राजकीय पक्षांना आरक्षित निवडणूक चिन्ह बहाल करण्याचे अतिशय महत्त्वाचे काम आयोगाचे आहे, उदा. काँग्रेस हाताचा पंजा, भाजप कमळ, इ. निवडणूक चिन्हांच्या बाबतीत राजकीय पक्षांमध्ये वाद झाल्यास आयोगाची भूमिका निरपेक्ष व न्यायिक असावी, अशी अपेक्षा आहे. पण जर वाद मिटला नाही तर निवडणूक आयोगाच्या चिन्ह वाटपाच्या या निर्णया विरोधात राजकीय पक्ष सर्वोच्च न्यायालयात जावू शकतात.

### (उ) अर्ध न्यायिक कार्य

संविधानाच्या कलम १०३ नुसार निवडणूक आयोगास राष्ट्रपती संसद सदस्यांच्या अपात्रतेविषयी काही सूचना करू शकतो तेच राज्यविधीमंडळांच्या अपात्रतेविषयीचे नियम ठरविण्याबाबत कलम १९२ नुसार राज्यपाल आयोगास सुचना करू शकतो.

### (ऊ) आचारसंहिता तयार व लागू करणे

निवडणूकीच्या संचालनातील महत्त्वाचे काम आयोगामार्फत केल्या जाते ते आचारसंहितेच्या माध्यमातून राजकीय पक्षांनी निवडणूकीचे वातावरण निकोप स्पर्धेसारखे ठेवण्यासाठी व गैर प्रकारांना पायबंध घालण्यासाठी अशी आचारसंहिता लागू केली जाते, ज्याचे उल्लंघन केल्यास कायद्याने गुन्हा ठरतो. प्रचारा दरम्यान राजकीय पक्षांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे शिष्टाचाराचे उल्लंघन केल्यास तो आचारसंहितेचा भंग ठरतो. सत्ताधारी पक्षाने अधिकारांचा व सत्तेचा प्रचारासाठी दुरुपयोग करू नये. सरकारी मालमत्ता व ठिकाणांचा शासनाच्या खजिन्याचा वापर करू नये. वृत्तपत्रातून पैसे देऊन बातम्या लावू नये, इ. बंधने सत्ताधाऱ्यांवरही येतात म्हणून आचारसंहिता निवडणूकीसाठीचे निकोप वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे.

**(ए) इतर कार्य**

निवडणूकीच्या निरीक्षण, मार्गदर्शन व नियंत्रणासाठीच्या इतर कार्यात प्रचाराच्या तारखांच्या सुचना प्रसारीत करणे, उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची मर्यादा ठरवून देणे, मतदारांना राजकीय प्रशिक्षण देणे, प्रशासनाकडून निवडणूकीस लागणारे मनुष्यबळ मिळविणे, मतदार केंद्र व अधिकाऱ्यांच्या नियुक्ती व संख्या ठरविणे आणि निवडणूकी दरम्यान काही वाद झाल्यास निवडणूक याचिकां संदर्भात शासनास सल्ला देणे, निवडणूकीचा निकाल जाहीर करणे व आकडेवारी प्रकाशित करणे, इत्यादी

## (३) निवडणूक आयोगाचा नि:पक्षपातीपणा व स्वातंत्र्य

भारतात निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संरचना आहे आणि त्यानुसार न्यायपालिकेप्रमाणे शासनाच्या इतर शाखांच्या हस्तक्षेपापासून मुक्त असण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. त्यात पुढील बाबी महत्त्वाच्या ठरतात.

(१) निवडणूक आयोग संवैधानिक यंत्रणा आहे व त्याची निर्मिती संविधानाने केली आहे.संसद किंवा कार्यपालिकेने नाही.

(२) मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.

(३) मुख्य निवडणूक आयुक्तास महाभियोगाद्वारेच पदच्युत करता येते.

(४) मुख्य निवडणूक आयुक्ताचा दर्जा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशासारखाच आहे.

(५) नियुक्तीनंतर त्यांच्या सेवा शर्तीत अहितकारी बदल करता येत नाहीत.

(६) मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्तांचे वेतन भारताच्या संचित निधीतून केले जाते.

या सर्व गोष्टींमुळे निवडणूक आयोग निरपेक्षपणे, कुणाच्याही हस्तक्षेप व दबावाला बळी न पडता काम करू शकेल अशी अपेक्षा संविधानकर्त्यांना होती.

## (४) प्रत्यक्ष परिस्थिती व काही उणीवा

भारतात आजवर १६ सार्वत्रिक लोकसभा निवडणूका झाल्या आहेत. ज्यांच्या संचालना दरम्यान अनेकवेळा निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर शंका घेण्यात आल्या. वाद ही झाले. ज्यातून तारकुंडे समिती सारखे आयोगाच्या पुनर्रचनेबाबतच्या शक्यता वर्तविण्याचे प्रयत्न ही झाले. सैद्धांतिकदृष्ट्या काहीही असो पण प्रत्यक्षात मात्र निवडणूक आयोग व टी. एन. शेषण सारख्या काही निवडणूक आयुक्तांची जी भूमिका आहे, विवादास्पदच होती हे मान्य करावे लागेल.संविधानात कितीही आदर्श तरतुदी असल्या तरी प्रत्यक्षात त्या अंमलात येताना बरेच प्रसंग त्यावर बेततात. उदा. राष्ट्रपती जरी निवडणूक आयोगाच्या सर्व सदस्यांची नियुक्ती करीत असला तरी तो पंतप्रधानाच्या सल्लयाने करतो आणि मुख्य निवडणूक आयुक्त भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी अधिकारीच नेमले जातात, त्यामुळे मर्जीतील अधिकाऱ्यांना राजकीय पक्षांकडून हे पद बहाल करण्याच्या शक्यता शिल्लक राहतात तेव्हा निवडणूक आयोग नि:पक्षपाती असणारच नाही. प्रादेशिक स्तरावरही हेच चित्र आहे. शिवाय निवडणूक आयोगास चित्र दिलेले अधिकार सरन्यायाधीश किंवा महालेखा नियंत्रकासारखे स्पष्ट व प्रभावी नसल्याने राजकीय पक्ष वारंवार निवडणूक आयोगांच्या सुचनांचे उल्लघन करतात.

१९७८च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने राष्ट्रपती राजवट लागू असलेल्या राज्यात सहा महिन्याचा कालावधी उलटून गेल्यानंतर निवडणूका घेण्यायोग्य परिस्थिती आहे की नाही याची पाहणी करून राष्ट्रपतीस सल्ला देण्याची जी जबाबदारी निवडणूक आयोगावर सोपवीली आहे, त्यातून यावृत्तीस राजकीय रंग चढू शकतो हे नाकारता येत नाही.

तरी पण निवडणूक आयोगाच्या कार्यांचे व कामगिरीचे महत्त्व यामुळे कमी होत नाही. भारतात आजवर एवढ्या विशाल व व्यापक जनाधाराला सुसुत्रित करणे व जगात इतर कुठल्याही राष्ट्रास पेलवणार नाही, अशा निवडणूकांचे संचलन करणे साधी बाब नाही. निवडणूक आयोगाच्या नि:पक्षपाती भूमिका आणि घटनात्मक स्वातंत्र्यामुळेच कदाचित आपली लोकशाहीची पाळंमुळं एवढी भक्कम होऊ शकली एरवी आपल्या शेजारी राष्ट्रांमध्ये ती केव्हाच उध्वस्त झाली आहेत याचे श्रेय निवडणूकांच्या यशस्वी संचलनाला द्यावे लागेल.

# ६.२.३ प्रत्यक्ष निवडणूकीची प्रक्रिया

सार्वत्रिक प्रौढ मताधिकारामुळे ८०कोटींच्या वर मतदार प्रत्यक्ष निवडणूकीत भाग घेण्यास पात्र आहेत. पुरेशा राजकीय जागृतीच्या अभावीसुद्धा सार्वत्रिक प्रौढ मताधिकार स्वीकारणे चुकीचा निर्णय होता कां? याचे उत्तर शोधल्यास भारतात निवडणूक प्रक्रियेतील नकारात्मक मुद्याऐवजी सकारात्मक तथ्ये अधिक आकर्षित करतील कारण उमेदवाराची निवड, निवडणूक प्रचार, सत्ताधारी पक्षांची भूमिका, शासकीय प्रसार माध्यमांची भूमिका, पक्षास मिळणारी मते व जागा यात प्रमाणाचा अभाव, इ. गोष्टी आदर्श सांसदीय शासनपद्धतीपासून खूप दूर असल्या तरी पण प्रतिकूल परिस्थितीत ही भारतात नियमित निवडणूका

झाल्या आहेत. तसेच जनतेने सद्सद्विवेक बुद्धीने आजवर राजकीय स्थित्यंतरे निवडणूकांच्या माध्यमांतून घडवून आणली आहेत. १६व्या लोकसभेचे उदाहरण घेतल्यास भारतीय लोकशाहीच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणारी ही निवडणूक आहे. ज्यात ३० वर्षानंतर एखाद्या राजकीय पक्षास पूर्ण बहुमत मिळाले आहे. निवडणूक प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर झाल्याने ती अधिक लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक होतांना दिसत आहे. याच निवडणूक प्रक्रियेच्या माध्यमातून देशातील नवीन पीढीचे व प्रवाहापासून दूर असलेल्या नागरिकांचे राजकीय सामाजीकरण होत असते. निवडणूकाच राजकीय आधुनिकीकरणाचे प्रमुख माध्यम आहेत.

## (१) राजकीय पक्षांची भुमिका

निवडणूक प्रक्रियेत निवडणूक आयोगा नंतर राजकीय पक्षांच्या भूमिकाच महत्त्वाच्या असतात. आयोगाने निवडणूकांच्या संदर्भात तारखा जाहीर केल्यानंतर राजकीय पक्ष सत्ता प्राप्त करण्यासाठी डावपेच आखतात. प्रादेशिक पक्षाचे बळ वाढल्याने आज काल आघाड्यांच्या मार्फत निवडणूका लढविल्या जातात. ज्यात जागा वाटपाचे सौदे आपसात होतात व विशिष्ट मतदार संघात विशिष्ट उमेदवार देण्याची रणनीती आखली जाते. भारतात बहुतांश राजकीय पक्ष जाती, धर्म यांच्या आधारे संख्याबद्ध असणाऱ्या व्यक्तीसच उमेदवारी देतांना दिसतात. उमेदवारी देतांना निवडणूकीसाठी लागणारा निधी ते एकगठ्ठा मते मिळविण्याबाबतची सर्व समीकरणं पक्ष पडताळून पाहतात मगच उमेदवारांची यादी घोषित करतात.त्यानंतर सत्ताधारी पक्ष असेल तर केलेल्या कामांची यादी तयार करून नवीन आश्वासन देणे, जनतेच्या मतांचा कौल मिळवू शकतील असे मुद्दे उपस्थित करणे व पक्ष जर विरोधी पक्ष असेल तर सत्ताधारी पक्षाच्या उणीवा लोकांसमोर प्रखरपणे मांडून त्यापेक्षा आपण कसे उपयुक्त पर्याय ठरू शकतो, हे जनतेस पटवून देणारे मुद्दे शोधून काढणे ही कामे आपापल्या घोषणापत्रातून करतात. दुर्दैवाने भारतात विचासरणी व राजकीय तत्त्वांच्या आधारे पक्ष निवडणूकीत सहभागी होत नाहीत तर सत्तेसाठी तडजोडी केल्या जातात. राजकीय पक्षांकडून निवडणूकां दरम्यान अनेक मर्यादा ओलांडल्या जातात. संपत्ती, बळ, यांचा वापरही होतो. त्यामुळे राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रक्रियेतील भूमिकेविषयी वारंवार निवडणूक सुधारणा सुचविल्या गेल्या आहेत.

## (२) आचारसंहिता

निवडणूक आयोगाकडून सार्वत्रिक निवडणूकांच्या आधी ठराविक काळासाठी आचारसंहिता घोषित केली जाते.ज्या दरम्यान सत्ताधारी तसेच त्याचे स्पर्धक व विरोधक इतर राजकीय पक्षांना या आचारसंहितेचे पालन करणे बंधनकारक असते. देशाची शांतता व सुरक्षितता धोक्यात येईल असे कार्य राजकीय पक्षांना करता येत नाही. उत्तेजक भाषा, गैरमार्गाचा अवलंब, इत्यादींना प्रतिबंध घातला जातो. सत्ताधारी पक्षास सरकारी वाहन, स्थानके, धार्मिक ठिकाणे, शासकीय प्रसारमाध्यमांचा उपयोग निवडणूकीदरम्यान करता येत नाही. सर्वसामान्यांच्या नागरी अधिकारांवरही आचार संहितेमुळे बऱ्याच मर्यादा येतात. राजकीय पक्षांना आपल्या उमेदवाराचा खर्च आयोगास दाखल करावा लागतो, जो ठरवून दिलेल्या खर्च मर्यादेपलिकडे जाता कामा नये.

## (३) प्रचार

निवडणूक प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे उमेदवारांनी आपला प्रचार करणे. राजकीय पक्ष आपल्या घोषणापत्राच्या आधारे मतदारांच्या अपेक्षानुकूल आश्वासने देतात. आपल्या पक्षाच्या किंवा अपक्ष उमेदवार असेल तर त्याच्या ध्येय धोरणांना जनतेपुढे मांडतात.जनमताचा कौल मिळविण्यासाठी उमेदवार व राजकीय पक्ष, सभा, रॅली, भाषणे, संवाद, भेटी, इ. चे आयोजन करतात. प्रमुख नेते लोकांपुढे जाऊन आपला उमेदवार लोककल्याणासाठी कसा काम करेल हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. प्रचारादरम्यान प्रभावी व्यक्तिमत्व असलेल्या नेत्यांच्या अधिकाधिक सभांचे आयोजन केले जाते. उदा. १६ व्या लोकसभा निवडणूकीत नरेंद्र मोदी यांना भाजपाने प्रमुख प्रचारक केले होते. प्रचारासाठी आजकाल प्रसारमाध्यमे व सामाजिक माध्यमांचा अत्याधिक वापर होतांना दिसत आहे. दृक श्राव्य माध्यमे जसे वृत्तवाहीण्या, रेडीओ, इ. च्या माध्यमांतून जाहीराती प्रसारीत केल्या जातात. सभांचे व चर्चेचे थेट प्रक्षेपण मतदारांना दाखवले जाते. ट्विटर, फेसबुक, व्हॉटस्ॲप, इ. माध्यमाद्वारे देशाच्या तरुणाईशी संपर्क स्थापण्याचा प्रयत्न आजकाल पक्ष व उमेदवारांकडून होत आहे. वृत्तपत्रांच्या मधूनही राजकीय पक्षांचा प्रचार केला जातो आहे. होर्डींग्ज, बॅनर तसेच व्हर्चूअल, थ्री.डी. इफेक्ट ने ही लोकांसाठी एकाच नेत्यांच्या अनेक ठिकाणी सभा ठेवल्या जात आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगती व उपयोजनामुळे निवडणूकीच्या प्रचाराची तंत्रे ही फार बदलली आहेत. राजकीय पक्ष व उमेदवारांना प्रचारासाठी जी आचारसंहिता व खर्चमर्यादा घालून दिली आहे तीचे पालन करणे गरजेचे आहे. पण प्रत्यक्षरित्या प्रचारादरम्यान अनेक गैरप्रकारही उघडकीस येतात. उदा. जाती, धर्माच्या आधारे प्रचार करणे, प्रचारादरम्यान मतदारांना पैसे व इतर वस्तु वाटणे, प्रलोभणे देणे, इ. निवडणूकांत तणाव निर्माण करतात.

निवडणूकांतील राजकीय प्रचार हा आपल्या भूमिका, घोषणापत्रातील लोकहिताच्या गोष्टी, इतरपक्षांच्या ध्येय व धोरणावर टिका, इ.चा असावा पण बऱ्याच वेळा अपप्रचार अफवा व अभद्र भाषेचा वापरही प्रचारा दरम्यान होतो. ज्याची दखल निवडणूक आयोग घेते. पण यामुळे राजकीय पक्षांतील स्पर्धा निकोप व न्याय्य राहत नाही. प्रचाराचा प्रमुख हेतू निवडणूकीत आपल्या अनुकूल लोकमत बनवने हा असतो पण तो संवैधानिक मार्गानेच व्हायला हवा.

### (४) निवडणूक यंत्रणा व व्यवस्थापण

निवडणूकांचे नियंत्रण व संचलन योग्य रीतीने पार पाडण्यासाठी निवडणूक आयोग केंद्रपातळी पासून जिल्हा व मतदान केंद्रापर्यंत यंत्रणा उभारते. आयोगाच्या मागणीवरून राज्य आपला नोकरशाहीतील कर्मचारीवर्ग निवडणूकीच्या कामासाठी उपलब्ध करून देतात. राज्यातही मुख्य निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती होते. प्रत्येक जिल्हा पातळीवर एखाद्या लायक प्रशासकाची जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती होते. संसद किंवा राज्यविधीमंडळाच्या निवडणूकांत प्रत्येक मतदारसंघासाठी निवडणूक निर्णय अधिकार नेमला जातो. तो सरकारी नोकरच असला पाहीजे असे बंधन आहे. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी प्रत्येक निवडणूक केंद्रासाठी एक केंद्राध्यक्ष आणि काही मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यामार्फत केली जाते. मतदान सुरक्षित पार पाडण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्तही केद्रांच्या सुरक्षेसाठी उपलब्ध करून दिला जातो. पूर्वी मतपत्रिकांच्या मार्फत लोक पसंतीच्या उमेदवाराच्या निवडणूक चिन्हावर ठसा मारून मतदान करत असत पण आता इलेक्ट्रॉनिक वोटींग मशिनद्वारे लोक आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या चिन्हाचे बटन दाबून मतदानाचा हक्क बजावतात या तंत्राना मतदानाच्या ठराविक वेळेनंतर सील करून मतमोजणी केंद्रावर हलवले जाते. भारतातील एवढ्यां व्यापक स्तरावर अगदी शिस्तबद्धपणे निवडणूका घेतल्या जातात कारण कामांची विभागणी व पुरेसे मनुष्यबळ या कामासाठी उपलब्ध करून दिले जाते. भारतातील निवडणूकांचे व्यवस्थापण पाश्चात्य देशांसाठी अभ्यास व संशोधनाचा विषय आहे.

### (५) मतमोजणी व निकाल

निवडणूक आयोगाकडून संबंधित पातळीवर मतमोजणीची व्यवस्था केली जाते, आणि पुर्वीप्रमाणे मतपत्रिकांची मोजणी आज होत नसली तरी मतदान यंत्रातील मतांच्या संख्या मोजल्या जातात व सार्वत्रिक निवडणूकात ज्या उमेदवारास मतदारसंघातून सर्वसाधारण बहुमत अर्थात इतर उमेदवारांपेक्षा एक ही मत अधिक असेल तर तो विजयी म्हणून घोषित केला जातो. तसेच विधानसभा व लोकसभा सदस्य संख्येच्या प्रमाणात सर्वसाधारण बहुमत मिळवणारा पक्ष सरकार स्थापणेचा यशस्वी दावा करू शकतो.

### (६) निवडणूकी संदर्भातील वाद

संसद तसेच राज्यविधीमंडळांच्या निवडणूकादरम्यान काही वाद उद्भवला तर तो रितसर निवडणूक याचिकेद्वारे संबंधित मतदार संघाच्या उच्च न्यायालयात दाखल करता येतो व समाधान न झाल्यास सर्वोच्च न्यायालयात अपीलही करता येते. मात्र राष्ट्रपती व उप राष्ट्रपतीच्या निवडणूकी संदर्भातील निवडणूक याचिका केवळ सर्वोच्च न्यायालयातच दाखल करता येते. त्यावर न्यायमंडळ बहुमताने निर्णय जाहीर करते.

## ६.२.४ निवडणूकांचे प्रकार

भारतात संविधानाने जी निवडणूक प्रक्रिया अंगीकारली आहे ती प्रामुख्याने दोन प्रकारची आहे एक प्रत्यक्ष व दुसरी अप्रत्यक्ष. सांसदीय शासनव्यवस्थेचे प्रतिमान स्वीकारत असतांना अंतिम सत्ता जनतेच्या हाती असावी हाच यामागचा उद्देश असावा. ससंदेच्या दोन्ही सभागृहापैकी लोकसभेचे सदस्य प्रत्यक्ष जनतेकडून निवडून दिले जातात तर राज्यसभेवर लोकप्रतिनिधींमार्फत व अप्रत्यक्षरित्या जनतेमार्फत सदस्य निवडले जातात. राज्य विधीमंडळांच्या बाबतीतही तसेच आहे. विधानसभेतील सदस्य प्रत्यक्षपणे तर विधानपरिषदेत विशिष्ट मतदार संघातून काही प्रत्यक्ष तर कांही अप्रत्यक्षपणे निवडून दिले जातात. यासर्व निवडणूकांपेक्षा वेगळी निवडणूक राष्ट्रपतीची असते. ज्यात संसदेचे निर्वाचित सदस्य व विधानसभेचे निर्वाचित सदस्य मतदान करून जनतेकडून अप्रत्यक्षपणे राष्ट्रपतीची निवड करतात. उपराष्ट्रपतीची निवड ही अप्रत्यक्षच होते ज्यात संसदेचे निर्वाचित सदस्य मतदान करतात. भारतात घेण्यात येणाऱ्या या प्रमुख निवडणूकांच्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्याही निवडणूका घेतल्या जातात. एकूणच प्रमुख प्रकारांची चर्चा येथे करू.

## (१) लोकसभेच्या निवडणूका

लोकसभेच्या सदस्यत्वासाठी सार्वत्रिक निवडणूक घेतली जाते. ज्यात संबंधित मतदार संघातील मतदार सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा वापर करून पसंतीच्या उमेदवारास मत देतात व प्रत्यक्ष नागरिकांकडून बहुमत मिळालेली व्यक्ती लोकसभा सदस्य होते. त्यासाठी तो उमेदवार म्हणून तेव्हाच पात्र ठरतो जेव्हा तो भारताचा नागरिक असेल, त्याने वयाची २५ वर्षे पूर्ण केली असतील, व संसदेने वेळोवेळी सदस्यत्वासाठीच्या ज्या पात्रता ठरविल्या त्या तो पूर्ण करू शकत असेल. एकूण ५५२ जागांपैकी ५३० राज्यातील मतदारसंघातून तसेच २० सदस्य केंद्र शासीत प्रदेशातून निवडले जातात. (कलम ८१(१) प्रमाणे) आणि राष्ट्रपती २ अँग्लोइंडियन्सना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळत नसले तर नियुक्त करू शकतो. या सर्व सदस्यांची निवड ५ वर्षासाठी होते. लोकसभेच्या निवडणूका सर्वसाधारण परिस्थितीत ५ वर्ष आणि मध्यावधीत अस्थैर्यामुळे निवडणूक हव्या तेव्हा घेतल्या जातात. लोकसभा लोकप्रतिनिधींचे सभागृह असल्याने सार्वत्रिक निवडणूकांत बहुमत मिळवणारा पक्ष सरकार स्थापन करतो.

## (२) राज्यसभेच्या निवडणूका

भारताच्या संसदेचे हे वरिष्ठ सभागृह आहे, व यात २५० सदस्य आहेत. २३८ राज्यांच्या प्रतिनिधींच्या स्वरूपात तर १२ विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य कारणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रपती सदस्यपदी नियुक्त करतो. राज्यसभा स्थायी सभागृह असल्याने दर दोन वर्षाला १/३ सदस्य निवृत्त होतात आणि तेवढ्यांची नव्या सदस्यांची निवड होते. प्रत्येक राज्यातून किती प्रतिनिधी राज्यसभेवर पाठवायचे याची यादी संविधानात दिली आहे. संबंधित राज्यांच्या विधानसभेचे निर्वाचित सदस्य राज्यसभेच्या निवडणूकीत मतदार करताना राज्यसभेवर निवडूण जाण्यासाठी उमेदवाराकडे पात्रता असली पाहीजे. ती म्हणजे, तो भारताचा नागरिक असावा, त्याचे वय किमान ३० वर्ष असावे व पात्रते विषयीची संसदेने घेतलेली अट वेळोवेळी पूर्ण केली पाहिजे.राज्यसभेची निवडणूक अप्रत्यक्ष व मतदानाच्या एकल संक्रमण मतदान पद्धतीने संपन्न होते.

## (३) राज्यविधीमंडळाच्या निवडणूका

राज्यपातळीवर निवडणूक आयोगामार्फत मुख्य निवडणूक अधिकारी व त्याच्या मदतीस असलेला कर्मचारी वर्ग यांच्या मदतीने निवडणूका घेतल्या जातात. विधानसभा राज्यपातळीवरील लोकप्रतिनिधींचे सभागृह असल्याने या सभागृहाची निवडणूक प्रत्यक्ष मतदानाने होते. ज्यात १८ वर्ष पुर्णकरणारा मतदारसंघातील प्रत्येक व्यक्ती मतदान करू शकतो. तसेच सदस्यत्वासाठी भारताचा नागरिक असण्याबरोबर वयाची २५ वर्षे पूर्ण असावी लागतात. सदस्यत्वासाठीचे नियम व अटी तो वेळोवेळी पूर्ण करणारा असला पाहीजे. केंद्रातील संसदेच्या धर्तीवरच ज्या राज्यात विधानपरिषदा आहेत, तेथील सदस्य अप्रत्यक्षपणेच निवडले जातात. ज्यात विशिष्ट मतदार व लोकप्रीतिनिधी एकल संक्रमण पद्धतीने मतदान करतात. यात सदस्यत्वासाठी वयाची अट ३० वर्ष आहे.

## (४) राष्ट्रपती व उपराष्ट्रपतींची निवडणूक

राष्ट्रपतीची निवडणूक प्रक्रिया विद्यमान राष्ट्रपतीच्या कार्यकाल संपण्यापूर्वीच सुरू होते. कारण हे पद रिक्त ठेवता येत नाही.संविधानातील कलम ५४ नुसार राष्ट्रपतीची निवड ही अप्रत्यक्षपणे व निवड मंडळाद्वारे होते. ज्यामध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहाचे निर्वाचित सदस्य तसेच सर्व राज्यांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य मतदार असतात. कलम ५८ नुसार भारताच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार व्यक्तींसाठी पात्रता ठरवून दिली आहे, त्यात (१) तो भारताचा नागरिक असावा, (२) वयाची ३५ वर्ष त्याने पूर्ण केली असावीत (३) तो लोकसभेत सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावा, (४) तो शासकीय लाभाच्या पदावर नसावा. राष्ट्रपतीची निवडणूक अधिनियम १९५२ नुसार घेतली जाते ज्यात १९७४, ७७ साली काही सुधारणा करण्यात आल्या त्यान्वये राष्ट्रपतीच्या उमेदवारी अर्जावर किमान ५० मतदारांच्या सुचक म्हणून व ५० मतदारांच्या अनुमोदक म्हणून सह्या असल्या पाहीजे. निवडमंडळातील प्रत्येक मतदारास मिळणाऱ्या मतांचे मूल्य काढण्यासाठी सूत्र आहे.

(१) राज्याच्या विधानसभा सदस्याचे मतमूल्य

$$\frac{\text{राज्याची एकूण लोकसंख्या}}{\text{राज्य विधानसभेतील निवडून आलेले सदस्य}} \quad \frac{१}{१०००}$$

(२) संसद सदस्यांच्या मताचे मूल्य

$$\frac{\text{राज्याच्या विधानसभा सदस्यांना एकूण मिळालेल्या मतमूल्य}}{\text{संसदेच्या दोन्ही सदनातील निर्वाचित सदस्यांची संख्या}}$$

प्रत्येक मतदारास एकच मतपत्रिका जरी दिल्या गेली तरी मताचे मूल्य वरील पद्धतीने ग्राह्य धरण्यात येते. गुप्त पद्धतीने मतदान घेण्यात येते. ठरलेल्या तारखेस व वेळेत राज्य व केंद्रातील मतदार राजधानीच्या ठिकाणी मतदान करतात. निवडणूकीची व मतदानाची पद्धत प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची एकल संक्रमणपद्धती असते. राष्ट्रपतीपद हे सर्वोच्च आणि गौरवाचे असल्याने अधिकाधिक मताधिक्य त्यास असले पाहिजे. यासाठी कोटा पद्धती ठरविली आहे. ज्यात स्वत:च्या पहिल्या पसंती क्रमांकाची मते व गरज पडल्यास इतरांच्या दुसऱ्या पसंतीच्या संक्रमित मतांची बेरीज करून जो कोटा पूर्ण करतो तो राष्ट्रपती निवडला जातो. उपराष्ट्रपतीपदासाठीही याच पद्धतीचा अवलंब केला जातो आणि त्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहातील निर्वाचित सदस्यच मतदान करतात.

वरील सर्व प्रकारच्या निवडणूकांचे निरीक्षण, मार्गदर्शन नियंत्रण व संचलन निवडणूक आयोगाकडे असते.सर्वच निवडणूकात मतदानासाठी आणि सदस्यत्वासाठी उमेदवार म्हणून काही पात्रता घटनेच्या चौकटीत ठेवण्यात आल्या आहेत. त्यांचे पालन संबंधितांकडून होणे गरजेचे आहे. याशिवाय उमेदवारांना सूचक, अनुमोदक, अनामत रक्कम यासंबंधी निर्देशांचे पालन करावे लागते. सार्वत्रिक निवडणूकात आज स्वत: कडील संपत्तीचे विवरण चारित्र्य प्रमाणपत्र, इत्यादींचीही आवश्यकता आहे. भारतात निवडणूक प्रक्रिया वरील निवडणूक प्रकारांच्या साठीच राबविली जाते.

## ६.२.५ मतदारांचे राजकीय वर्तन

या प्रकरणात ओघाने बऱ्याच ठिकाणी सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची चर्चा करण्यात आली आहे. हा अधिकार भारताचा नागरिक म्हणून प्रत्येक १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या स्त्री पुरुषास आहे. पण असा अधिकार बहाल करतांना संविधानकर्त्यांनी तत्कालीन भारतीय समाजाची व लोकांची स्थिती विपरीत असतांनाही हा निर्णय घेतला कारण राजकीय समता व हक्कांचे भरण पोषण केवळ याचद्वारे होऊ शकले असते. स्वातंत्र्याच्या एक दशकापर्यंत निरक्षर, दरिद्री, राजकीय हक्कांची जाणीव नसलेला व राजकीय सहभाग जेमतेम असणारा भारतीय मतदार आता सुज्ञ बनत चालला आहे.राजकीय सहभागाचेही प्रमाण वाढले असून आपल्या मताची किंमत त्यास कळाली आहे. ज्याच्या बळावर यशस्वी राजकीय स्थित्यंतरे, त्यांनी घडविली आहेत. आज १६ व्या लोकसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर (१४ द. ल. मतदार नोंदणी झाली आहे व पैकी ६६.३८%) मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.जगात इतर कुठेही नसतील एवढे व्यक्तींनी म्हणजे, २३.१ द.ल. मतदारांनी निवडणूकीत पहिल्यांदाच मताधिकार वापरला. म्हणजे त्यांचे वय १८-१९ वर्ष होते. मतदानाच्या प्रमाणात उल्लेखनीय वाढ हा भारतीय लोकशाहीचा चढता आलेख आहे.

निवडणूकांच्या व राजकीय पक्षांच्या माध्यमातून तसेच स्थानिक स्वराज्य संस्थातून मतदारांना राजकीय प्रशिक्षण मिळत आहे. त्यामुळे मतदारांची राजकीय समज व प्रगल्भता वाढत आहे.केवळ पक्षांच्या व उमेदवारांच्या भूलथापा व खोट्या आश्वासनांना बळी न पडता लोकहितास कार्य करणाऱ्या सक्षम पक्षांना समर्थन देत निष्क्रीय सत्ताधाऱ्यांना पायउतार करण्याची समज मतदारात दिसते. आपल्या राजकीय हक्कांच्या विषयीही मतदारात जागरूकता वाढत आहे. १६व्या लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर असे लक्षात आले की पारंपरिक राजकारण करणाऱ्या पक्षांना लोकानी नाकारले व राजकीय अस्थैर्यामुळे लोकशाही धोक्यात येईल का? असे वाटत असतांना एकाच पक्षास केंद्रात बहुमत देऊन भारतीय मतदाराने आपण प्रगल्भ झाल्याचा दाखला दिला आहे. धर्म, जाती, भाषा, प्रांत इ. संकुचित भावनांच्या आधारे मतदारांना अवाहन करणाऱ्या राजकीय पक्षांना मतदार नाकारत आहेत व विकासाच्या, राजकीय अर्थिक व सामाजिक स्थैर्य व सुरक्षितता, इ. मुद्यांना घोषणापत्रात जाहीर करणाऱ्या राजकीय पक्षांना मतदारांनी कौल दिला आहे. खंडीत जनादेशामुळे आघाडी सरकार व स्वार्थी प्रादेशिक पक्ष यांचा कटू अनुभव आल्याने या निवडणूकीत भक्कम व स्थिर सरकार लोकांनी निवडून दिले आहे. मतदारांनी आपले मत कुणाच्या दबावात येऊन, आभिलाषापोटी, भावनेच्या आहारी जाऊन करणे थांबवले तरच लोकशाही प्रक्रियेला अर्थ आहे हे समजून घेणे मतदाराचे कर्तव्य आहे. एक सुज्ञ मतदार या विचारांचा नक्कीच असतो. भारतीय मतदाराच्या राजकीय वर्तनात मोठा बदल झालेला मागच्या काही वर्षात दिसून येतो. मतदारास आपला मतदानाचा हक्क देशाच्या विकासासाठी तसेच लोकशाहीच्या बळकटीसाठी कर्तव्य म्हणून वापरावा लागेल याची जाणीव झाली आहे. दुर्गम भागातील व आदिवासी मतदारांच्या राजकीय सहभाग व मतदान प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. मागच्या निवडणूकीत नागालँड-८२%, अरुणाचल प्रदेशात ७१%, मेघालय, मणिपूर, मिझोराम, इथेही ६५%च्या वर मतदान झाले. त्रिपुरात ८४% व अंदमान निकोबार येथे ७०% मतदान झाले. यावरून लक्षात येते की, राजकीय आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत मतदार वर्तनाने वेग मिळाला आहे. दुसरे असे उदाहरण म्हणजे लोकानी धर्म व जातींच्या मुद्यांना बाजूला सारत विकासाला प्राधान्य दिले आहे.कारण मुस्लीम बहुल ७४ मतदार संघापैकी ३९ भाजपाने जिंकले, तसेच उत्तरप्रदेशात व बिहारमध्ये भाजपाची कामगिरी सरस ठरण्याचे कारण लोकांनी जातीपेक्षा विकासाच्या मुद्यांना पसंती दिली आहे. एकूणच मतदारांचे वर्तन आज दबाव व कुणाच्या नियंत्रणात नसून मतदार स्वत:च्या विवेकाने निवडणूकीत मतदानाचा हक्क बजावत आहेत.

## ● १६ व्या लोकसभा निवडणूकीचा संक्षिप्त आढावा

७ एप्रिल ते १२ मे २०१४ दरम्यान भारतीय लोकसभेच्या १६ व्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या. ज्यात ८१.४ करोड मतदार नोंदणी झाली व त्यापैकी ६६.३८% मतदारांनी मतदान केले. ज्यापैकी ६७.०९% पुरुष मतदारांनी तर ६५.६३% स्त्री मतदारानी आपला हक्क बजावला.महिलांचा राजकीय सहभाग हे या निवडणूकीचे उल्लेखनीय वैशिष्ट्य ठरले. निवडणूक आयोगाने निवडणूकीवर होणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक मांडतांना ३५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता, यात सुरक्षेवर होणारा खर्च तसेच उमेदवारांचा व राजकीय पक्षांकडून केला जाणारा खर्च समाविष्ट नव्हता. देशभरात ५४३ लोकसभा मतदार संघासाठी ही निवडणूक घेण्यात आली. ज्यासाठी ९,३०,००० मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली व १ कोटी ४० लाख मतदान यंत्र वापरण्यात आले. ज्यात पहिल्यांदाच सर्व उमेदवारांच्या सहित वरील पैकी नाही या बटनाचाही समावेश होता. नागरी सेवेतील ११ लाख कर्मचारी व ५५ लाख इतर कर्मचाऱ्याची नियुक्ती निवडणूकीच्या कामी करण्यात आली होती. काही ठिकाणी गैरप्रकारांमुळे ५२ पोलींग बुथ वर पुन्हा मतदान घेण्यात आले होते. ८२५२ उमेदवार रिंगणात होते. पैकी ५४३ निवडले गेले. ज्यात सर्वाधिक भाजपा-२८२ (५१.९%) आणि त्याचे इतर सहकारी मिळून राष्ट्रीय लोकशाही आघाडीस ३३६ जागा मिळाल्या. निवडणूकीचा निकाल ९८९ मतमोजणी केंद्रावरील मोजणी नंतर जाहीर झाला. या निवडणूकीत स्वातंत्र्यापासून आजवरच्या इतिहासातील सर्वात मोठे राजकीय परिवर्तन घडले ते म्हणजे कॉंग्रेस पक्षास या निवडणूकीत केवळ ४४ जागा मिळाल्या तर १० वर्ष सत्तेत असणाऱ्या कॉंग्रेस प्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीस केवळ ५८ जागा मिळाल्या. मतदारानी राजकीय स्थैर्यास व विकासाला कौल देतांना भाजपास स्पष्ट बहुमताचा जनादेश दिला. १९८४ नंतर एकाच पक्षास असे बहुमत पहिल्यांदाच मिळाले. भाजपाने एकूण वैध मतदानाच्या ३१.९% मते मिळविली त्या तुलनेत त्यांना ५२% जागा मिळाल्या तर कॉंग्रेसला १९%मतांचे प्रमाण मिळून ही जागा मात्र केवळ ९% मिळाल्या. मागील सर्व सार्वत्रिक निवडणूकांप्रमाणेच या ही निवडणूकीत व्यक्तीप्रभाव दिसून आला.पंतप्रधानपदासाठीचा उमेदवार म्हणून नरेंद्र मोदीस भाजपाने जाहीर करताच संपुआच्या मनमोहन सिंग व भावी चेहरा राहुल गांधी यांच्याशी त्यांची तुलना होऊ लागली व मोदींचा प्रभाव यात सरस ठरला. संपुआने मागील दहा वर्षे सत्तेत असतांना महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी यावर नियंत्रण न ठेऊ शकल्याने व टू जी स्पेक्ट्रम घोटाळा, कोळसा घोटाळा, कॉमनवेल्थ घोटाळा, इ. भ्रष्टाचारांच्या प्रकरणांमुळे लोकांनी त्यांना नाकारले. मतदारांनी हक्क व मताच्या बळावर राजकीय परिवर्तन घडवून आणले आहे.

## ६.२.६ निवडणूक सुधारणा

मागील ७ दशकामध्ये लोकसभेच्या एकूण १६ सार्वत्रिक निवडणूका संपन्न झाल्या आहेत.तसेच राज्यांच्या विधानसभांच्या एकूण असंख्य निवडणूकाही पार पडल्या आहेत. नियमित निवडणूका होतात.एवढ्या मोठ्या प्रमाणावर घेतल्या जातात हे सारे कौतुकाचे विषय असले तरी पहिल्या सार्वत्रिक निवडणूका पासूनच निवडणूक प्रक्रियेतील सुधारणेविषयी अनेक चर्चा व वादविवाद झाले आहेत. प्रत्येक निवडणूक आयुक्त आपल्या अहवालात सुधारणांची गरज व सूचना करत असतो. पुढचा येणारा मुख्य निवडणूक आयुक्त ही याबाबींकडे लक्ष ठेवून असतो. या अनुषंगाने सर्वपक्षीय दिनेश गोस्वामी समितीने निवडणूक सुधारणांच्या विषयी १९९० मध्ये काही शिफारशी केल्या त्यास बरेच समर्थन मिळाले व त्याविषयी एक अधिनियम लोकसभेत पारीत केला गेला. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्त सेवा शर्ती अधिनियम १९९१ पारीत केला गेला. त्यानंतर वाजपेयी सरकारच्या काळात १९९८ साली इंद्रजित गुप्ता समितीनेही अनेक शिफारशी दिल्या. परंतु गोस्वामी समितीच्या सुचनांना अंमलात कसे आणता येईल यासाठी निवडणूक सुधारणा शिफारशी केल्या त्या संविधान पुनर्विलोकन आयोगाने (२००२) साली, त्यात राजकीय अपराधीकरणास नियंत्रित करण्यासाठी उमेदवाराच्या स्वच्छ चारित्र्याचे असण्यासंबंधी शिफारशी दिल्या होत्या. एखाद्या व्यक्तीवर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाला असेल तर त्यास अपात्र ठरवावे. सहा महिन्यापेक्षा जास्त शिक्षा झाल्यास आजीवन बंदी आणावी, आर्थिक बळाचा निवडणूकीत वापर थांबविण्यासाठी उमेदवारांवर खर्चाची मर्यादा आखणे, स्वत:च्या संपत्तीस जाहीर करणे, शपथपत्र देणे, एखाद्या शासकीय संस्थेची, बँकेची थकबाकी त्यावर असेल ती ही निवडणूक आयोगास त्याने कळवावी, राजकारणाच्या शुद्धीकरण व आधुनिकीकरणासाठी उमेदवारास किमान पदवी पर्यंतच्या शिक्षणाची अट घालावी शिफारशी प्रस्तुत केल्या होत्या.

निवडणूक सुधारणांच्या विषयी तारकुंडे समितीच्या शिफारशीही मैलाचा दगड ठरल्या. आज निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीत जो बदल झाला आहे तो याच समितीच्या शिफारशी नुसार आहे. निवडणूका निकोप वातावरणात पार पाडल्या पाहीजेत तसेच निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता असली पाहिजे या साठी निवडणूक सुधारणा वेळोवेळी सुचविल्या गेल्या पण आजही बऱ्याच प्रमाणात निवडणूकीबाबत गैरप्रकार सर्रास होताना दिसतात.

(१) निवडणूकांत पैसे वाटून गरीब, निरक्षर मतदारांकडून मतदान करून घेतल्या जाणे, काळ्या पैशांचा यासाठी वापर होणे.

(२) निवडणूकांदरम्यान बळांचा वापर हिंसा घडविल्या जाणे, गुंडागर्दी व जबरदस्ती मतदान करून घेणे, बुथ कॅप्चर करणे, इ.

(३) बोगस मतदान करून घेणे.

(४) मतदारांना मद्य व इतर नशेच्या भरात मतदान करायला लावणे, इ. गैरप्रकारात अनेक राजकीय पक्षांचा हात असतो. राजकीय पक्षांच्या व मतदारांच्या सहकार्याशिवाय या गैरप्रकारांचा पुर्णत: प्रतिबंध घालणे अवघड आहे.

भारतात निवडणूक प्रक्रियेतील इतरही काही उणीवा आहेत ज्यासंदर्भात सुधारणेची गरज आहे. उदा. एकूण वैध मतांच्या ३१%मिळवणारा राजकीय पक्ष आज बहुमत प्राप्त करणारा पक्ष आहे. कारण त्यास ५२%जागा मिळाल्या. ही तफावत निवडणूक प्रक्रियेतील प्रमुख दोष आहे. अपक्ष उमेदवारांची संख्या अधिक असणे. एकाच जागेसाठी अनेक उमेदवार रिंगणात असणे यासाठीचे कारण आहे. कारण कधी एकूण वैधमतदाराच्या २०% मते मिळविणाराही उमेदवार निवडून येतो. हे लोकशाहीसाठी तारक नाही. दुसरी अशी उणीव म्हणजे मतदार उदासिन असणे. मागील निवडणूकीत बरेच मतदान झाले असले तरी ३३%लोकांनी मतदान केले नाही हा आकडा कमी झाला पाहीजे. सत्तेत असणाऱ्या पक्षाने निवडणूका तोंडावर असतांना मतदारांना लुभावण्यासाठी अवाजवी लाभाच्या घोषणा करणे, प्रशासनात असणाऱ्या व्यक्तींशी संधान साधून निवडणूक आयोगावर नेमणूका करणे यामुळे सत्तेत असणारा पक्ष आपल्या अधिकारांचा गैरवापर करून निवडणूकांत लाभ मिळविण्याचा प्रयत्न करतो.

त्यासोबत निवडणूक अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव आणून मतदार याद्या, निवडणूक अर्ज, इ. हेराफेरी केली जाते व अधिकाऱ्यांना धमकावून गैरप्रकार करायला लावणे, इ. लज्जास्पद प्रकार काही राजकीय पक्ष करतात. शेवटचा मुद्दा आहे तो निवडणूक याचिकांवर जी सुनावणी होते व निर्णय दिल्या जातात ते फार उशिराने व निष्प्रभ असतात. त्यामुळे त्याचा काहीच परिणाम पक्षांच्या राजकीय मुजोरीवर होतांना दिसत नाही.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारतीय संविधानामध्ये निवडणूक आयोगाची तरतूद कोणत्या कलमाअंतर्गत करण्यात आली आहे?

(२) भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्ताची नेमणूक कोण करतात?

(३) राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी उमेदवाराने वयाची किती वर्षे पुर्ण केलेली असावी?

(४) लोकसभेचा कार्यकाल किती वर्षाचा असतो?

(५) राजकीय पक्षांना निवडणूक चिन्ह बहाल करण्याचे कार्य कोण करते?

## ६.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**राजकीय पक्ष :** राष्ट्राची राजकीय सत्ता प्राप्त करून ती वापरण्याच्या उद्देशाने संघटित झालेल्या राष्ट्रातील नागरिकांचा समुदाय.

**केंद्रिय निवडणूक आयोग :** केंद्रिय निवडणूक आयोग ही भारत सरकारच्या अखत्यारितील एक स्वायत्त घटनात्मक संस्था आहे. देशातील निवडणूका नि:पक्षपणे पार पाडण्याची जबाबदारी या आयोगाकडे असते.

**आचारसंहिता :** व्यक्ती, पक्ष, संस्था यांनी सामाजिक स्तरावर पाळावयाच्या योग्य नियमांचा व जबाबदाऱ्यांचा एक संच असतो.

# ६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) भारतीय संविधानामध्ये निवडणूक आयोगाची तरतूद कलम ३२४ अंतर्गत करण्यात आली आहे.
(२) भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्ताची नेमणूक भारताचे राष्ट्रपती करतात.
(३) राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी उमेदवाराने वयाची ३० वर्षे पुर्ण केलेली असावी.
(४) लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो.
(५) राजकीय पक्षांना निवडणूक चिन्ह बहाल करण्याचे कार्य निवडणूक आयोग करते.

# ६.५ सारांश

भारतातील निवडणूक प्रक्रिया व त्यात सहभागी होणारे लोक हे जगाच्या दृष्टीने आश्चर्य आहे. शेजारी राष्ट्रांच्यामध्ये लोकशाहीचे निर्मुलन होतांना भारतातील लोकशाहीच्या विकास व परिपोश जोमाने होतो आहे. त्याचे कारण येथील नियमित होणाऱ्या निवडणूका होत. निवडणूक आयोगाच्या निरपेक्षतेमुळे व स्वायत्ततेमुळे मतदार मुक्तपणे आपल्या राजकीय हक्कांचा उपयोग करतो. निवडणूकांत तारखा जाहीर करण्यापासून निकाल जाहीर करेपर्यंतची कामे निवडणूक आयोगामार्फतच पार पाडली जातात. त्यामुळे संविधानातच निवडणूक प्रक्रिया स्वतंत्रपणे चालण्यासाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारतात ४० कोटी लोक सार्वत्रिक प्रौढ मताधिकार बाळगतात आणि त्याच बळावर राजकीय परिवर्तन घडवितात. एकूण १६ सार्वत्रिक लोकसभेच्या निवडणूकांतून मतदाराने आपल्या राजकीय जाणिवा विकसित केल्या आहेत. आज भारतीय मतदार जागृत व राजकीयदृष्ट्या सहभागी आहे. निवडणूकांतील पारदर्शकता व निकोप स्पर्धा राजकीय पक्षांच्या भूमिकांवर अवलंबून आहे. मतदारांच्या सुज्ञ होण्याने पक्षानींही निवडणुकात गैरमार्गापासून लांब राहणे पसंत केले आहे. तरीही भारताच्या देशहितासाठी काही निवडणूक सुधारणांची गरज आजही आहे. सांप्रदायवाद, जातीवाद, अपराधीकरण, हिंसा यांचे समुळ उच्चाटन करणे, गरजेचे आहे. शेवटी राजकीय हक्कांचा संतुलित व सामंजस्याने वापर केल्यास नक्कीच निवडणूका पारदर्शी होतील. राजकीय पक्षांच्या भूमिका विचारसरणी व राजकीय तत्वांना धरून असतील तसेच राजकीय पक्षांमध्ये सत्तेसाठी सकस व निकोप स्पर्धा होऊ शकेल. ह्या सर्व बदलांच्या केंद्रस्थानी मतदार आहे तोच हे सारे बदल घडवू शकतो, फक्त त्याने हे आपले कर्तव्य समजावे.

# ६.५ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार यावर टीप लिहा.
(२) निवडणूक आयोगाची रचना लिहा.
(३) निवडणूक आयोगाची कार्ये लिहा.
(४) मतदारांच्या राजकीय वर्तनावर टीप लिहा.
(५) निवडणूक सुधारणावर टीप लिहा.

## ६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) Kashyap, S. (2001). *Our Constitution*. New Delhi, National Book Trust of India.

(२) फाडिया बी. एल. (२००१). *भारतीय शासन एवं राजनिती.* आगरा, साहित्यभवन, पब्लिकेशन.

(३) भोळे भा. ल. (१९८७). *भारतीय राज्य व्यवस्था.* नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लीशर्स.

(४) भोळे भा. ल. (१९८७). *भारतीय संविधान.* नागपूर, सिद्धांत आणि व्यवहार, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

(५) देशमुख बी. टी. (१९९२). *भारतीय संविधान.* नागपूर, पिंपळापुरे ॲड कं. पब्लीशर्स.

(६) जोशी प. ल. भारतीय संविधान : शासन आणि राजकारण.

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक


ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२

दूरध्वनी क्र. (०२५३ ) २२३१४७५, २२३१७१४

**Website:** https://ycmou.digitaluniversity.ac **Email:** dir_shu@ycmou.digitaluniversity.ac


**मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**

## प्रत्याभरण

या पुस्तकाबाबत आपल्याला अभ्यासक्रमाची रचना, काठिण्य पातळी, भाषाशैली, विषय-विवेचन, स्वयं-अध्ययन प्रश्न या संदर्भात तसेच तुमचा संबंधित क्षेत्रातील अनुभव, प्रशासनातील अनुभव, प्रशासकीय सुधारणेविषयी नवीन दृष्टीकोन, लोकप्रशासनातील नवप्रवाह इत्यादींबाबत काही सूचना असल्यास पुढील पत्त्यावर किंवा खाली दिलेल्या ई-मेलवरून कळवाव्यात.

**आपल्या सूचना पाठवण्याचा पत्ता**

**संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२

dir_shu@ycmou.digitaluniversity.ac, pubadmycmou@gmail.com या ई-मेलवर पाठवू शकता.

**तुमच्याविषयी :**

(१ ) संपूर्ण नाव : ______________________________

(२) संपूर्ण पत्ता : ______________________________

______________________________

(३) मोबाईल क्र. : ______________ ईमेल : ______________________________

(४) शिक्षण : ______________________ हुद्दा : ______________________

(५) तुमचा प्रतिसाद/सूचना : ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

*सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित*

ज्ञानगंगा घरोघरी

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

( महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले )

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक–४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७
फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६
वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac ● http://ycmou.ac.in